# आनंदाचे डोही




ॲड. आनंद रा० देशपांडे

# आनंदाचे डोही

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. आनंद देशपांडे यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# आनंदाचे डोही.....

## ॲड. आनंद रा. देशपांडे

**<u>आनंदाचे डोही....</u>**


- **ॲड. आनंद रा. देशपांडे**

  ९१/अ, मुरारजी पेठ, सुपर मार्केटजवळ,

  सोलापूर - ४१३ ००१.

  दूरध्वनी - ०२१७ - २६२१३४९

  दूरभाष - ९८२३२९१६४३

  ई-मेल - anandvanbhuvan@gmail.com



- **सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित.**



- प्रथमावृत्ती: - २०२०

- मुखपृष्ठ व मलपृष्ठ

  भास्कर सगर

- आतील चित्रे व प्रकाशचित्रे

  पराग घळसासी व सोशल मीडियावरुन

  साभार.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : १३ ऑगस्ट २०२०**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे-आवश्यकआहे.

## अर्पणपत्रिका

संपूर्ण जगभरात या महामारीच्या
काळात आपल्या जीवाची बाजी
लावून नागरिकांचे प्राण वाचवणाऱ्या,
डॉक्टर, नर्सेस, वैद्यकीय कर्मचारी,
पोलिस व इतर सर्व कोविड योद्धांना
सविनय अर्पण.

# ऋणनिर्देश

**शिवशाहीर श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे**

**श्री. मनोहर जोशी. (शामराव जोशी)**

**ॲड. रामचंद्र नागेश देशपांडे**

डॉ. वीणा देव

सौ. मृणाल कुलकर्णी

श्री. विवेक घळसासी

श्री. उदयराव जोगळेकर

श्री. दिग्पाल लांजेकर

श्री. श्रीनिवास विरकर

श्री. राजेंद्र टिपरे

श्री. विद्याधर रेणावीकर

श्री. पराग घळसासी

श्री. भास्कर सगर

## अनुक्रमणिका ....

१ ) आम्हां घरी धन .. मनोगत …

२ ) विपदश्च सन्तु : न शश्वत.

३ ) ध्यास

४ ) ये क्या कम है

५ ) चोवीसताशी

६ ) परिस

७ ) गढूळ

८ ) सांज ये गोकुळी

९ ) माणसातलं माणूस

१० ) चुळ चुळ मुंगळा

११ ) तुजविणजाऊ शरण कोणां

१२ ) आचारसंहिता

१३ ) समयी धारिष्ट्य धरणे

१४ ) सहवीर्यं करवावहै

१५ ) अन्नदाता सुखी भव

१६ ) सुख दुखतय

१७ ) जाणता राजा : रायगड

१८ ) देणे ईश्वराचे

१९ ) आचार विचार
२० ) असाही एक प्रयोग
२१ ) वरुषे अमृताचा घनु
२२ ) मसाल्याची बाग
२३ ) सखा सुहृद
२४ ) किं आश्चर्यं जगत्
२५ ) प्राथमिकता
२६ ) पुस्तकदिन
२७ ) अगदी खर सांगायचं
२८ ) निरंतर मानवता
२९ ) हितुन फुडं समदं
३० )ध्यावे आपणांसी आपण
३१ ) जागतिक महामारी :१
३२ ) जागतिक महामारी : २
३३ ) जागतिक महामारी : ३
३४ ) जागतिक महामारी : ४
३५ ) जागतिक महामारी : ५
३६ ) श्री रायगड : काही स्मरणे
३७ ) समर्पण

३८ ) असा जातोय दिवस
३९ ) श्री रायगड : काही स्मरणें
४० ) एक बुडालेली आठवण
४१ ) आत्ता लक्षात येतयं
४२ ) खापराचा खेळ
४३ ) म्हणे नरसैयो तेनो
४४ ) या वाटेने जावे वाटे
४५ ) क्षेत्र संन्यास
४६ ) सदा सर्वदा देव सन्निध
४७ ) मेरे नैना सावन भादों
४८ ) मुंगशी मास्क
४९ ) साकडं
५० ) तो आहे .

07-01-20

## *१. आम्हां घरी धन, शब्दांचिच रत्ने..*

परवा चार जानेवारीला माझ्या तिसऱ्या पुस्तकाचे, (काही जनातलं - काही मनातलं,) प्रकाशन प्रख्यात अभिनेत्री, लेखिका आणि दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. भाषणात मृणालताई म्हणाल्या, "नव्या पिढीवर संस्कार होण्यासाठी नव्या पिढीच्या लेखकांनीच लिहीलं पाहिजे". एक वेगळा पण आवश्यक विचार मला त्यातून जाणवला. पुलं, वपु, रणजित देसाई, ना. सं. इनामदार, शिवाजी सावंत यांची हजार, दीड हजार पानांची अर्थगर्भ पुस्तके, आत्ताची पिढी तितक्या संयमाने, बैठकीने वाचू शकेल याची शक्यता आता मावळत चालली आहे. त्यामुळे माझ्या किंवा माझ्या मागच्या पुढच्या एका पिढीने, ज्यांनी हे सविस्तर वाचलं आहे, एकदा नव्हे अनेकदा वाचलं आहे. स्वतःत मुरवून घेतलं आहे त्यांनी आता पुढं येण्याची गरज आहे. आपल्या पिढीला मिळालेला हा अमूल्य ठेवा आपल्या सोप्या शब्दात पुढच्या पिढीपुढे ठेवण्याची नितांत गरज आहे. नाहीतर त्या सकस साहित्याची ओळखच न झाल्याने ही पिढी आत्ता उपलब्ध असलेल्या पिझ्झा, बर्गर, पास्ता

आणि वडापावरूपी साहित्यालाच काजू, बदाम, पिस्ते समजण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पिढीला काहीतरी पोटभरीचे हवे आहे, त्यातल्या पोषण मूल्याशी त्यांना काही घेणे देणे नाही, ना ही त्यामुळे होणाऱ्या विकारांशी ! मग तो विकार मानसिक असो वा शारिरीक ! त्यामुळे जोपर्यंत आपण हयात आहोत, तोपर्यंत आपल्या पिढीतलं सकस, सुग्रास साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचवणं ही आपली नैतिक जबाबदारी आहे असं मला वाटतं. त्यादृष्टीने गेल्या दहा वर्षात मी तीन पावलं टाकू शकलो ही, ही त्या पूर्वसूरींचीच कृपा! पण आपापल्या परीने प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात हे पुढे पोहोचवले पाहिजे आणि आपली भूमिकासुद्धा जगद्गुरू तुकाराम महाराजांनी म्हटल्यासारखीच असली पाहिजे.

फोडिले भांडार,धन्याचा हा माल,

मी तो हमाल , भारवाही .....

चला तर मग, या साहित्य संपदेच्या पालखीचे भोई होऊयात

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

14-01-20

## २. विपद्श्वसन्तुः न शश्वत ....

महाभारतीय युद्ध संपलं, युधिष्ठिराचा राज्याभिषेक झाला. भारताच्या इतिहासातलं एक नवीन पर्व सुरू झालं. कृष्ण सर्वांचा निरोप घेत घेत द्वारकेला जाण्यासाठी कुंतीच्या महालात आला. तिला नमस्कार करून तो म्हणाला, "आत्या, तुझी सर्व दुःखे आता दूर झाली आहेत. मला शक्य तेव्हढे सर्व, मी पांडवांसाठी केले आहे, ते आता सुखाने या भरतखंडावर धर्मराज्य करतील. मी आता येतो. जाण्यापूर्वी तुला विचारायला आलो आहे, तुला काही हवं आहे का?" कुंतीने डोळ्यातलं पाणी टिपीत कृष्णाला जवळ घेतलं. म्हणाली, "केशवा, काही नको, मला फक्त संकटं दे, विपदा दे." आश्चर्यचकित झालेल्या कृष्णाने विचारलं, "आत्या, अगं आयुष्यभर एवढी संकटं, एवढे अपमान, एवढा वनवास सहन करून आता कुठे सुखाचे दिवस तुझ्या आयुष्यात आले आहेत. तुझा मुलगा या साम्राज्याचा चक्रवर्ती सम्राट झाला आहे आणि तू संकटं मागतेस, विपदा मागतेस?

हसून कुंती म्हणाली, "खरयं तुझं मधुसूदना, पण अरे आयुष्यात ज्या ज्या वेळी आमच्यावर संकटं आली त्या त्या

वेळी किंबहुना त्याच्या आधीपासून तू आमच्या पाठीशी उभा होतास, ती सर्व संकटं तू तुझ्या छातीवर झेललीस, आम्हाला सुखरूप ठेवलेस. आता आम्हाला तुझी सवय झाली आहे. तुझ्या पाठीशी असण्याची, तुझ्या अस्तित्वाची सवय झाली आहे. आता सुखाचे दिवस आले आहेत हे मान्य, म्हणूनच तुला गमवायची भिती वाटते. बघ निघालास नां व्दारकेला? आणि तूच सांग या जगात संकटांशिवाय, विपदांशिवाय शाश्वत काय आहे? सुखाचे चार दिवस येतील आणि जातील त्याऐवजी शाश्वत असलेल्या संकटांच्या वेळी तुझी आठवण मनात ताजी राहील, तुझा भरवंसा वाटत राहील, सतत तुझा सहवास मिळत राहील. आता तूच सांग तूझ्या सहवासाशिवाय या नश्वर जगात आनंददायी असं दुसरं काय आहे ? त्यामुळे मी संकटं मागत नाही, या विपदांच्या मिषाने मी तुझी आठवण, तुझा भरोसा मागते आहे". श्रीकृष्ण मनःपूर्वक हसला आणि म्हणाला, "शोभतेस खरी माझी आत्या. पण खरं सांगू, मी तरी तुमच्यापेक्षा वेगळा कुठं आहे ? परवाच तर अर्जुनाला सांगितलं ना, या चराचरात जो कोणी जिथे कुठे माझं मनःपूर्वक स्मरण करेल, तद्धामं परमं मम.मी तिथेच आहे. तू काळजी करू नको

आणि शोकही करु नकोस. ज्या ज्या वेळी माझी आठवण करशील, त्या त्या वेळी मी हजर असेन. हा मी तुला दिलेला शब्द आहे". नमस्कार करून वळून चाललेल्या पाठमोऱ्या कृष्णाकडे कुंती पहात राहिली. डोळ्यातून झरणाऱ्या अश्रूधारांमुळे हळूहळू ती आकृती दिसेनाशी झाली. शिल्लक राहिलं, त्यानं दिलेलं वचन आणि भरोसा जो केवळ कुंतीसाठी नव्हता तर साऱ्या विश्वासाठी होता ........

**दुखमें सुमिरन सब करें**, **सुखमें करे ना कोय** ।

**जो सुखमें सुमिरन करें**, **तो दुख काहे को होय** ?

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

(Image **Curtacy** - Shri. Parag Ghalsasi)



19-01-20

## ३. ध्यास .....

डिसेंबरचा महिना, सकाळची प्रसन्न वेळ, थंडीने अंगावर काटा फुलत होता. मी आणि माझा एक मित्र जुन्या पैठणच्या उत्खनन झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांतून हिंडत होतो. काही अप्रतिम वाडे, जुनी शिल्प, बऱ्याच वस्तू, पैठणीच्या विणकामाचे दगडी धोटे असं पहात पहात फिरत होतो. एक जुना सावकाराचा वाडा आहे. आत गेल्यावर दरवाजात दोन पिण्याच्या पाण्याचे रांजण आहेत, त्याला चक्क कस्तुरीचा गिलावा केलेला आहे .


अचानक माझ्या लक्षात आलं, पंधरा वर्षांपूर्वी इतिहास संशोधक ब्रम्हानंद देशपांडेबरोबर असताना, त्यांनी इथं जवळ असलेल्या नागघाटावर दोन शिलालेख दाखवले होते, माझ्या माहितीप्रमाणे, त्यातला एक खूप जुना सातवाहनकालीन असावा असं काहीस काकांनी सांगितल्याचं स्मरत होतं. मित्राला म्हटलं, "चल बघू सापडताहेत का ते?" नागघाटावर येऊन पाहतो तो काय सगळचं चित्रं बदललेलं, नवीन बांधकाम झालेलं, ते ही अर्धवट! दगडांचे ढीगच्या ढीग इतस्ततः पसरलेले, बाभळीचं

गच्च रान माजलेलं, मला काही दिशाच कळेना. अदमासाने मी हुडकत होतो. पण जुनी कोणतीच खूण आढळून येईना. शेवटी त्या काटवणात घुसण्याचा निश्चय केला. दगडांची रास खाली पाण्यात कोसळली होती. त्यावर पाण्याचा चुबुक, चुबुक आवाज येत होता, म्हणजे पाणी खोल होतं. चांगला घसरगुंडीसारखा उतार होता, बाभळीच्या फांद्या चुकवीत, उतारावर तोल सांभाळत, त्या गचपणात घुसलो. बरोबरच्या मित्राने परोपरीने सांगूनसुद्धा मी ऐकायच्या मूडमधे नव्हतो म्हणून मागोमाग तोही घुसला. पायाखाली पाचोळ्याचा ढीग आजूबाजूला बाभळीच्या फांद्यांचे गुंतवण असा वाट काढीत जात होतो. अचानक पायाखाली नजर गेली अन् भितीने शहारून गेलो. पायाजवळ सहा साडेसहा फूट नागाची ओली, कात पडली होती. सावरायला थोडा वेळ गेला. कात ओली होती म्हणजे महाराज तिथेच कुठेतरी असावेत. तसाचं धीर धरून पुढं घुसलो. अर्ध्या एक तासांच्या झटापटीनंतर एका दगडाच्या राशीच्या मागे अस्पष्टशी अक्षरे दिसली. मित्राला हाक मारून तो दगडाचा ढिगारा बाजूला केला आणि पाहतो तो मला हवा असलेला शिलालेख समोर होता. बांधकामाचे दगड कसेही फेकल्याने त्यावरची काही

अक्षरे उडाली होती. पटकन फोटो काढून घेतला. मग दुसरा शिलालेख हुडकायची मोहीम. थोडयाच अंतरावर तोही सापडला. त्याचाही फोटो काढून घेतला. सांभाळत, कसेबसे त्या काटावळीतून दोघे बाहेर आलो तो अवतार इतिहास संशोधकांसारखेच झाले होते. दोन्ही शिलालेखांचे वाचन पूर्वीच झालेले आहे, त्यामुळे त्यात नाविन्य काही नव्हते, पण एखाद्या गावी गेल्यावर तिथल्या स्थानिक मित्राला न भेटता येणं हा जसा अपराध असतो, तसा माझ्या दृष्टीने नागघाटावर जाऊन ते शिलालेख न पाहता येणं म्हणजे अक्षम्य अपराधच होता. दोन्ही शिलालेख उठावाचे आहेत. वारा, वादळ, पाऊस, ऊन यांनी भरपूर नुकसान केलेच आहे, त्याहीपेक्षा जास्त नुकसान आपल्या दुर्लक्ष करण्याने होतं आहे. उठावाच्या शिलालेखात इतक सुंदर, वळणदार अक्षर मी कुठंही पाहिलं नाही. त्या साऱ्या वीस एकवीस एकर परिसराचा एकमेव रखवालदार असलेल्या पुरातत्व खात्याच्या माणसाशी गप्पा मारल्या. तो म्हणाला, "साहेब, एकोणीसशेचौऱ्याण्णव साली उत्खनन थांबलं ते कायमचच. दिवसभर ड्यूटी म्हणून या खंडहरातून एकटा फिरत असतो".

सातवाहनांची पाचशे वर्षांची राजधानी पैठण, नाथांच पैठण, पैठण्यांच पैठण, विद्वत्तेच माहेर पैठण, माऊलींनी जिथ शुध्दीपत्र मिळवल ते पैठण, आज संशोधनाच्या बाबतीत अनाथ होऊन पडलय. काही असो पण तशा अडचणीत घुसून त्या दोन शिलालेखांच दर्शन घेण्याचा माझा ध्यास मला एक नवा अनुभव देऊन गेला .

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



31-01-20

## ४. ये क्या कम है, अभी मुझसे, मेरा बचपन नहीं रुठा

प्रवासात असलो की जुनी गाणी ऐकणे आणि निसर्ग न्याहाळणे हा एक जुना छंद आहे. आजही सकाळी पंढरपूरला जायला निघालो आणि जुन्या गाण्यांची खुंटी पिळली. हरियाली और रास्तामधल गाणं सुरु झालं. काही काही वेळा एखादा मुखडा किंवा अंतऱ्यातल्या एखाद दुसऱ्या ओळीने एकदम मनाचा टवका निघतो. दुसऱ्या अंतऱ्यातली एक ओळ लताबाईंनी आळवली,

ये क्या कम है, अभी मुझसे, मेरा बचपन नहीं रुठा . .. झटकन मन चाळीस वर्षापूर्वीच्या सोलापूर पंढरपूर प्रवासाला निघून गेलं. कच्चा रस्ता, जनता गाड्या, प्रत्येक थांब्यावर थांबणारी एसटी. अक्षरशःबहात्तर किलोमीटरच्या प्रवासाला अडीच तीन तास लागायचे. तिकीट चार रुपये तीस पैसे. एकटा प्रवास बऱ्याच वेळा करायचो. एसटी स्टँडपासून आजीचं घर सापडायचं नाही, म्हणून नदी ओलांडून गाडी गावात शिरली की वाळवंटात उतरून दत्त घाटाने हरिदास वेशीतून घरी जायचो. जुनं बोळाबोळाचं

पंढरपूर, दगडी रस्ते, ठरावीक वळणावरच्या ठराविक घरांच्या खुणा. जसा रुक्मिणी पटांगणात पोहोचायचो तसं पळत घर गाठायचं. चप्पल काढता काढता आज्जीला मारलेली हाक, तिनं वरच्या खिडकीतून खाली डोकावून बघणं, अंधाऱ्या जिन्यातून पळत जाऊन तिच्या कुशीत शिरणं ...

गाणं कानावर पडत होतं, समोर ज्वारीची शेतं कणसांनी लगडली होती, अचानक काही दिसेनासं झालं. जुन्या आठवणींनी मनाचा तळ ढवळून काढला होता. त्यातले उडालेले शिंतोडे पापण्यांवर जमा झाले होते. चष्मा काढला, आजीच्या आठवणीनं गळ्यांत दाटलेला हुंदका तसाच गिळला. माझं मलाच आश्चर्य वाटलं की हे सारं तपशीलवार कसं आठवलं ? उत्तर लताबाईंची ओळचं देतं होती .... ये क्या कम है, अभी मुझसे मेरा बचपन नहीं रुठा .....

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

09-02-20

## 5. चोवीसताशी......

थंडीचे दिवस, माघाचा महिना. पहाटेचे चार साडेचार वाजले असतील. पुजाऱ्यांच्या दरवाजाची कडी वाजली अन दार उघडून मुकुंदा कळशी घेऊन माझ्यापाशी आला. थंडीन मी पण पार गारठून गेलो होतो. आतल्या पाण्याचीच काय ती उब. मुकुंदान चार दोन कळशा घेऊन, पहिल्यांदा मला स्वच्छ धुऊन काढलं. आजूबाजूचा कचरा साफ केला आणि मग शेजारच्या दगडावर बसून अंगावर कळशा ओतून घ्यायला सुरुवात केली. अंघोळ उरकली, तसं त्यानं पंचाला जानवं पुशीत शिवमहिम्न म्हणायला सुरुवात केली.

त्याचा रोजचा हा नेमच होता म्हणाना. सोवळ्याच्या पाण्याची कळशी घेऊन मुकूंदा गेला, तसे थोडया वेळाने आसपासच्या घरातले, नेहमीचे दोन चार पुरुष नळावर येऊन आंघोळ करुन गेले. आता चांगलं उजाडलं होत. मग सुरु झाला स्त्रियांचा राबता, आता हा चांगला दुपारपर्यंत चालणार होता. एकदा त्यांच्या धूण्याबरोबर, त्यांच्या गप्पा सुरु झाल्या की मग मला बातम्या कळण्यासाठी वेगळं काही करावं लागायचं नाही. दहा साडेदहाच्या सुमाराला अंजिखान्याची पोरं म्हशींचा घोळका घेऊन किल्ल्यात जायची. माझ्यापाशी आलं की म्हशी आपसूक थबकायच्या.

उन्हं लागू नयेत म्हणून डोक्यावर घेतलेल्या दोन पाट्या, माझ्या दोनं बाजूला ठेवून, पोरं म्हशींना पाणी पाजायची. ओळीनं एकेक म्हैस येऊन पाणी पिऊन पुढ जायची. अकराच्या सुमारास धुण्याची गाठोडी घेऊन महिला यायच्या. दुपारी दोन ते चार एवढाच काय तो मला विसावा मिळायचा. पुन्हा संध्याकाळपासून, सकाळचा सगळा कार्यक्रम सुरू व्हायचा ते रात्री नऊपर्यंत.

शंभर दोनशे फूटावर एक असे साऱ्या शहरभर मिळून, आम्ही शंभर एक नळ तरी असू. दिवसाचे बारा चौदा तास आमच्या इथे पाणी असायचं म्हणून मग लोकांनी आमचं नावच ठेवलं चोवीस ताशी नळ!

ऐन इंग्रजी अमदानीत ब्रिटिशांनी आमची रचना केल्याचं सांगतात. स्वाभिमान, स्वदेशप्रेम वगैरे मध्यमवर्गीय चोचले सोडून, गांडूळासारखं गिळगिळीत जीवन जगण्याची तयारी असली की साहेब जनतेसाठी सगळ्या सोयी करून द्यायचा. आमची सगळ्यांची पाण्याची लाईनच वेगळी होती. एका हिप्परगा तलावाच्या भरोशावर, आमचं शंभरएक नळांच कुटुंब व्यवस्थित चालायचं. सत्तरच्या दशकात कधीतरी प्रत्येक घरासाठी स्वतंत्र नळ घ्यायची चैन सुरू झाली. तीही फारशी परवडण्यासारखी नव्हती म्हणून नव्वदीपर्यंत आमचं अस्तित्व अबाधित होतं. आला गेला, माणूस, पशु पक्षी यांच्या तहानेल्या जीवाला पाणी पाजण्याचं काम अहोरात्र

सुरु असायचं. लोकांना विकतच घरात येणारं पाणी आवडायला आणि परवडायला लागलं, तस आमचं अस्तित्व धोक्यात आलं. पाण्यातनं मिळणारा पैसा दिसू लागला तसा नगरपालिकेने हळूहळू आमचा गळा घोटायला सुरुवात केली. एकेक करत जवळपास सगळे नळ बंद पडत गेले. अन्न, पाणी, डोक्यावरची वडिलधाऱ्यांची छाया आणि काळजातली माया याची कधी किंमत होऊ शकत नाही. अन्न विकणारी हॉटेल निघालीच होती. पाणीही विकत मिळू लागलं तशी काळजातली माया ही आटली आणि वडीलधाऱ्यांची छाया ही संपून गेली. एका हिप्परग्याच्या जीवावर आम्ही दिवसभर पाणी पुरवायचो आणि आता असे हजार हिप्परगा मावतील एवढं उजनी धरण झाल्यावर तुम्हाला पाच दिवसाआड तीन तास पाणी मिळतयं. याच गणित कसं घालायचं हे आता तुम्हीच बघा. हे सगळे जुने दिवस आठवून दोन टिपं गाळायची म्हटली तरी आता आमच्यात पाणी नाही.

©ॲड.आनंद रा. देशपांडे.



22-02-20

## 6. परिस ......

स्थळ : सोलापूर पुणे रस्ता,

वेळ : सकाळची,

ठिकाण : गाडीचं पुढचं सीट,

उद्योग : तोच जुनी गाणी ऐकणे .....

दिलसे निकलनेवाले रस्ते का शुक्रिया, दिलतक पहुँचनेवाली डगर को सलाम ..... ए प्यार तेरी पहेली नजर को सलाम .. ह्रदयापासून निघणाऱ्या कोणकोणत्या रस्त्यांचा हिशेब ठेवणार? सगळ्या आयुष्याचा सात रस्ता चौक झालेला, येणाऱ्या प्रत्येक मुखडयाकडे बघत, दिल के तुकडे तुकडे करके मुस्कुरा के चल दिए, एवढच काय ते म्हणायची सवय अंगवळणी पडलेली. पण आयुष्यात येणार प्रेम असं हमरस्त्यान कधीच येत नाही. ते अस वळणावळणानं, गल्ली बोळातून, कधी आडवाटेनं दत्त म्हणून समोर येतं. आपली अवस्था प्रत्येक मुखडयाकडे बघत आपल्या गळ्यातला धातूच्या तुकड्याचं सोनं करण्यासाठी परिस हुडकणाऱ्या माणसासारखी. असे कितीक प्रसंग येऊन गेलेले असल्यान,

गळ्यातल्या तुकड्याकडे न बघताच, आपण कधीतरी परिस फेकून तरी दिलेला असतो किंवा आपल्या हातून निसटून तरी गेलेला असतो. परिस हुडकायची सवय काही जात नाही आणि हातून निसटून गेलेला परिस काही परत येत नाही. तो गेलेला असतो कायमचाच, दुसऱ्याच्या आयुष्याच सोनं करण्यासाठी! आपल्या हाती मात्र तेवढा काळ आयुष्याच झालेलं सोनं आठवून त्या आठवणीत रमण्याव्यतिरिक्त काही शिल्लक रहात नाही

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

08-03-20

## 7. गढूळ .......

पाण्यानं गच्च भरलेल्या हौदात कुणी धप्पकन मातीचा ढेकूळ टाकावा तसं मनाच झाल आहे. सगळ गढूळ, गढूळ. हळूहळू ढेकूळ विरघळतय, तसतस त्याची राड होतीये. काडी कचरा वर तरंगायला लागला आहे. बारीक सारीक खडे तळाशी बसताहेत. ढेकळातल्या हवेचे बुडबुडे मनात उठणाऱ्या प्रश्नांसारखे ओळ धरून खालून वर उमटून येताहेत. उत्तर मात्र कशाचच सापडत नाहीए.

डोळ्यासमोर पन्नास वर्षाचा सिनेमा सुरु आहे. कडू प्रसंग, गोड प्रसंग, चुकलेले निर्णय, बरोबर निर्णय, पहिल्यांदा बरोबर वाटलेले पण नंतर चुकलेले निर्णय, एक ना अनेक, आयुष्यात आलेली माणसे, आयुष्यातूनउठून गेलेली माणसे, भरीस भर म्हणून सभोवती गोळा झालेली आयुष्यातून उठलेली माणसं.
काहीच समजत नाहीए. गढूळ... गढूळ ....

आयुष्य म्हणजे तरी काय? आपलं आयुष्य कशाला म्हणायच? आपलं आयुष्य म्हणायच तर मग त्याची सूत्र

दुसऱ्यांच्या हातात कशी? आपली निर्णय प्रक्रिया दुसऱ्यावर अवलंबून का? आपलं मन तरी आपलं कशावरून? कायम ते दुसऱ्याचाच विचार का करतं? त्यातही ज्यांना आपली काही पडलेली नाही तिथच ते घोटाळत का फिरत? स्वतःचा विचार केला तर गुन्हा केल्यासारख का वाटत? कशात काही नसताना,स्पष्ट बोलण्याचा एवढा माजूरडेपणा अंगात आला कुठून? एक ना धड भाराभार चिंध्या. एवढा वेळ हाताशी असून काहीच का हातून घडत नाही? आयुष्यातल एकही दान आपल्या मनासारख का पडत नाही? ढेकळाचा एक मोठ्ठा तुकडा विरघळला. पुन्हा पाणी गढूळ... गढूळ ....

कुठल्याच क्षेत्रातलं सगळं काही आपल्याला का कळत नाही? एवढया सगळ्या गोष्टीत रस असूनपण आपण कुठल्याच गोष्टीत तरबेज का नाही? माणसं येतात थोडया वेळापूरता जीव लावतात. आपला जीव त्यांच्यात गुंतत जातो. माणसं काम झालं की जीव काढून घेतात, आपला जीव तिथच घुटमळत पडतो. का आपल्याला निःसंग होता येत नाही ? खरं आहे तुमचं म्हणणं, ज्याला त्याला आपलं

पडलयं आणि मला मात्र दुसऱ्याची गाढवं आपल्या ताटात ओढून घ्यायच व्यसन जडलयं, त्यांना गरज नसताना !
मग मी हळहळतो, त्यांच्यासाठी पळ पळ पळतो, त्यांच्या आठवणी काढ काढून जीव तळमळतो .... आरर्र काही किडेही होते वाटत त्या ढेकळात, हातपाय मारत पळताहेत वर, काही दिसत नाहीए त्यांनाही आणि मलाही ! सगळं गढूळ ... गढूळ...

येणारा प्रत्येक क्षण मला वेगळं काहीतरी खूणावतो,जाणारा प्रत्येक क्षण मला अपराधी ठरवतो,  इतिहास काही विसरत नाही, भविष्य काही उमगत नाही आणि वर्तमानात जगता येत नाही अशी अवस्था झालीय........ थोडं थांबाल का? लगेच नका दुसरं ढेकूळ टाकू. एवढ पाणी जरा स्वच्छ होऊ द्या. थोडं थांबा ... अरे .. अरे ... धप्प धप्प...... गढूळ ..गढूळ.
©ॲड. आनंद रा. देशपांडे.

22-03-20

## 8. सांज ये गोकुळी ......

गेल्या तीस वर्षात रायगड हा आयुष्याचा अविभाज्य भाग झालाय.एखाद्या वर्षाचा जरी गॅप पडला तरी जीव कासावीस होतो. पंचवीसेक इतिहास संस्करण शिबीरे झाली गेल्या तीस वर्षात रायगडावर. सगळ्या आखीव कार्यक्रमात दुसऱ्या दिवशीचा संध्याकाळचा कार्यक्रम म्हणजे टकमक टोकावर किंवा हिरकणी टोकावर बसून बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या आवाजात, प्रतापरावांच्या बलिदानाची गाथा ऐकवणे. नीरव शांततेत कथेतली शेवटची भैरवी पूर्ण व्हायची. बरोबरीचे पंचवीस, पन्नास, शंभरजण भारावलेले, डोळ्यांच्या कडा ओलावलेल्या. कुणाच्या पापण्यांना तोही भार सहन व्हायचा नाही. नजर समोर सूर्यावर खिळलेली.

कोकण दिव्याच्या उजव्या हाताच्या डोंगररांगेला चिकटलेला अस्ताला जाणारा सूर्य. सगळे स्तब्ध असायचे. आकाश सगळं विरागी भगव्या रंगानं माखलेलं. कुणाचीच काहीच बोलायची इच्छा नसे. सांजवेळ अशीच कातरवेळेत परिवर्तित झालेली आणि अचानक आशाताईंची आलाप कानावर यायची सोबतीला सुधीर मोघ्यांचे दैवी शब्द अन्

श्रीधर फडक्यांच स्वर्गीय संगीत ... सांज ये गोकूळी .. सावळी सावळी. त्या तिकडे पार क्षितीजापासूननिघालेला भाला खच्चकन हृदयात घुसायचा. आत्ता या क्षणापर्यंत पापण्यांआड दडवलेला आसवांचा पूर बांध फोडून बाहेर वाहू लागायचा. समोर पसरलेला अफाट सहयाद्रि. पाचाडवर उतरणारी शेवटची सूर्यकिरणे, गळ्यातली घाटरं वाजवीत हिरकणीवाडीकडे परतणारी गुरं. आता या वेळेला या गाण्याच्या पार्श्वभूमीला आणखी काय हवं? गाण्यातली ओळ न् ओळ समोर साकारत असायची.

पर्वतांची दिसे, दूर रांग
काजळाची जणू, दाट रेघ

या रेघेवरच तो सूर्यनारायण टेकलेला असायचा.

धूळ उडवीत, गाई निघाल्या
शाम रंगात, वाटा बुडाल्या

हिरकणीवाडीत किंवा रायगडवाडीत परतणाऱ्या गायींचे कळपही दृष्टीस पडायचे.

माऊली सांज, अंधार पान्हा
विश्व सारे, जणू होई कान्हा


सभोवतालचा दाटून येणारा अंधार सोबतीला त्याच सावळ्या चाहूली घेऊन येत असे.

वाटायचं आता इथून ऊठूच नये, असच त्या अंधाराच्या पांघरूणात गुडूप व्हाव.

काही काही गाणी एखाद्या ठिकाणासाठीच लिहीली आहेत किंवा त्या गाण्यांचा पारलौकिक अर्थ त्या ठिकाणीच उलगडतो अस काहीसं असावं. त्यामुळे आजं कुठही हे गाणं ऐकलं की मी हिरकणीवर मनाने कधीचं पोहोचलेला असतो. डोळे अंतरात वळतात. तीच ती चिरपरिचीत दृश्य मालिका सुरू होते. शरीर कुठेही असलं तरी मन रायगडाच्या कातळावर विसावत.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

(Image Curtacy - Google Images)



26-03-20

## 9. माणसातलं .... माणूस .....

खर तर मला माणसातल जनावर अस शीर्षक द्यायचं होतं पण जनावरातही काही मर्यादा असतात, काही नियम असतात, थोडाफार विवेक असतो, तेवढाही माणसांत आता शिल्लक राहिलेला नाही, म्हणून म्हटल जनावरांना का उगाच नावं ठेवा? एखादा हरणाचा कळप दिसला म्हणून, वाघाने एकदम पाच पंचवीस हरणे मारून, स्वतःपुरती पाच सहा ठेवून, बाकीची वीस इतरांना चढया भावाने विकल्याचे आपण कधी ऐकले नाही.

सगळ जग एका राष्ट्राने आपल्या आर्थिक साम्राज्याच्या सुबत्तेपायी मरणाच्या दारात आणून उभे केले आहे, त्यासाठी स्वतःचे हजारो नागरीक जाणीवपूर्वक मारण्याची पण तयारी यांनी ठेवली व तसे केलेही. उपाययोजना नसलेले वैश्विक संकट निर्माण करून सगळ्या जगाला भिकेला लावणारी ही मानसिकता केवळ माणसातच असू शकते. पक्षी प्राणी इतक्या नीच पातळीवर कधीच उतरत नाहीत. उद्या समजा झालेच ते राष्ट्र एक नंबरचे, पण जर

मानवजातच उरली नाही तर राज्य तरी कोणावर करणार? उत्पादित केलेला हजारो टन माल, जगातील अन्य देशांनी घ्यायचा नाकारला तर काय करणार? पण स्वार्थी लोकांना असले प्रश्न पडत नसतात.

सार जग आपापल्या पातळीवर उपाययोजना करीत असताना, त्या अंमलात आणताना मात्र प्रशासनाच्या नाकी नऊ येत आहेत. मला तर वाटत की सार जग जबाबदार आणि बेजबाबदार या दोनच गटात विभागलं गेलं आहे. इथ धर्माचा, देशाचा, जातीचा, शिक्षणाचा काही संबंधच उरलेला नाही. माणूस जबाबदार का बेजबाबदार ओळखण्याची एकच फूटपट्टी उरली आहे ती म्हणजे त्याच्यावरचे संस्कार आणि त्याच आचरण.

हा सगळाच कालखंड परीक्षा पहाणारा आहे. आपल्यातल्या संयमाची परीक्षा, आपल्यावरच्या संस्कारांची परीक्षा, कुटुंबातल्या नातेसंबंधाची परीक्षा, आपल्या मैत्रीची परीक्षा, आपल्या आग्रहाची, आपल्या निग्रहाची, आपल्या भोगाची, आपल्या त्यागाची सगळ्याची परीक्षा होणार आहे. काही परीक्षा रद्द झाल्या म्हणून काही जण खूष झाले पण सगळ्या मानवजातीचीच एकदम परीक्षा लागली आहे. निकाल मात्र

भयंकर असणार आहे. उत्तीर्ण झालो तर जीवनदान आणि नापास झालो तर थेट मृत्यू.

पृथ्वीवरच्या सर्वच सजीवांना, विशेषतः माणसांना, इतर सजीवांबरोबरच्या सहजीवनाचा नव्याने विचार करावा लागणार आहे. काय खायच? किंबहुना काय काय खायच आणि काय काय नाही खायच? याचा शेवटचा विचार करण्याची  संधी परमेश्वराने दिलेली आहे, त्याचाही विचार करावाच लागेल.

आता शेवटच्या दोन गोष्टी ....

विज्ञानाच्या मर्यादा आता स्पष्ट झाल्या आहेत. वागण्या बोलण्यातली आणि आचरणातली नैतिकता ही सध्याच्या घडीला विज्ञानापेक्षा वरचढ ठरली आहे हे मान्यच करावे लागेल. आपल्या अहंकाराला अलंकार घालण्यासाठी कुठल्यातरी धर्माचे, वैचारिक परंपरेचे, इझमचे निष्ठावंत पाईक असण्याचा मोठेपणा मिरवणारे एक माणूस म्हणून किती उथळ आणि अपरिपक्व आहेत हे या संकटाने जगाला दाखवून दिले आहे.

आताचे हे एकवीस दिवस किंवा यापुढे गरज पडली तर काढावे लागणारे कितीही दिवस, हे शेवटी डोळस श्रध्देच्या

आणि आत्मबलाच्या जोरावरच काढावे लागणार आहेत. पण त्यासाठी आपल्या जीवनाला एक बैठक असावी लागते, एक पाया असावा लागतो. तो विचारात मुरवावा लागतो आणि आचरणातून दिसावा लागतो. असा कुठला भक्कम पायाच आपल्या जीवनाला अथवा व्यक्तिमत्वाला नाही याचा साक्षात्कार या संकटाच्या निमित्ताने आपल्या सगळ्यांना झालेला आहे, त्यामूळे भूकंपात इमारती थरथराव्यात तशी आपली अवस्था झाली आहे. येते काही दिवस मिळालेला अवधी हा तो पाया निर्माण करण्यासाठी उपयोगात आणूयात. जे पशुपक्षात नसतं , कृमी किटकात नसतं आणि जे केवळ माणसातच असतं, अस एक विकृत माणूसपण आपल्यात निर्माण झालय ते संपवण्याचा निर्धार करु. आपल्या पूर्वसूरींनी दिलेल्या दोन घोषणा या परिस्थितीत अंमलात आणण्याचा विचार करु. एक वसुधैव कुटंबकम म्हणजे सारे विश्व एक कुटुंब आहे आणि दुसरी कृण्वन्तो विश्वमार्यम म्हणजे साऱ्या जगाला आर्य म्हणजे सुसंस्कृत करुयात. सगळ्यात महत्वाचे म्हणजे याची सुरुवात स्वतःपासून करुयात. सर्वेः पि सुखिनः सन्तु.......

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

30-03-20

## 10. चुळ चुळ मुंगळा .......

परवा दिवशी बहिणीचा फोन आला, म्हणाली, "अरे, तुला बाहेर पडून एक महिना झाला की?" मी हसलो. खरं आहे. तेवीस फेब्रुवारीला माझ्या हस्ते मुंबईत एका पुस्तकाचे प्रकाशन होते ते उरकून आलो आणि त्यानंतर बाहेर पडताच आले नाही. मागं एका लेखात मी म्हटलं होतं, व्यसन असलेच तर ते एकमेव व्यसन म्हणजे प्रवास. सलग पंधरा दिवस घरात कधी पाय ठरतच नाही. कुठलं ना कुठलं निमित्त काढून गडी पसार. अगदीच काही कारण नाही मिळाल तर एखादा दिवस पुण्यात जाऊन मित्रांना भेटून परत. अलीकडचे प्रवास जरा आरामदायक होते त्यामुळे त्याचा कंटाळा येत नसे.

ही फिरण्याची सवय खूप लहानपणापासूनची. मी गंमतीनं आईला म्हणत असे, "माझ्या पाचवीला काय एस.टी.पूजली होती का काय?" गंमतीचा भाग सोडला तर गेली पस्तीस वर्ष अखंड प्रवास सुरु आहे. कधी सकारण तर कधी अकारण.

समर्थांनी एके ठिकाणी छान म्हटलय,

सृष्टीमध्ये बहु लोक,

परिभ्रमणे कळे कौतुक,
नाना तरीचे विवेक आढळों येती.

आजपर्यंत जे काही हिंडलो ते डोळे उघडे ठेऊन हिंडलो, त्यामूळे खूप छान अनुभवांची शिदोरी जमा झाली. त्यातलं जे चांगल होतं ते सगळ्यांसाठी वाटून टाकलं, कधी 'कातळमनीचा ठाव' या पुस्तकाच्या रुपाने तर कधी 'काही जनातलं काही मनातलं' या पुस्तकाच्या रूपाने. हिणकस होतं, ते सगळ मजपाशी ठेऊन घेतलं आहे. ते सगळ बरं वाईट अनुभवांचं गाठोडं या पंधरा दिवसात आवरायला घेतलं आहे. पुन्हा पुन्हा नव्याने एकेक अनुभव हाताळतोय. अशी ही अंतर्मुख करणारी, सगळ्या अनुभवांचा पुर्नविचार करायला लावणारी संधी कधी मिळणार ? या ऐच्छिक किंवा अनैच्छिक गृहबंदीनंतर, पुन्हा जो प्रवास सुरू होईल तो कोऱ्या पाटीने! जवळचं गाठोडं थोडं हलकं झालेलं असेल. काल बोलता बोलता ही आमच्या मुलीला म्हणालीच, "तुझे वडील म्हणजे नुसता चुळचुळ मुंगळा आहे. इतके दिवस कसा घरात रमला आहे कुणास ठाऊक?"

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

01-04-20

## 11. तुजविण जाऊ शरण, शरण कोणा ?

सकाळ, संध्याकाळ, टीव्ही, फेसबुक, सगळीकडे एकाच विषयावरच्या बातम्या, चित्रे आणि पोस्ट पाहून मन विषण्ण होत आहे. मागच्या लेखात म्हटल्यासारखं सगळं जग जबाबदार आणि बेजबाबदार माणसे या दोन गटातच विभागलं गेलं आहे. जबाबदार माणसे, स्वतःबरोबर इतरानाही वाचवायची पराकाष्ठा करताहेत आणि बेजबाबदार माणसे, आपल्यासकट इतरांनाही मरणाच्या खाईत ढकलताहेत. का तर म्हणे धर्माची आज्ञा आहे !

या साऱ्या वातावरणात काल एक, दोन ओळीची पोस्ट वाचली. अदृश्य असणारा विषाणू जीव घेऊ शकतो याविषयी खात्री बाळगता तर मग अदृश्य असणारा परमेश्वर यातून वाचवूही शकतो यावर का नाही विश्वास ठेवत? पण तसे करणे म्हणजे प्रतिगामीपणाचे ठरते ना? किती ठिकाणी प्रत्यक्ष भगवंताने सांगून ठेवलय की जो कोणी अनन्य भावाने मला शरण येईल त्याच रक्षण, पालन पोषण करण्याची जबाबदारी माझी आहे. इथे अनन्य भावाने शरण या शब्दांना प्रचंड अर्थ आहे. अन्य कुणालाही शरण न जाता तू समर्पित

भावाने मला शरण येशील तर तुझ्या रक्षणाची जबाबदारी माझी आहे.

अनन्यासि रक्षितसे चापपाणी..

पण आमची बुद्धि, आमचा अहंकार, आमचं शिक्षण, आमची संपत्ती, आमचं सामाजिक वजन आम्हाला कुणापुढ वाकायची परवानगी आणि शिक्षणच देत नाही, त्यामुळे मग आम्हाला या गोष्टी अंधश्रद्धा वाटायला लागतात. असो,

वातावरण गढूळ आहेच, त्यात काही मंडळी जाणीवपूर्वक माती कालवत आहेत. आपण यात काहीच करू शकत नाही ही जाणीव मनाला टोचणी निर्माण करणारी आहेच. या सगळ्या घोळात सगळ्यांनी मानसिक दृष्टीने खंबीर रहाणे अत्यंत आवश्यक आहे. माझ्यापुरतं मीही प्रयत्न करतोय. दासबोधाचं वाचन सुरु आहे. पण इतरांनीही जेव्हा केव्हा अशी मरगळ येईल, उदास वाटेल तेव्हा,

समर्थाचिया सेवका, वक्र पाहे,

असा सर्व भूमंडळी, कोण आहे?

अस मोठयानं म्हणून पहा, धीर वाटल्याशिवाय रहाणार नाही. बाकी सरकार देत असलेल्या सूचनांच तंतोतंत पालन करा. शेवटी एवढेच म्हणेन, यातूनही परमेश्वर सर्वांना

सुखरूप बाहेर काढेल, मग तो एखाद्या डॉक्टरच्या स्वरूपात असेल, नर्सच्या, वॉर्डबॉयच्या स्वरुपात असेल, पोलिस किंवा सफाई कर्मचाऱ्याच्या स्वरूपात असेल कारण ..

ना जाने किस रुपमें नारायण मिल जाए ....?

©अॅड. आनंद रा. देशपांडे.

(Image Curtacy – Shri. Parag Ghalsasi)



04-04-20

## 12. आचारसंहिता ....

सध्या सगळे लक्ष्मणरेषेत कोंडले गेले असल्याने, सगळ्यांनाच चिंतनाला भरपूर वाव आहे. असाच नेहमी सतावणारा एक प्रश्न काल रात्री पुन्हा मनात डोकावला, कलियुगातील आदर्श आचारसंहिता कुठली ? तुम्हाला वाटेल, हे काय नवीन ? म्हणून थोडं स्पष्ट करून सांगतो. आपली कुठलीही कृती, ही नेहमी दोन पातळ्यांवर घडत असते. एक विचारांची पातळी आणि दुसरी आचरणाची पातळी. आता यातली नेमकी कुठली पातळी आचारसंहितेसाठी आधारभूत मानायची? म्हणजे परत स्पष्ट करतो, वाचिक पातळीवर म्हणजे बोलताना, ओवी आणि शिवी यांच्यामधली नेमकी सीमारेषा कोणती? आर्थिक बाबतीत नेमकं प्रपंचासाठी आवश्यक असलेलं धन, कोणत्या सीमारेषेनंतर हव्यासात परिवर्तित होतं? आचरणातली नेमकी कोणती कृती नैतिक आणि कोणती अनैतिक? साहित्यातला शब्दांचा वापर नेमका कुठपर्यंत श्लिल आणि कशानंतर अश्लिल? आता हे सगळं या

कलियुगात कशाच्या आधारावर प्रमाणित केलं जातं? तपासून पाहू जावं तर नैतिकतेच्या व्याख्या अजूनही सत्ययुगाशी संबंधित आहेत. कलियुगाशी ताळमेळ असणारी वर्तणूक, आजही त्याज्य आणि अनैतिक ठरवली जाते. काया, वाचा, मने या स्तरावर गोष्टी घडत असताना मनाच्या पातळीवरची एखादी विकृती अथवा वैचारीक घडामोड ही कायेच्या पातळीवर उतरेपर्यंत पाप समजली जात नाही, पण मनाला मात्र त्याची बोच लागून रहाते. वाचिक पातळीवरचं नामस्मरण कायेच्या आणि मनाच्या पातळीवरच सगळं दुराचरण धुवून काढू शकतं असं सांगितलं जातं. संताचं सगळं साहित्य हे कलीयुगात निर्माण झालेलं आहे. त्यांचे जीवनप्रवास हेही कलियुगातीलच आहेत त्यांनी ही आदर्श आचारसंहितेचे पाठ सांगत असताना सत्ययुगाचे नियम, त्रेता आणि व्दापार युगातील दैवते ( राम आणि कृष्ण ) आधारभूत मानली आहेत. कलियुगाचा महिमा सांगत असताना माणसाच सगळ्या पातळीवरचं स्खलन गृहीत धरून वर्णनं केली आहेत. त्यातही जी माणसं उजडेल तिकडे उजडेल या वृत्तीने वागणारी आहेत, तीच या कलियुगात यशस्वी आणि प्रसिध्द होताना दिसतात. तुमच्या

आमच्यासारखी कुंपणावरची माणसे मात्र या सगळ्या मतमतांच्या प्रवाहात गटांगळ्या खाताना दिसतात. यामूळे मूळ मुद्दा अधिकच स्पष्ट आणि गहन होत जातो की नेमकी या युगाची आचार विचारांची आचारसंहिता काय? मूळात ती अस्तित्वात आहे का? असलीच तर ती कुणी निर्माण केली? कधी निर्माण केली? ती निर्माण करत असताना तिचा आधारभूत पाया काय होता? किती दिवस असं अनिश्चिततेच्या गर्तेत गटांगळ्या खात रहायचं? हे सगळं मनात येण्याचं खरं कारणसुध्दा सध्याची जागतिक परिस्थितीच आहे .आपल्या हजारो माणसांचा जाणीवपूर्वक बळी देऊन, जगात आर्थिक बाबतीत क्रमांक एकवर पोहोचणारा चीन आज यशस्वी दिसतोय, त्याच आधारावर धडपडणारी अमेरिका आज पराभूत दिसती आहे आणि यापैकी कुठल्याचं स्पर्धेत नसणारा आपला देश या परिस्थितीची फळं भोगतोय ! म्हणजे मग कोणं बरोबर? कोणं चूक? नेमकं हेच वैयक्तिक पातळीवरही घडत असतं आणि आपण काही कारण नसताना दुसऱ्याच्या पापाची फळं भोगत असतो, म्हणून विचारलं की कलीयुगाची नेमकी आचार संहिता कुठली? मुद्दा चर्चेसाठी तुम्हां सर्वांसमोर

ठेवला आहे, हाताशी वेळ भरपूर आहे, विचार करा आणि काही सापडलच तर कळवा. वाट पहातोय. (नाहीतरी सध्या आपण काय करु शकतोय म्हणा).

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

05-04-20

## 13. समयी धारिष्टयं धरणे .......

आपलं घर, आपलं कुटुंब, आपली सर्व सुखसोय, आपल्या आवडीचे पदार्थ, आपलं वेळापत्रक, कुणाचीही ताबेदारी नाही एवढं असूनही आम्हाला फक्त एकवीस दिवस घरात थांबणे होईना आणि आम्ही स्वतःला शिवाजी महाराजांचे अनुयायी म्हणवून घेणार? प्रत्यक्ष शिवाजी महाराजांवर जेव्हा अशी वेळ आली होती,तेव्हा त्यांनी काय केले असेल?

**१ ) पन्हाळ्याचा वेढा :**

महाराज पन्हाळ्यावर पोहोचले त्या दिवशी तारीख होती

दि.२ मार्च १६६०. (चैत्र शुध्द प्रतिपदा) आणि पन्हाळ्यावरून सूटले, त्या दिवशी तारीख होती

दि.१२ जूलै १६६०. ( आषाढ शुध्द पौर्णिमा ) म्हणजे तब्बल १३२ दिवस म्हणजे पूरेपूर ४ महिने आणि १२ दिवस महाराज पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले होते. काय पध्दतीने सुटका होईल? कधी होईल? याची शाश्वती नाही. मे महिन्यातच शाहिस्तेखान, सव्वा लाख फौज घेऊन पूण्यात येऊन बसलेला अशा सर्व परिस्थितीत महाराजांच्या

जिवाला किती काळजी लागली असेल ? याचा आपण कधी विचार केला ?

**२ ) आग्ऱ्याहून सुटका :**

महाराज आग्ऱ्यात प्रत्यक्ष कैदेत पडले तो दिवस होता, दि २९ मे १६६६ आणि महाराज प्रत्यक्ष सुटले तो दिवस होता दि . १७ ऑगस्ट १६६६म्हणजे तब्बल ८० दिवस महाराज औरंगजेबाच्या प्रत्यक्ष कैदेत होते. बर कैद पण अशी की ज्या दिवशी सुटका होईल, त्या दिवशी मृत्यु ठरलेलाच ! ज्या औरंगजेबाने आपले छत्तीस नातेवाईक, शहेनशहा होण्यासाठी कापून काढले, तो महाराजांना थोडाच जिवंत सोडणार होता ? स्वराज्याचं अर्ध मंत्रिमंडळ आणि युवराज बरोबर, त्यासोबत आलेली साडेतीनशे मावळे मंडळी. कसे काढले असतील ते ८० दिवस महाराजांनी? बरं, नुस्ते कपाळाला हात लावून बसून दिवस काढायचे नव्हते, सुटकेची योजना यशस्वीपणे तयार करून राबवून निसटून जायचे होते आणि सुखरूप राजगडावर पोहोचणे अपेक्षित होते. विचार करा, काय डोक्याचा भुगा झाला असेल ?

या पार्श्वभूमीवर आम्हाला हे एकवीस दिवस फक्त घरात बसायचे आहे तर आम्ही विव्हळतोय, टाळ्या वाजवा म्हटलं,

थाळ्या वाजवा म्हटलं तरी राग येतोय, दिवे लावा म्हटलं तरी राग येतोय. काही सन्माननीय अपवाद सोडले तर बाहेर जाऊनही आपण काय दिवे लावणार आहोत? सगळे ऐषाराम उपभोगत फक्त सुखाने घरात रहा हीच देशभक्ति आहे एवढं समजावून सांगितलं तरी आम्हाला कळत नाही. एवढी सुखद देशभक्ति कुणाच्या वाट्याला आली होती सांगा बरं ?
आपण खरोखर जर स्वतःला शिवरायांचे पाईक मानत असू तर त्यांच्याप्रमाणे या संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य आपण अंगी बाळगले पाहिजे असे वाटत नाही का ?
त्यांनी जसे,

**समयी धारिष्टय धरणे, अद्भूतचि कार्य करणे ||**

हे समर्थ वचन सार्थ करून दाखवले, तसेच आपणही या संकटातून सुटण्यासाठी आवश्यक तो संयम, धीर दाखवून ही लढाई जिंकण्याचा निश्चय करू.
छत्रपति शिवाजी महाराज की जय ....
©ॲड. आनंद रा. देशपांडे.

06-04-20

## 14. सहवीर्यं करवावहै.......

आज महावीर जयंती ! साऱ्या जगाला आचरणाचे महत्व आणि महात्म्य समजावून सांगणाऱ्या जैनपंथातील चोविसाव्या तीर्थंकरांची जयंती !! या देशाच्या हजारो वर्षांच्या महान परंपरेमध्ये, ज्या पंथांनी आपल्या आचार विचारात सातत्य राखलं, पूर्वापार चालत आलेल्या आपल्या परंपरा पुढच्या पिढीपर्यंत डोळसपणे पोहोचविल्या, त्यामध्ये जैन पंथाचा क्रमांक फार वरचा आहे.

कृमिकिटकांसह, इतर योनीतील साऱ्या सजीवांच, या साऱ्या निसर्गचक्रात एक स्वतःचं स्वतंत्र असं अस्तित्व आहे आणि ते तसच अबाधित ठेवणं हा त्यांचा हक्क आणि मानवाचं कर्तव्य आहे हे जैनांइतकं दुसऱ्या कुणीही समजावून सांगितलं नाही आणि पाळलंही नाही.

शाकाहार ही जैनांनी साऱ्या जगाला दिलेली एक फार मूल्यवान देणगी आहे असं मी मानतो. विकारांचे दुर्गुण आणि त्यांचे परिणाम सगळ्याच पंथीयांनी सांगितले, पण त्या विकारांवर जय मिळवण्यासाठी जो आचार, विचार आणि आहार जैनांनी सांगितला आणि पाळून दाखवला त्याला

तोड नाही. जगरहाटीमध्ये ज्यांच ज्यांच जे जे म्हणून उत्तम आहे आणि अंतिमतः सर्व प्राणीमात्रांना मोक्षाप्रत घेऊन जाणारं आहे त्याची प्रशंसा करणं आणि आपल्या जीवनात त्या उच्च मूल्यांचं आचरण करण्याचा प्रयत्न करणं हे प्रत्येक मानवाचं कर्तव्य आहे .


सद्दस्थितीत सर्व मानवजातीवर ओढवलेलं जे भयंकर संकट आहे ते प्राणिमात्रातील इतर सजीवांच्या जगण्याच्या हक्कावर आपण केलेल्या अतिक्रमणामूळे ओढवलेलं संकट आहे.

साप, उंदीर, वटवाघळे, पाली, झुरळं, कुत्री, मांजर या पशुयोनी ह्यासुध्दा या जीवनचक्राच्या साखळीच्याअत्यंत महत्वाच्या कडया आहेत आणि त्या जर आपण आपल्या हव्यासापोटी, बुभुक्षितांसारख्या खायला लागलो तर निसर्ग त्याच्या लेकरांचे संरक्षण करण्यास समर्थ आहे आणि वेळ पडलीच तर त्या प्राणिमात्रांच्या संरक्षणासाठी मानवजातीचा निर्दयीपणे संहार करण्यासही मागे पुढे पहाणार नाही हेच आत्ताच्या संकटाने दाखवून दिले आहे.

त्यामूळे आता गरज आहे ती सर्व प्राणिमात्रांच सहअस्तित्व मान्य करण्याची, आपल्या आहार विहारात सुसंस्कृतपणा

आणण्याची. हेच तर जैनांनी हजारो वर्ष सांगितलं आणि पाळूनही दाखवलं म्हणून आजच्या या महावीर जयंतीच्या दिवशी या थोर परंपरेबद्दल कृतज्ञता व्यक्त करुया आणि भगवान महावीरांना वंदन करूयात. जय जिनेंद्र .🙏🙏

©ॲड.आनंद रा.देशपांडे.



( Image Curtacy - Google Images)

07-04-20

## 15. अन्नदाता सुखी भव ....

सगळं बंद, सगळे व्यवहार ठप्प, वर्कफ्रॉम होम, अशी कुठलीही सवलत नसलेलं, अहर्निशं सेवामहे ( आजच्या भाषेत२४x७) अशी सेवा देणारं आणि तीही जीवावर उदार होऊन, असं एकमेव क्षेत्र आहे, ते म्हणजे शेती आणि शेतकरी!

आजच्या घडीला कशाचाही बाऊ न करता तुमच्या माझ्यासारख्या घरात बसून असलेल्या कोट्यावधी लोकांच्या पोटात अन्नाचा घास पडतोय तो केवळ आणि केवळ शेतकऱ्यामुळं! आणि ही वस्तुस्थिती कोणीही नाकारणार नाही. आपल्या घरापर्यंत भाजी, हातगाडीवाला आणत असला तरी ती भाजी शेतकऱ्याने शेतात पिकवलेली असते हे कदाचित पुढच्या पिढीला माहितही नसेल.

दुर्देवाने आजच्या घडीला देशातील सर्वात दुर्लक्षित क्षेत्र शेती आणि सर्वात दुर्लक्षित माणूस शेतकरी हाच आहे. आत्तासुध्दा या बंदमुळे औद्योगिक जगताचं किती नुकसान झालं किंवा होणार? बँकांच्या वसूलीच काय होणार? सॉफ्टवेअर क्षेत्रातल्या नोकऱ्या रहाणार की जाणार?यावरच

जास्तीत जास्त चर्चा सुरू आहेत. पण या बंदच्या काळात जो तूम्हा आम्हाला सुखाचे चार घास भरवतो आहे त्याच्याकडं कुणाचं लक्ष आहे? शेती हे एकमेव क्षेत्र असं आहे जिथं रक्त, घाम गाळून अन्न पिकवणारा माणूस त्याची किंमत ठरवू शकत नाही. ज्यांनी कधी शेतातल्या ढेकळात पाय घातलेला नसतो, शुभ-लाभ लिहिलेल्या तक्क्याची पाठ सोडलेली नसते अशी मंडळी शेतकऱ्याच्या मालाचे भाव ठरवतात.

शेतकऱ्याच्या पोटाला असं किती लागतं? म्हणत उद्दामपणे त्याच्या सव्वारूपये किमतीच्या मालाची किंमत चार आणे ठरवतात आणि स्वतः त्याच्यावर अडीच रुपये मिळवतात. या संकटकाळात तूमच्या आमच्या पाठीशी आणि पोटाशी खऱ्या अर्थाने उभा आहे तो शेतकरी. त्याच्यासाठी आपण ना टाळ्या वाजवल्या ना दिवे लावले, पण उद्या जिवाच्या भीतीने त्यानेही जर घरात बसायचे ठरवले तर रिकाम्या थाळ्या मात्र वाजवाव्या लागतील. महिन्या दोन महिन्यानंतर जेव्हा केव्हा सगळ सुरळीत होईल तेव्हा खूप गोष्टींचा नव्याने विचार होईल.

थोडासा विचार शेतकऱ्यांचापण करा असा आग्रह आपण सर्वांनी सरकारला केला पाहिजे. कर्जमाफी देणे म्हणजे शेतकऱ्याचा विचार करणे हा विचार सोडून दया.

जो लाखांचा पोशिंदा आहे त्याला काय स्वाभिमानाने जगायला आवडत नाही? तो कशाला मनापासून कर्जमाफीची भीक मागेल? पण त्याच्यावर ही पाळी येणार नाही अशी परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी तुमची आमची आहे आणि ते आपण मनापासून करुयात. आजपासून आठवणीने एवढच करा जेवण झाल्यावर हात धुवायला उठण्यापूर्वी ताटाला हात लावून नमस्कार आणि कृतज्ञतापूर्वक शेतकऱ्याचे स्मरण करुन म्हणा,

**...** अन्नदाता सुखी भव ..... ©ॲड. आनंद रा. देशपांडे.



12-04-20

## 16. सुख दुखतयं .......

भोवतालची परिस्थिती, कुटुंबात असूनही मनाचा एकटेपणा, सदैव जे अप्राप्य आहे त्याची ओढ, कुठल्याच स्थितीत मनाच समाधान न मानण्याची वृत्ती या सगळ्या गोष्टींना माझी आजी एकच शब्दप्रयोग वापरायची ते म्हणजे ... लेकांनो तुमच सुख दुखतय, अगदी खरय. मानवी मन हे असच आहे. ते कायम हातच सोडून पळत्याच्या पाठीमागे लागत. कुठल्याही अवस्थेत मनाला समाधान मिळू दयायचं नाही ही मनाचीच खोड आहे. आत्ताच सोडून दया,पण इतर वेळेलाही आपण पहातो की सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक कुठल्याही पातळीवर आपण कधीच समाधानी असत नाही. आहे त्यापेक्षा जास्तीच्या सुखाची अपेक्षा करत असताना आपण त्या सुखाला पात्र आहोत कां? याचा आणि एवढा साधा विचारही आपण करत नाही. सतत अस्वस्थ, असमाधानी आणि अप्पलपोटे असण्याचा आपल्याला शाप आहे. याच्या कारणांचा विचार केला तर एक महत्वाचा मुद्दा लक्षात येतो की, आहे त्यात समाधानी आहे असं म्हणलं तर लोक आपल्याकडं दुर्लक्ष करतील का? आपल्याला विसरून

जातील कां? याची एक भीती सारखी आपल्याला वाटत असते, त्यामूळे लोकांच्या विचारांच्या, भावनेच्या केंद्रस्थानी रहाण्यासाठी, मग माणसे नानाप्रकारच्या युक्त्या करतात. अगदी लहान मूलं करतात तशा. लोकांना जसं स्वतःचं कौतुक करुन घ्यायला आवडतं, तितकच किंबहुना थोडं अधिक स्वतःची कींव करुन घ्यायला आवडतं.

(काही सन्माननीय अपवाद वगळता). त्यासाठी मग लोक नानाप्रकारच्या कहाण्या रचतात, रडायची नाटकं करतात. एकूण काय तर, ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असू दयावे समाधान ... हे कुणाच्या पचनी पडत नाही.

आत्ताचचं बघानां, केवळ घरात राहून तुमचा जीव वाचवणं शक्य आहे हे सांगूनही लोकांना पटत नाही. काही ना काही कारण काढून लोक बाहेर जाऊन येतातच. घरात बसूनसुद्धा डालगीत डांबलेल्या कोंबडीसारखी, सारखी कुरकूर सुरुच. काहींना अतीशिस्तीचे डोहाळे तर काहींचे पाककलेचे सोहाळे. कुणी घरात पुस्तकच नाही म्हणून अस्वस्थ तर कुणी नेट स्लो चालतयं म्हणून चिडचिडे. चोवीस तास घरात घुमणाऱ्या बापाकडून कौतुकाऐवजी एखादा जास्तीचा धपाटाच मिळण्याची पोरांना भिती. पाच मिनीटसुद्धा जपाची

माळ हातात धरण्याची कुणाची तयारी नाही. घरात मुद्दाम दाखवण्यासाठी म्हणून शोकेसमध्ये आणून ठेवलेला गाथा, दासबोध हातात धरण्याची इच्छा नाही. दोन तिथं चारवेळेला खाऊन पुन्हा पंतप्रधानांच कस चुकतयं, मुख्यमंत्री कसे नुस्ती भाषणं ठोकताहेत, याच्यावर फक्त भरल्यापोटी प्रवचनं आणि उरला सुरला वेळ व्हॉटस्अपच्या कचराकुंडया भरणे आणि रिकाम्या करणे एवढाचं उद्योग ... होय ! होय ! मीही त्यातलाच !! नाहीतरी हे काय करतोय? म्हणूनच म्हणतोय, बाकी काही नाही, सुख दुखतयं आपलं...
© अॅड. आनंद रा. देशपांडे.

14-04-20

## 17. जाणता राजा - रायगड

१९८५ ते २०२०, जाणता राजा या महानाटयाला आज पस्तीस वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्त या नाटकाची एक अभूतपूर्व आठवण ........

असाध्य ते साध्य, करिता सायास ..

१९९५सालचा डिसेंबर महिना, तीस तारीख, महाडला जाणता राजाचे प्रयोग सुरू होते. शेवटचा प्रयोग. मी सकाळीच धावत पळत रायगडवरून परतलो होतो.

या प्रयोगादरम्यान, मी एक कल्पना बाबासाहेबांसमोर मांडली होती. तीस तारखेचा प्रयोग संपला की सगळ्या कलाकारांना घेऊन रायगडावर जाऊ आणि प्रत्यक्ष ज्याठिकाणी राज्याभिषेक झाला त्याठिकाणी राजसभेत सर्व साहित्यासह फक्त राज्याभिषेक सादर करू. बाबासाहेब काही तयार होत नव्हते. त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या, साहित्य वर न्यायची व्यवस्था, कलाकारांची व्यवस्था, अनेक अडचणी होत्या. पण मी इरेला पेटलो होतो. मी म्हणालो, "ते सर्व माझ्यावर सोपवा". मी आणि माझा मित्र श्रीनिवास वीरकर आम्ही दोघांनी ती जबाबदारी घेतली.

कामाला लागलो. महाडचे प्रयोग सुरु असतानाच, मी एकदोन वेळा रायगडावर जाऊन व्यवस्था करुन आलो. श्री. वीरकरांनी मुंबईचा किल्ला सांभाळला. शिवसेनेचे मा. गजाननराव किर्तीकर त्यावेळेस पर्यटन आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री होते. त्यांनी परवानगी तर मिळवून दिलीच, पण स्वतः सहकुटुंब रायगडावर येणार म्हणून आवर्जुन सांगितलं.

तीस तारखेचा महाडचा शो सुरु झाला. तोबा गर्दी !! मी शाहीर करत होतो आणि एका क्षणी समोरची प्रेक्षकांनी खचाखच भरलेली गॅलरी अकस्मात कोसळली. आरडाओरड, किंकाळ्या, प्रयोग थांबवला. सगळे कलाकार स्टेजवरून अपघातस्थळी धावलो. सगळ्या कोसळलेल्या नागरिकांना बाहेर ओढून काढलं. चाळीसएक जण गंभीर जखमी होते. त्या सगळ्यांना हॉस्पिटलला पाठवलं. आश्चर्य म्हणजे प्रयोग पुन्हा सुरू केला. प्रयोग व्यवस्थित पार पाडून मी आणि श्री रात्री अडीच वाजता रायगडला पोहोचलो. तिथच पायऱ्यांवर एक डुलकी काढून अंधारातच तडक गडावर आलो. सकाळी सहाला सगळे कलाकार पायथ्याशी पोहोचणार होते. सगळयांची कमीतकमी वेळात रायगड

चढण्याची स्पर्धा साडेसहाला सुरु होणार होती. मी निरीक्षक म्हणून हत्तीटाक्यापाशी येऊन बसलो. आमचा विद्याधर रायरीकर अवघ्या बावीस मिनीटांत गड चढून पहिला आला. दिवसभर सगळे बाबासाहेबांबरोबर गडभर फिरत होते. सगळ्या व्यवस्था, जेवणखाणं, प्रयोगाची पूर्वतयारी करताकरता माझी आणि श्रीची अवस्था बाजीप्रभू आणि मुरारबाजीसारखी झाली होती.

त्यातच एक संकट दत्त म्हणून उभे राहिले. तब्येत बिघडली म्हणून गागाभट्टांचे काम करणारे कलाकार गडावर आलेच नव्हते. एव्हाना प्रयोग होणार हा विश्वास बाबासाहेबांना आला होता. मला म्हणाले, "काळजी करू नको. मी करतो गागाभट्टांचे काम !"

संध्याकाळचे सात वाजले. कुणालाही न कळवता, किंबहुना कळणार नाही, याची खबरदारी घेऊनही, राजसभेत
मा. गजानन किर्तीकरांसह दोन-अडीच हजार माणसं जमली होती. माझ्यामागं शाहीरी फडात, तब्बल अठराजणं ऊभे होते. डोळ्याचं पारणं फेडणारा क्षण सगळेजण अनुभवत होते. तक्रार एकच होती, वारंवार डोळे भरुन येत असल्यान स्पष्ट दिसत नव्हतं. दाढी वाढलेले बाबासाहेब गागाभट्टांच्या

भूमिकेत एखाद्या ऋषीसारखे भासत होते आणि तो राज्यारोहणाचा क्षण, ज्या ठिकाणी तीन-साडेतीनशे वर्षांपूर्वी घडला त्याच ठिकाणी, तेवढ्याच उत्साहात, तेव्हढ्याच जोषात, त्या वैभवाची चुणुक दाखवणाऱ्या साहित्यासह घडून आला. सारा जीव पायात गोळा करून नाचलो त्यादिवशी !

आत्ता लिहीतानाही, डोळ्यातलं पाणी आवरत नाहीए आणि मग त्याच दिमाखात शिवछत्रपतींची मिरवणूक निघाली जगदीश्वरमंदिराकडे! असंख्य मशाली पेटल्या होत्या. शिंगे वाजत होती, ड्फ कडाडत होते. अष्टप्रधान आणि छत्राखाली असलेले महाराज सारेजण त्याच वैभवात मंदिराकडे निघाले. पोवाडे, गाणी, पदय नुसता कल्लोळ उठला होता. तब्बल दोन तासांनी ही मिरवणूक जगदीश्वराच्या मंदिरात पोहोचली. महाराजांनी आणि इतर सर्वांनी जगदीश्वराचे आणि शिवसमाधीचे दर्शन घेतले आणि मग समाधीच्या चौथऱ्यावर तो शिवयोगी, गागाभट्टांच्या वेषात बोलायला ऊभा राहिला.

तब्बल तासभर नुस्ती शिवगंगा ओसंडून वहात होती. शेवटी एक वाक्य म्हणाले, "आज एकतीस डिसेंबर१९९५, सार

जग वर्षाअखेर साजरं करीत असताना आपण एक इतिहास इथ घडवला आहे. साऱ्या जगापेक्षा वेगळ्या, जगावेगळ्या पद्धतीने". परतताना माझ्या पाठीवर हात ठेऊन म्हणाले, "करुन दाखवलतं तुम्ही!" बास! आणखी काय हवं होतं? ती संध्याकाळ राजसभेत साकारायला मिळालेला तो शाहीर, तो राज्याभिषेक, रायगडाला जायला लागल्यापासूनच माझं आयुष्यभराचं स्वप्न होतं ते, ते आज साकार झालं होतं. मन भरून आलं होतं.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

Image Curtacy - ©ॲड. आनंद रा. देशपांडे.



15-04-20

## 18. देणे ईश्वराचे ......

१९९२सालची ठाण्यातली जाणता राजाची पहिली मालिका, दुसरा दिवस. संध्याकाळचे पावणेसात वाजलेले. समोर खचाखच भरलेलं स्टेडियम. अंदाजे सतरा - अठरा हजार माणसं असावीत. मी त्यावेळेस शाहीरी फडात ढोलकी वाजवीत असे. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मी पंधरा मिनीटे आधी तयार होवून विंगेत येऊन बसलो होतो. तोच समोरून झपझप चालत बाबासाहेब माझ्याकडे येताना दिसले. मी चटकन उभा राहिलो. जवळ येऊन माझ्या दोन्ही खांद्यावर हात ठेवून म्हणाले, "आनंदराव, प्रयोग सुरु व्हायला फक्त पंधरा मिनीटे शिल्लक आहेत, विवेकराव अजून पुण्यावरून आले नाहीत. शाहीर करणार का?"

एक क्षणभर विचार केला आणि म्हणालो,"करेन की". "जावा मग ढोलकी सोडून शाहीराचा अंगरखा घालून या". पळतच अंगरखा घालून आलो. पहिलं शिंग वाजलं आणि महाराजांच स्मरण करून स्टेजवर पाऊल टाकलं. समोर पाहिलं तर बाबासाहेब साऊंडबॉक्समधे बसलेले. ज्या भूमिकेचा एक मिनीटाचा ही सराव केलेला नव्हता, ती मध्यवर्ती भूमिका

केवळ बाबासाहेबांच्या विश्वासाखातर आणि महाराजांवरच्या श्रध्देने साकार करायला उभा होतो.

प्रयोग पुढेपुढे सरकत होता. बहुधा जमून गेलं असावं. योग्य त्याठिकाणी, योग्य तो प्रतिसाद येत होता. शेवटी राज्याभिषेकानंतर हातात सोन्याचं कडं घातल्यानंतर, आनंदाने सहज म्हणून हातातला डफ हवेत फेकला, दोनच क्षण, तो ड्फ तसाच हातात स्थिरावला आणि कडकडून टाळी पडली. प्रयोग संपला. स्टेजवरून खाली उतरलो. कलाकारांच्या गर्दीतून वाट काढत बाबासाहेब माझ्याकडेच येत होते. जवळ आल्यावर नमस्कार करायला वाकलो तर त्यांनी उचलून पोटाशी धरलं. त्यांच्या नेहमीच्या स्टाईलने म्हणाले, "छानं".  मी भरून पावलो. त्यादिवशी हातात घेतलेला ड्फ पूढे जवळजवळ दोनशे प्रयोगातून शाहीर साकारून नव्याण्णवसाली खाली ठेवला. पुणे, मुंबई, जळगांव, लातूर, रत्नागिरी, सोलापूर ते पार अमेरिकेतसुध्दा शाहीर साकारला. पहिल्या शिंगापासून ते शेवटच्या तोफेपर्यंत अंगात जणू काही संचार होत असे.

माझ्या मनात मात्र एक खूणगाठ नक्की होती की मी इथे फक्त एक निमित्त आहे. कुणीतरी माझ्याकरवी हे घडवून

आणतयं. हे माझं नाही. आजही वळून जेव्हा त्या कालखंडाकडे पहातो तेव्हा हीच भावना मनात असते. कितीही भारलेला काळ असला तरी ते देणे ईश्वराचे .......

©ॲड. आनंद रा. देशपांडे



(Image Curtacy - ©ॲड. आनंद रा. देशपांडे.)

16-04-20

## 19. आचार - विचार ....

गेल्या पंधरा दिवसांपासून पेपर बंद करुन टाकला आणि टीव्हीवरच्या बातम्याही बघणे बंद करुन टाकले. राष्ट्रीय आपत्तीच्या काळात कसे वागावे, याचे प्राथमिक ज्ञानही आम्ही गेल्या पंचाहत्तर वर्षांच्या कालखंडात आमच्या जनतेला देऊ शकलो नाही. हे सुचायचे कारण म्हणजे संध्याकाळी एका मित्राचा फोन आला, त्याने सांगितले, मदुराईजवळ कुठेतरी एक बैल मेला तर त्याच्या अंतयात्रेत तीन हजार माणसे होती म्हणे.

काल अशाच एका घटनेत मुंबईत, एका ठिकाणी एकदम पाच सहा हजार माणसे जमली. सत्तर वर्षांचे आपले पंतप्रधान, आपले मुख्यमंत्री, आपलं पोलिस खातं घसा कोरडा पडेपर्यंत एकत्र येऊ नका, गर्दी करू नका म्हणून सांगत असतानाही, आपण बधीर असल्यासारखे वागतो आहोत, त्याच महत्वाच कारण म्हणजे आपल्यात असलेला राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव.

राष्ट्रीय आपत्तीच्या वेळेला आपण कुणीही असो, पण एक सामान्य नागरीक म्हणून कसं वागावं याच शिक्षणच आम्हाला कुणी दिलं नाही.

सारासारविचार, सतविवेकबुद्धि आणि तारतम्य हे कुठल्याही अभ्यासक्रमात शिकवलं जात नाही. ते गुण असतात संस्कारांमध्ये आणि ते संस्कार करणाऱ्या पिढीने उपजत म्हणजे जन्माला येताना घेऊन यायचे असतात आणि आचरणातून पुढच्या पिढीवर बिंबवायचे असतात. मग पुढची प्रत्येक पिढी ते अनुकरणातून त्याच्या पुढच्या पिढीवर ते संस्कार रुजवत जाते.

सध्या संस्कार, आचारधर्म म्हटलं की सगळ्यांच्याच अंगावर बाभळीच्या काट्याएवढा मोठा काटा येतो. अशा कुठल्याच शिक्षणाची सोय व सवय नसलेले नागरिक मग पंतप्रधानांच्या सूचनांची टिंगल उडवतात, स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या जीवाला धोका निर्माण करतात आणि पर्यायाने राष्ट्रीय हानीला कारणीभूत होतात. राजकीय व्यक्तिंना तर अशा राष्ट्रीय आपत्ती म्हणजे एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या, आरोप प्रत्यारोप करण्याच्या इष्टापत्ती वाटतात. पण यामधून

आपण सर्वसामान्य जनतेच्या नजरेतून किती खाली उतरत चाललो आहोत याचेही त्यांना भान रहात नाही.

लाखो माणसांच्या बलिदानातून जपानने हे राष्ट्रीय चारित्र्य मिळवले, जोपासले आणि वाढवले. याच राष्ट्रीय चारित्र्याच्या वाढीसाठी दोन हजार वर्षापूर्वी चाणक्याने जीवाचा आटापिटा केला होता. त्यानंतर महाराणा प्रताप, छत्रपति शिवाजी महाराज यांनी याचसाठी आपली आयुष्ये खर्ची घातली. आम्ही त्यांचे पुतळे जागोजाग उभे केले, पण त्यांनी दिलेले आदर्श मात्र जाणीवपूर्वक विसरले.

फक्त आपल्या घरातच रहा, एवढी साधी गोष्टसुद्धा आपल्या हितासाठी आपल्याला करणं जमत नसेल तर राष्ट्रीय चारित्र्याच्या बाबतीत तर आपण नापास आहोतच, पण वैयक्तिक हिताच्या बाबतीतही आपण तितकेच उदासीन आहोत हेच खरे. पण हा पराभव आपल्या एकटयाचा नाही, या समाजावर हे सामाजिक, नैतिक जाणीवेचे संस्कार करण्याची जबाबदारी असलेल्या जेष्ठांचा, श्रेष्ठांचा आणि समाजधुरीणांचाही हा पराभव आहे.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

17-04-20

## 20. असाही एक प्रयोग ......

बहुधा१९९४चा एप्रिल महिना असावा. इचलकरंजीला जाणता राजाचे प्रयोग सुरु होते. चौथा पाचवा दिवस असेल. दुपारपासूनच आभाळ भरुन आलं होतं. अवकाळी पावसाची चिन्ह होती. प्रयोग होणार का नाही? करायचा का नाही? काहीच नक्की नव्हतं.

पण मा. बाबासाहेबांचा एक शिरस्ता असे. काहीही होवो, प्रयोग सात वाजता सुरु होणार म्हणजे होणार. पाच वाजताच पावसाला सुरुवात झाली. चांगला तासभर सडाका पडून गेला. निरोप आला, प्रयोग होणार. सगळे तयारीला लागलो. शेवटून दुसरा दिवस असल्याने तुडुंब गर्दी. बरोब्बर सातच्या ठोक्याला प्रयोग सुरु झाला, पहिला अर्धा तास झाला असेल नसेल पुन्हा विजा चमकू लागल्या, बारीक थेंब सुरु झाले, मी अर्थातच शाहीर करत होतो, माझा पुढचा पोवाडा होता,

दख्खनचा मुलूख पेटला,<br>
सुरुंग लागला शाहीतख्ताला,<br>
जिंकीला मुलूख मराठ्यानं,<br>
भोसल्या शिवाजीराजानं,<br>
मारिल्या फौजा इरेसरीनं,

हो... जी ... जी.......
मी नेहमी सारखा उडी घेऊन धप्पकन खाली बसलो अन ठळ्ळ..... माझ्यासमोर लावलेल्या दिव्यांच्या हंडयातले पाचही एक हजार वॅटचे बल्ब पावसाचे पाणी पडून फूटले. माझ्यासमोर काचांचा सडा. कसला तरी आवाज होऊन वीजही गेली. प्रयोग थांबला.
बाबासाहेब समोरच साऊंडबॉक्समधे बसलेले होते. पाऊस सुरु झालाच होता. चटकन बाबासाहेब स्टेजवर आले. श्रोत्यांना दहा मिनीटं थांबायची विनंती केली. पाऊस काही थांबायचे नाव घेईना आणि वीजही येईना. बाबासाहेबांनी मनाशी काहीतरी निश्चय केला. स्टेजवर आले, सर्व जमलेल्या सात आठ हजार श्रोत्यांना उद्देशून मोठयाने म्हणाले, "पडत्या पावसात प्रयोग बघायची आपली तयारी असेल तर मशाली पेटवून आम्ही प्रयोग सादर करू". लोकांनी मनापासून तयारी दर्शविली. भराभरा मशाली पेटल्या, स्टेजवर पाच-सहा आणि बुरुज व मेघडंबरीत मिळून पाच-सहा अशा मशाली घेऊन मावळे उभे राहिले. तेवढ्याच मशाली राखीव ठेवण्यात आल्या. बॅटरीच्या बॅकअपवर साऊंड सुरु झाला.
एव्हाना, आम्ही आमच्यासमोरचा पडलेला काचांचा सडा अंदाजानं अंदाजाने स्वच्छ केला होता. जिथून नाटक थांबलं होतं तिथूनच पुन्हा सुरुवात झाली,

दख्खनचा मुलूख पेटला .....

अलौकिक दृश्य होतं ते! मशाल हातात धरलेले मशालजी एखाद्या खांबाप्रमाणे निर्विकार उभे होते, पाऊस पडत होता, कलाकार, प्रेक्षक दोघेही भिजत होते. एकाही प्रेक्षकाने छत्री उघडली नव्हती. त्यादिवशी मध्यंतर घेतलेच नाही. मशालींच्या उजेडात घडणारा प्रयोग खरोखर शिवकालाची आठवण करून देत होता. गंमत अशी की शिवाजीमहाराज आणि सोयराबाईसाहेब यांच्या खासगी महालातल्या प्रवेशालासुध्दा त्या दोघांबरोबर दोन मशालजी निर्विकारपणे शेजारी उभे होते.

दोन अडीच तासांचा उर्वरीत प्रयोग असाच पार पडला. शेवटची राज्याभिषेकाची तोफ उडाली आणि सगळ्या प्रेक्षकांनी एकदम उभे राहून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. त्या रात्रीने आम्हा सर्व कलाकारांना एक धडा मिळाला. अंगीकृत कार्य कितीही अडचणी आल्या तरी सुरुच ठेवायचे. परिस्थितीसमोर कधीच शरणागती पत्करायची नाही, शस्त्रे खाली ठेवायची नाहीत, अंतिम विजय आपलाच आहे. जयभवानी !!

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

18-04-20

## 21. वरुषे अमृताचा घनु ....

विश्रामबागवाडयात अश्वदलाचा एक कार्यक्रम होता. प्रमुख पाहुणे म्हणून सूर्यकांत मांडरे आणि नितीश भारव्दाज यायचे होते. नितीशजींचं स्वागत करायला मा. बाबासाहेब आणि सूर्यकांतकाका दरवाजात उभे होते. मी जीना चढून वर आलो आणि दोघांनाही वाकून नमस्कार करून आत गेलो. दोन मिनीटांनी मला एकाने निरोप दिला, की बाबासाहेब तुला दरवाजापाशी बोलवत आहेत. मी तडक दरवाजा गाठला. मला बघताच बाबासाहेब म्हणाले, "बघा, सरदार सूर्यकांतराव काय म्हणताहेत?" मी प्रश्नार्थक नजरेने सूर्यकांतकाकांकडे पाहिले. त्यांनी हसून माझ्या पाठीवर हात ठेवला म्हणाले, "मी श्रीमंताना विचारले,"हा मुलगा कोण आहे? शिवाजीमहाराजांच्या भूमिकेसाठी हा अतिशय योग्य आहे. आमचे दिवस संपले आता. आता यांचा जमाना सुरु व्हायला हवा". मी निशब्दं ! बाबासाहेब माझ्याकडे बघून हसत होते. भूमिकेचा योग येईल का नाही हे माहित नव्हतं, पण सूर्यकांतकाकांच्या पावतीने मी भरून पावलो होतो. ऐन थंडीचे दिवस ....... नागपूरमधली जाणता राजाची पहिलीच

मालिका. यशवंतराव चव्हाण स्टेडियम भरून जात असे. तशा थंडीत लोक रात्ररात्र तिकीटांच्या रांगेत उभी असायची. मी शाहीरी फडात ढोलकी वाजवीत असे. दुसरा किंवा तिसरा प्रयोग असेल. मध्यमवयीन शिवाजीमहाराजांचे काम करणाऱ्या कलाकाराला ताप आला. प्रयोगापर्यंत होईल बरे म्हणून सगळे निर्धास्त होते. पाच वाजताच्या कलाकारांच्या बैठकीला त्याला येणे शक्य झाले नाही, तेव्हाच प्रश्नचिन्ह उभे राहिले, काम करणार कोण, इतक्या ऐनवेळी? त्यात एक एन्ट्री घोडयावरून !! आणि अचानक बाबासाहेबांनी मला बोलावून सांगितले, एन्ट्री, एक्झिट समजून घ्या. मध्यमवयीन शिवाजीमहाराज तुम्ही करणार आहात. माझी अवस्था वर्णन करण्याच्यापलिकडची. सुर्यकांतकाकांचा आशीर्वाद फळाला आला तर ! नंतर कळालं की माझ्या काही जिवश्च कंठश्च मित्रांनी यासाठी दुपारपासून श्रीमंतांकडे हट्ट धरला होता. सात-साडेसातला अंगरखा घालून मेकअपला बसलो. जिरेटोप डोक्यावर ठेवण्यापूर्वी एकदा हातात धरून कपाळाला लावला. हृदयात आनंद मावत नव्हता, डोळ्यातले अश्रू आवरत नव्हते. एका विश्वविख्यात नाटयात माझ्या परमदैवताची भूमिका साकार करणार होतो.

स्टेजवरचा पहिला सीन संपवून घोडयावर बसलो, वाक्य घेतले आणि घोडयाला टाच मारली. घोडा नवीन होता. मला घेऊन तो पाठीमागच्या मैदानावर उधळला. इकडे कुणालाच पत्ता नाही.  साडेतीन मिनीटानंतर माझा पुन्हा स्टेजवर प्रवेश होता. घोडा मला घेऊन तुफान वेगाने गॅलरीकडे पळत होता. अचानक मैदानावर क्रिकेटचे नेट दिसले, मी घोडयासकट नेटमधे घुसलो. नेटमधे पाय अडकून घोडा पडणार आणि मीही, तेव्हढ्यात अंधारात कुणीतरी मला अलगद उचलून बाजूला घेतले. फक्त आवाज ऐकू आला, "लागलं नाही नां? पळ मग ". एका हाताने जिरेटोप सावरीत मी पळतच स्टेज गाठलं. स्टेजवर पाय ठेवला अन माझं वाक्य सुरु झालं. एवढ्या गडद काळोखात मला अलगद घोडयावरून उचलणारं कोणं होतं? आजपर्यंत हे न सुटलेलं कोडं आहे. पण आयुष्यात काही प्रश्नांची उत्तर शोधायची नसतात. अत्तराच्या कुपीसारखी ती मनात जपून ठेवायची असतात, जेणेकरून त्यांचा सुगंध आयुष्याच्या शेवटपर्यत दरवळत रहातो.

©अॅड. आनंद रा. देशपांडे.

18-04-20

## 22. मसाल्याची बाग .....

गेल्या तीस वर्षांच्या भटकंतीतले सगळ्यात आवडते ठिकाण कोणते? असे कुणी विचारले तर मी पटकन उत्तर देईन, माझं कोकणं ! खरोखर कोकणाइतका वैविध्यपूर्ण, निसर्गसंपन्न, अगत्यशील आणि मायाळू प्रदेश क्वचितच असेल.

२०१२ सालचा सप्टेंबर महिना. त्यावर्षीचं दुर्गसाहित्यसंमेलन विजयदुर्ग किंवा सिंधुदुर्ग याठिकाणी घ्यावं असं मनात योजून मी, अभिजित बेल्हेकर, डॉ. वीणा, विजय देव असे चारपाच जण कोल्हापूरच्या आमच्या राजू परुळेकरबरोबर निघालो. विजयदुर्ग करुन मालवणला पोहोचलो आणि तिथला आमचा मित्र गुरुनाथ राणे याच्या घरी आमचा मुक्काम होता. एके दिवशी गुरु म्हणाला, "इथं जवळचं आमच्या भाऊ सामंतची मसाल्याची बाग आहे. जा बघून या". काहीशा अनिच्छेनेच सगळे बाहेर पडलो. मालवण-पुणे रस्त्यावर चार किमीनंतर एक छोटा फाटा डाव्या हाताला आत वळतो. जाईपर्यंत आपण कुठे चाललोयं काही लक्षात येत नाही. एक घुमारदार वळण घेऊन गाडी

उतारावरून खाली एका विस्तीर्ण पटांगणात येऊन थांबली आणि आम्ही सगळेच अवाक झालो. अक्षरशः स्वप्नातलं गाव असावं तस्सं आहे घुमडं ! त्याविस्तीर्ण पटांगणाशेजारून वाहणारी एक छोटीशी नदी, त्या नदीवर एक छानसा साकवं (पूल), नदीच्या दोन्ही बाजूनी नारळी पोफळीच्या बागा, त्या नदीशेजारी एक टुमदार घुमडाईदेवीचं देऊळ, त्याच्या पाठीमागे भाऊची मसाल्याची बाग, बागेतून मधोमध वहात असलेला छोटा ओहळ; लवंग, दालचिनी, वेलदोडा, काळीमिरी, तमालपत्र, जायफळ, नारळ, सुपारी अशा विविधप्रकारच्या झाडांनी दाटलेली बागं. वेडेच झालो सगळे. पुन्हा कधीतरी भाऊकडं चार दिवस रहायला यायचं नक्की करून परतलो. दोन वर्षांपूर्वी एक ग्रुप घेऊन विजयदुर्ग, सिंधुदुर्ग केलं, त्यावेळेस घुमड्याला रहायचं ठरवलं. एव्हाना भाऊनं बागेत एक टुमदार रिसॉर्ट बांधलय. सहा सूट आहेत. भाऊच्या घरचं उत्तम जेवण आणि शांत परिसरातला निवास. आणखी काय हवं? आता हे सगळं गृहबंदीपुराण संपल की आवर्जून एकदा भाऊकडं जायचा विचार आहे. येणार कां ? ©ॲड. आनंद रा. देशपांडे.

19-04-20

# 23. सखा सुहृदं ....

अठ्ठ्याहत्तर सालच्या मे महिन्यात मी पहिल्यांदा त्याला पाहिलं, पण त्या दर्शनाचं रुपांतर ओळखीत व्हायला नव्वद साल उजाडलं. पहिल्या दर्शनाच्या स्मृती तशा धूसर आहेत, कारण भेटलोच होतो मी तिन्हीसांजेला. लक्षात राहिला होता फक्त त्याचा आवाज. साद घालायची त्याची एक वेगळीच तऱ्हा. पहिल्या भेटीत तो नीट समजलाच नव्हता. त्याचं ते रुपच मला मोहून गेल होतं. लक्षात राहिलं होतं, त्याच मी दिसताच खळाळून भेटायला येणं. लक्षात राहिली होती अखंड साथ करणारी त्याची साद. आजही कुठेही क्षणभर डोळे मिटून बसलो तरी तरी तो चिरपरिचित आवाज कानात घुमायला लागतो.

भटकंती सुरु झाली तसा तो मग अनेक ठिकाणी भेटला. दिवेआगर, कोळथरे, दापोली, हर्णे, मालवण, रत्नागिरी, जयगड, करहाटेश्वर, कुणकेश्वर, गणपती पुळे, वेळणेश्वर, दाभोळ, विजयदुर्ग, दिघी अलीकडे अलीकडे, गोव्यातसुध्दा भेटला होता. प्रत्येक ठिकाणी त्याच रुप वेगळ असतं, पण मला भेटायची असोशी तीच. हाक मारायची पद्धतही तीच.

तीच त्याची चिरपरिचित गाज. पण माझ्या अन त्याच्या गप्पा मारायच्या जागा ठरल्या आहेत, तिथे फक्त आम्ही दोघे असतो, आरे-वारेचा किनारा, कोळथऱ्याची रिसॉर्ट-मागची जागा, भाट्याचा किनारा, दिवेआगरचं केवडयाचं बन, एव्हाना तुम्ही ओळखलच असेल की हा दुसरा तिसरा कुणीही नसून माझा सखा समुद्र आहे. एका जिवलग, निष्ठावान मित्रात असणारे सगळे गुण त्याच्यात आहेत. त्याचं अमर्याद, अफाट पण अव्यक्त रुप मला माझ्या लहानपणाची, खूजेपणाची जाणीव करून देतं, जमिनीवर घट्ट पाय रोवून उभा राहणं किती महत्वाच आहे याची जाणीव करून देतं. मित्राची नुसती आठवण आली की त्याची साथ त्याच्या गाजेच्या रूपाने सतत बरोबर असते. मुंबईपासून गोव्यापर्यंत तो वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रूपात भेटतो.

जंगलं, डोंगर, समुद्र आणि किल्ले, ही खरे तर भटकंतीची तीर्थक्षेत्र आहेत पण त्यातही याचं स्वरुप, याचा आवाका सगळ्यांपेक्षा मोठा आहे. त्याच्याशी गप्पा मारताना शब्द नाही वापरावे लागत. फक्त त्याच्यासमोर जाऊन मनाची कवाडं उघडली की त्याला सगळं समजतं. खूपच साठलं असलं मनात तर तो धस्ससस करून आत घुसतो आणि

सारं धुऊन काढतो. त्याच्या प्रतिसाद देण्याच्या पद्धती निराळ्याच. एखादी गोष्ट आवडली तर किनाऱ्यावरच्या खडकावर येऊन असा आदळेल कि त्या लाटेच्या तुषारांनी आपण चिंब भिजून जाऊ. आपल्या तक्रारी, आपला उद्वेग, आपली चिडचिड, सगळं सगळं तो पोटात घेतो. महत्वाचं म्हणजे आपल्या मनातलं कळलेलं तो कुणालाही सांगत नाही. आपली गुपितं त्याच्या पोटात सुरक्षित रहातात. खूप दिवस झाले त्याला भेटून. आता हे सगळ महामारी प्रकरण संपलं कि लौकरच त्याला भेटायला जावं लागणार. कधीचा तो हाका मारतोय. कसा ? .. अहो ती काय , ती गाज येतीय ना कानावर ..... ©ॲड. आनंद रा. देशपांडे.



21-04-20

## 24. किं आश्चर्यं जगत् ..?

महाभारतामध्ये यक्षप्रश्न नावाचे एक प्रकरण आहे. त्यामध्ये वनवासात असताना, एका तळ्यावर पाणी न्यायला आलेल्या धर्मराजाला त्या तळ्याचा मालक असलेला यक्ष एक प्रश्न विचारतो, "किं आश्चर्यं जगत्....? या जगातलं सगळ्यात मोठं आश्चर्य कोणते ?" त्यावर धर्माने दिलेले उत्तर फार मार्मिक आणि त्रिकालाबाधित सत्य आहे. धर्मराज म्हणाला, "एक ना एक दिवस आपण मरणार हे माहित असूनही माणूस जिवंत असताना ज्या मस्तीत, माजात जगतो ते या जगातलं सगळ्यात मोठं आश्चर्य आहे".

आज जवळपास निम्मं जग मृत्यूच्या उंबरठयावर उभं आहे. उरलेल्या निम्म्या जगाचा जीवनावरचा विश्वासच उडाला आहे, पण याही स्थितीत माणसाचा माज कायम आहे.

कुणी जगाच्या आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्न पाहतोय, कुणी असलेली आर्थिक महासत्ता हातून निसटू नये म्हणून नागरिकांचे जीव पणाला लावतोय. कुणाचा जीव दारूसाठी तळमळतोय, कुणाला चढलेला सत्तेचा माज उतरायचं नाव घेत नाहीये, कुणी मताच्या तुकडयांसाठी लाचार होऊन

जनतेच्या जीवाशी खेळ करतोय, कुणाला कुठल्या तरी वैचारिक वादाच्या आहारी जाऊन साधू संताच्या हत्या कराव्याशा वाटताहेत, कुणाला गरीबांना द्यायच्या अन्नातही, स्वतःचा वाटा काढून घ्यावासा वाटतोय. ही कुठली मानवजात आपल्याभोवती फिरताना दिसतेय? या संकटातही सर्वसामान्यांसाठी स्वतःच्या जीवावर उदार होऊन लढणारे सन्माननीय अपवाद सोडले तर इतर बहुसंख्य जनता काय करते आहे हे फेसबुकवरुन आणि बातम्यांतून दिसतेच आहे. एवढं मोठं संकट मानवजातीच्या दारात निसर्गाने आणून ठेवलं तरी माणूस अजून सुधरायचं नाव काही घेत नाही. कदाचित यालाच कलियुग म्हणत असावेत. या अवस्थेतही माणसाला अजूनही कुणावर तरी कुरघोडी करावीशी वाटतीयं, कुणाला तरी धडा शिकवावासा वाटतोय, उद्याच्या भविष्यात आपण मानवजातीच्या मुडद्यांवर उभे राहिलो तरी हरकत नाही, पण आपण उच्च स्थानावर असलं पाहिजे यासाठी त्याची केविलवाणी धडपड सुरु आहे. मानवाचं चंद्रावर जाणं, मंगळावर जाणं सगळे फोल ठरलय. ज्या पृथ्वीवर आपण रहातो आहोत, तिथं तरी जिवंत राहू शकू का नाही याची शाश्वती उरलेली नाही. सगळं

विज्ञान, सगळं तंत्रज्ञान आत्ता या घडीला निरुपयोगी तरी आमची मस्ती अजून काही उतरत नाही. धर्मानं यक्षाला दिलेलं उत्तर आम्ही रोजच्या रोज खरं ठरवतोय. एका कवीने म्हटलयं ,

नरेचि केला हीन किती नर ...?

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



22-04-20

## 25. प्राथमिकता ....

तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे,
ठेविले अनंते तैसेचि रहावे,
चित्ती असू दयावे समाधान .. हे विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंतचे ढोबळमानाने सूत्र होते. थोडं विस्कटून सांगायचे तर आपल्या प्राथमिक गरजा ह्या रोटी, कपडा और मकान इथपर्यंतच मर्यादित होत्या.

विसाव्या शतकाच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली झाली आणि आपल्या गरजा आपण ठरवायचे दिवस संपले. तो हक्कच आपल्याकडून हिरावून घेतला गेला, नव्हे नव्हे आपण तो स्वखुशीने दुसऱ्याच्या हातात दिला आणि मग जे जगात, तेच घरात घडू लागले. महिन्याच्या सामानात ५० टक्के वस्तू गरजेच्या आणि ५० टक्के चैनीच्या दिसू लागल्या. आठवडयातून दोन तीन दिवस हॉटेलींग, प्रत्येक वीकएन्डला आऊटिंग, गरज नसताना शॉपिंग असे अनेक प्रकार सुरु झाले. वेळ जात नाही म्हणून मॉलमधे जाऊन उगीचच हजारो रुपयांची खरेदी सुरु झाली.

जसजशी या गोष्टींची प्रासंगिकता संपली तसा त्यातला आनंदही संपला. विदाऊट किचनचे फ्लॅट विकले जाऊ लागले, यापेक्षा या स्थितीवर काय भाष्य करायचं? संपूर्ण जगात एक नवी चार्वाक परंपरा रूढ झाली,

यावत् जीवेत् सुखं जीवेत,

ऋणं कृत्वा घृतं पिबेत... !

जोपर्यंत जीव आहे, तोपर्यंत सुखात रहा, कर्ज काढा आणि तूप प्या. लोकांनी कर्ज काढून नुसतं तूपच नाही तर घरं दारं गाडया, बंगले, मोबाईल सगळं आयुष्यच दुसऱ्याच्या जीवावर, उधारीवर जगायला सुरुवात केली.

या जगावर आलेल्या संकटाने मात्र या सगळ्या प्राथमिकता आमूलाग्र बदलून टाकल्या. महिना झाला, घरात कोंडून पडल्याने झक्कत घरचं खायची पाळी आली, लक्षात आलं की नाही गेलं हॉटेलात तरी चालतं. दोन टी शर्ट आणि दोन बर्म्यूडावर महिना काढलेला असल्याने कपडयांची असोशी संपली.

घरातल्यांबरोबर संपूर्ण वेळ काढावा लागल्याने बाहेरच्यांना घरच्यांची आणि घरच्यांना बाहेरच्यांची किंमत कळाली. एका अदृश्य विषाणूने हे एवढे दूरगामी बदल घडवून आणले,

पण तेही घडलं तें मृत्यूच्या भीतीने ! जसे हे बदल घरात घडले तसे देशभरातही घडून आले. काही काही गोष्टींना जे अपरिवर्तनीय स्थान लाभले होते ते किती फसवे होते हे देशाच्या आणि पर्यायाने जगाच्याही लक्षात आले.

आता हे संकट टळल्यानंतरच घर, गांव, खेडं, शहर, देश आणि जग सारं सारं वेगळं असणार आहे. सगळ्यांच्या प्राथमिकता बदललेल्या असतील किंवा बदलाव्या लागतील. सहसा आपल्या या छोट्याशा आयुष्यात असे आमूलाग्र परिवर्तनाचे दिवस येत नसतात, आले तर वैयक्तिक आयुष्यात येतात, सगळ्या जगाच्या आयुष्यात येत नसतात.

या संकटाच्या निमित्ताने हा मूलभूत विचार करायची संधी मिळाली आहे, चला त्याचे सोने करुया !!

©अॅड. आनंद रा. देशपांडे

23-04-20

## 26. पुस्तकदिन ....

पाचवीत असताना वाडयातल्या एका मित्राकडे पहिल्यांदा श्रीमानयोगीचे दोन खंड पाहिले, पाचशे पाचशे पानातले उत्तम बोल्ड टाईपसेटमधले ते दोन्ही खंड तीन दिवसात वाचून संपवले होते. त्या पुस्तकाने मला शिवाजीमहाराजांचा भक्त बनवून टाकलं. पुढे महाविद्यालयीन कालखंडात इतिहासाचा विद्यार्थी म्हणून वाचनाला सुरुवात केल्यावर हातात पडलं बाबासाहेबांच राजाशिवछत्रपति. शिवचरित्राकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोनच या पुस्तकामुळे बदलून गेला आणि नंतर हातात पडलं ते आप्पांच कादंबरीमय शिवकाल. हा माझ्या मनातल्या शिवमंदिरावर ठेवलेला कळस होता. ज्याला ज्याला शिवचरित्र वाचावसं, अभ्यासावं असं वाटत त्याला या तीन पुस्तकांना टाळून पूढं जाता येणारच नाही. आज पुस्तकदिनाच्यानिमित्ताने या तीनही पुस्तकांवर थोडी नजर टाकूया.

**१ ) श्रीमानयोगी :**

शिवाजीमहाराजांच कौटुंबिक व्यक्तिमत्व, त्यांची जडण घडण, त्यातला प्रत्येकाचा सहभाग, अद्भुतरम्य कल्पनाशक्ती आणि मानवी भावभावनांचा अत्यंत सुयोग्य विचार हा रणजित देसाई यांच्या या कादंबरीचा आत्मा. एकदा वाचायला सुरुवात केल्यानंतर संपेपर्यंत हे पुस्तक खाली ठेववतच नाही. आजही महाराष्ट्रातल्या जनमानसावर याची किती मोहिनी आहे हे या पुस्तकाच्या निघालेल्या आवृत्त्यांवरुन लक्षात येईल. यातली छत्रपति शिवाजीमहाराज आणि संभाजीमहाराज यांची पन्हाळ्यावर झालेली शेवटची भेट तर मनावर कोरून ठेवण्याजोगी.

**२ ) राजाशिवछत्रपति ..**

शिवाजीमहाराज एक प्रेरक शक्ति, हाच एकमेव संदेश देण्यासाठी अथक प्रयत्न, साधारसंदर्भ, आणि सर्वसामान्यांच्या मनापर्यंत पोहोचेल, रुजेल अशी आकर्षक भाषाशैली वापरून बाबासाहेबांनी लिहिलेल्या या शिवचरित्राने मराठी भाषेतल्या सर्व पुस्तकांचे आजपर्यंतचे विक्रम मोडीत काढले. शिवाजीमहाराज हा लोकोत्तर महापुरुष कोणत्या परिस्थितीत जन्माला आला? त्याच्या

जन्माच्या आधीची महाराष्ट्राची भिषण परिस्थिती, आपल्या पराक्रमाने या नरोत्तमाने या भूमीला मिळवून दिलेले गतवैभव आणि मानवी जीवनातल्या सर्व अंगोपांगांचा या महात्म्याने केलेला गौरव या सर्व गोष्टींच यथार्थ, साधार आणि अतिशयोक्तिविरहीत वर्णन म्हणजे हा ग्रंथ.

३) शिवचरित्र वाचत असताना एक प्रश्न नेहमी पडतो तो म्हणजे हे सगळं राष्ट्रोत्थानाचं कार्य इतक्या कमी कालखंडात कसं पार पडलं असेल? कशी माणसं तयार झाली असतील किंवा केली असतील? त्या अशिक्षित, खेडवळ माणसांना ही स्वराज्याची संकल्पना कशी समजावून सांगावी लागली असेल? त्यांचा प्रतिसाद काय असेल? एका क्षणी ती माणसं घरादारावर निखारा ठेऊन या यज्ञात काय म्हणून आहूतीसारख्या धडाधडा उडया टाकत असतील? महाराष्ट्राचं सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक आचरणं कसं असेल? या साऱ्या प्रश्नांच अत्यंत समर्पक, वस्तुस्थितीनिष्ठ आणि प्रत्यक्षदर्शी वाटावं इतकं जिवंत चित्रण अप्पांच्या अफाट भ्रमंतीतून, विलक्षण प्रतिभेतून आणि जवळपास ५६ लोकभाषांच्या वापरातून या

कादंबरीमधून आपल्या प्रत्ययाला येतं. सर्वसामान्य, सश्रद्धशिवभक्ताला आवश्यक असणारं सर्व पाथेय या कादंबऱ्यांमधून वाचायला मिळतं.

अलीकडे व्याख्यानाला गेल्यानंतर अनेक जण येऊन विचारतात, "आम्हाला शिवाजीमहाराजांचा अभ्यास करायचाय, आम्ही काय वाचावं ?" खरंतर हा प्रश्न थोडा चुकलेला असतो, प्रश्न असा असतो आम्हाला शिवाजीमहाराजांविजयी जाणून घ्यायचयं तर आम्ही काय वाचावं? ज्याला अभ्यास करायचाय नां, तो कुणाला विचारत बसत नाही, तो तडक इतिहास संशोधन मंडळ गाठून जुन्या कागदपत्रांचे ढिगारे उपशित बसलेला असतो. बाकी प्रश्न विचारणारे असतात ते हौशी, उत्सुक वाचक. त्यांच्यासाठी माझं उत्तर असं आहे, सध्याच्या म्हणजे वर्तमानकाळात आपल्याला शिवचरित्राच्या प्रेरणेची, मार्गदर्शनाची गरज आहे ती स्वतःच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीसाठी आणि आपल्या या प्राणप्रियभारतभूच्या सेवेसाठी, उभारणीसाठी. त्यासाठी ही तीन पुस्तक आपल्याला पुरेशी आहेत. ही समजून घ्यायला, स्वतःत रुजवून घ्यायला आणि आचरणात आणायला हा जन्म


निघून जाईल.  पुढचं पुढं बघू.  तेव्हा सश्रध्द शिवभक्तांसाठी सध्या तरी ही तीन पुस्तके म्हणजेच ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा आणि श्रीमत्दासबोध.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.









27-04-20

## 27. अगदी खरं सांगायचं .......

महिना झाला, घरात लोळतोय,
उठतोय, जेवतोय, झोपतोय, बसतोय,
एकाच जागी बसून बसून, मुंग्या आल्या की नाही ?
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

मित्राला फोन, मित्रांचे फोन,
बॉसचा आपला, वेगळाच दृष्टिकोन,
त्याच त्याच गोष्टी, तीच तीच कारणे,
तरी सांगणारा काही दमत नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

भांडी घासून झाली, लादी पुसून झाली,
स्वयंपाकात थोडीफार, मदतही करुन झाली,
पापड लाटले, सांडगे घातले,

जरा बसाव म्हटलं तर, कामाची यादी काही संपत नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

हे पुस्तक, ते पुस्तक,
पान उघडताच,भणभणतय मस्तक,
तरी कुणीतरी विचारतोच,
काय वाचतायं सध्या? वैतागून म्हणालो ,
माझं मलाच वाचतोय,
पण एक अक्षर, काही समजत नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

घराबाहेर म्हणे, उभा आहे यम,
घरात मांडी ठोकून, बसला आहे संयम,
ह्याला सोडता येत नाही,
त्याला धरता येत नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

त्याच त्याच मालिका, तेच तेच विनोद,
ध्यान करुन म्हणे, स्वतःलाच शोध,
हरवलयं कोणं? शोधतयं कोणं?
कुणाचा कुणाला, पत्ताच नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

रस्त्यावर मोकाट, भटकणारी कुत्री,
आकाशात स्वच्छंद, उडणारे पक्षी,
आमच्या डोळ्यासमोर मात्र, छताचीच नक्षी,
रिकाम्या चौकात, गायी म्हशींशिवाय, दुसरं कुणीचं नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ?

महामारीनं या, केलायं कहरं,
परमेश्वरा बांध, या चीनचं उन्हातं घरं,
मिचमिच्या डोळ्यांना त्यांच्या,
स्वार्थाशिवाय दुसरं, काही दिसतंच नाही,
अगदी खरं सांगायचं,
कंटाळा आला की नाही ? © ॲड. आनंद रा. देशपांडे.

29-04-20

## 28. निरंतर मानवता ......

जसं हे महामारीचं संकट सुरु झालं तसं प्रत्येकाने आपापल्या परीने यथाशक्ति इतरांना मदत करायला सुरुवात केली. काही ठिकाणी तर मदतीचे ओघ सुरू झाले. भारतीय मानसिकता अशा संकटाच्या वेळी एकदम वेगळ्या मोडवर जाते. कुणी रस्त्यावरच्या भिकाऱ्यांची, जनावरांची काळजी घेतयं, कुणी डोंगर घाटातल्या पशुपक्षांची अन्न पाण्याची सोय करतयं.

समाजाचा एक घटक म्हणून मला अशावेळी प्रश्न पडतो की ही संकटकाळात उफाळून येणारी मानवता, इतर वेळी कुठे लुप्त होते? वकील म्हणून काम करत असताना बांधावरच्या लिंबाच्या झाडासाठी भांडणारे, एकमेकांच तोंडही बघायला तयार नसणारे सख्खे भाऊ पाहिले की नात्यांवरचा विश्वासच उडून जातो. आमचं वकिलीचं क्षेत्रच असं विचित्र आहे की सगळ्या दुनियेवरून ओवाळून टाकलेली नाना तऱ्हेची माणसं आम्हाला अनुभवायला मिळतात.

चांगुलपणा, समजूतदारपणा वगैरे गोष्टी आमच्या आशिलांच्या शब्दकोषात सहसा आढळतच नाहीत. दैनंदिन आयुष्यातही माणसं इतकी लोभी आणि स्वार्थी असतात की काही वेळा वकिल म्हणून आम्हीही थक्क होतो. माझ्या आजोळच्या शेताशेजारचा एक शेतकरी रोज सकाळी उठून खुरपण्याच्या नावाखाली दोन शेतातला बांध कोरून कोरून पुढं ढकलायचा. मरेपर्यंत त्यानं जवळ जवळ पंचवीस फूटाचं क्षेत्र टोकरुन स्वतःकडं घेतलं होतं, आता काय जाताना ते पंचवीस फूट बरोबर नेता आले का?

माझा मुद्दा असा की आपत्कालात दिसणारी माणूसकी, करुणा, प्रेम दैनंदिन जीवनात का आचरणात येत नाही? अनुभवायला येत नाही. तो माणूसकीचा झरा उत्पन्न व्हायला अशी भयानक आपत्तीच का यावी लागते?

याही काळात साठेबाजी करणारे, रुपयाची गोष्ट दहा रुपयांना विकणारे विद्वान आहेतच. त्यांना खरंतर राक्षसच म्हटलं पाहिजे. यातही पुन्हा राजकारणी राक्षसांचा एक गट वेगळाच आहे.

या आपत्तीच्या काळात दिसणारी ही मानवता, निरंतर दिसत राहिली तर जग किती सुंदर होईल. ही मानवता

आपल्या जीवनाचा एक सहजभाग व्हायला हवी. माणूस हा असा विचित्र प्राणी आहे की त्याला दानाचा आणि त्यागाचासुद्धा माज येतो. तो टाळणं आवश्यक आहे.

संत रहीमाना, एकदा एकाने विचारले की तुम्ही दान देताना तूमची नजर खाली जमिनीकडे का असते? यावर संत रहीमानी दिलेलं उत्तर हृदयावर कोरून ठेवण्यासारखे आहे. ते म्हणाले,

देनहार कोई और है,
भेजत जो दिनरैन,
लोग भरम हम पर करे,
तासो नीचे नैन ........

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

01-05-20

## 29. हितून फुडं सम्दं बरं हुईलं.......

पहाटे साडेचार पाचची वेळ. रस्त्यावरची वर्दळ अजून सुरु झालेली नसायची. देवळातली महापूजा आटोपून पुजारी परतत असायचे. दारापुढे टाकलेल्या सडयांचे सप्पसप्प आवाज, मधूनच कोंबडयाची बांग, पाखरांची किलबिल, यातच एक चिरपरिचित आवाज मिसळून जायचा, छोटसं डमरू तारस्वरात वाजवत, साधारण वासुदेवासारखाच पोशाख केलेला, पण डोक्याला मोरपिसाच्या टोपीऐवजी मुंडास बांधलेला हातात कंदील घेतलेला पिंगळा अथवा पांगुळ येत असे.

त्याच्या त्या डमरूच्या आवाजाबरोबरच त्याचा तो लांबपर्यंत पोहोचणारा किनरा स्वर ऐकू यायचा, हितून फुडं समदं बर हुईल, पाऊस पाणी चांगल पडल, पीकपाणी बरं हुईल, बायकापोरं, गुरंढोरं सुका समाधानानं नांदत्याल........... आजी झोपेतनं खडबडून उठवायची अन म्हणायची, "जा, शेरभर जोंधळं घालून ये त्याच्या झोळीत." अर्धवट झोपेत, डोळे चोळीत, मी तो शेर त्याच्या झोळीत रिकामा केला की तो मूठभर धान्य त्या शेरात परत घालत असे.

ते आणून परत त्या पोत्यात ओतलं की अन्नधान्य कधी कमी पडत नाही अशी समजूत.

आज हे सगळं आठवायचं कारण म्हणजे गेला जवळ जवळ दीड महिना आपण सगळे घरात बंद आहोत. कारखाने बंद, दुकानं बंद, व्यवसाय बंद, रोजगार बंद आणि खर्च मात्र चालू! लाईट बिल, टेलिफोन बिल, मोबाईलची बिले, किराणा, भाजीपाला, नोकरांचे पगार एक ना अनेक. अडचणींच्या टेकडयांचे डोंगर कधी झाले कळालच नाही. महिनाभर सगळ्यांनी वरवर हसत दिवस काढले, पण खरं तर आता धीर सुटत चाललायं. हे अरिष्ट कधी संपणार?

पुढं काय होणार? कसं होणार? या प्रश्नांनी रात्रीची झोप उडत चाललीय. लोक पहाटे पहाटेपर्यंत जागताहेत आणि म्हणूनच मला पहाटेच्या त्या पिंगळ्याची प्रकर्षाने आठवण होती आहे.

वाटत त्यानं पुन्हा यावं अन खच्चून ओरडावं, हितून फुडं समदं बरं हुईल .....

आणि खरचं त्यात एक आशेचा किरण आहे. मी गेले महिनाभर सारखा वेगवेगळ्या विषयातल्या लोकांशी फोनवरून बोलतोय. अडचणींची वाळवंट तर प्रत्येकजणच

सांगतोय. पण प्रत्येकाच्या शब्दात एका गोष्टीविषयी एकमत आहे ते म्हणजे ही आपत्ती ही भारतासाठी फार मोठी संधी असणार आहे. औषध निर्मितीच्या क्षेत्रात, औद्योगिक क्षेत्रात, शेती क्षेत्रात, आमूलाग्र बदल होतील, पण ते सारे आपल्या पथ्यावर पडणार आहेत. हॉटेल, सिनेमा आदी करमणुकीच्या गोष्टींना झळ बसेल, पण ती कायमची असणार नाही. काही झाले तरी माणूस हा खर्चिक आणि उत्सवप्रिय प्राणी आहे. तो शंभर टक्के काटकसरीने आयुष्य काढणार नाही. पुन्हा सगळं पूर्ववत होईल. आत्ताची मिळालेली गरजेपेक्षा जास्तीची विश्रांती, पुढच्या अविश्रांत, अथक परिश्रमांसाठी मिळालेली आहे हे समजून उमजून घ्यावे लागेल.

इतिहासात डोकावून पाहिले तर यापूर्वीसुद्धा अशा साथी, असे रोग, नैसर्गिक आपत्ती येऊन गेल्या आहेत. मानवजातीचे भीषण संहार या आपत्तींनी घडवले आहेत. त्यातूनही पुन्हा मानवजात उभी राहिली आहे. अगदी शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी सलग बारा वर्षांचा भीषण दुष्काळ पडला होता. समर्थ रामदासस्वामी याचं काळात

संपूर्ण देशभर फिरत होते, लोकांना धीर देत होते, म्हणत होते,

"धीर्धरा धीर्धरा तकवा,

हडबडू गडबडू नका ....


सदा सर्वदा देव, सन्निध्धं आहे

कृपाळूपणे, अल्प धारिष्ट्य पाहे..

तेव्हा काळजी करु नका, काळजी घ्या.

हितून फुडं सम्दं बरं हुईलं ........

© ॲड. आनंद रा. देशपांडे, (Image **Curtacy** - Shri. Parag Ghalsasi)



(Image **Curtacy** - Shri. Parag Ghalsasi)

03-05-20

## 30. ध्यावे आपणांसि आपण ....

२०१५ साल होतं. दापोलीपासून बावीस कि. मी. आहे, भाव्यांचं गारवा बीच रिसॉर्ट.

सकाळी सकाळी सोलापूर सोडलं, दापोलीला पोहोचलो तर संध्याकाळचे सहा वाजलेले. तिथून कोळथरं बावीस कि. मी. मागच्याच वर्षी तर येऊन गेलो होतो. तासाभरात पोहोचायला हरकत नव्हती. साडेसात वाजून गेले, आठ वाजले, कोळथरं काही दिसेचना. मला वाटलं लागला चकवा. फिरत फिरत अखेर नऊ वाजता रिसॉर्टवर पोहोचलो. ऐन समुद्राकडे तोंड करून असलेला सूट घेतला, सामान टाकलं. अख्ख्या रिसॉर्टवर आम्ही तिघेच होतो. तीच ती चिरपरिचित गाज ऐकू येत होती.

पहाटे पहाटे उठून बीचवर गेलो. दीड दोन किलोमीटर लांबीच्या बीचवर एकटा होतो.

डाव्या बाजूच्या घळीत एक नदी समुद्राला येऊन मिळते, त्या संगमापासून थेट रिसॉर्टच्या उजव्या बाजूच्या हाताला असणाऱ्या टेकडीपर्यंत निर्मनुष्य किनारा. ओहोटी सुरु

होती, पाणी आत आत ओढलं जात होतं. खरोखर या भरती ओहोटीचं मला आश्चर्य वाटतं. भरतीच्यावेळी खळाळत पुढे येणारा समुद्र कितीही अनावर ओढ असली तरी मर्यादा ओलांडत नाही आणि ओहोटीच्यावेळी कितीही पाणी आत ओढलं तरी त्याला फुगवटा येत नाही. मागं कधीतरी एका वक्त्यानं सांगितलं होतं, मानवी शरीरातल्या पेशींमधे असलेलं द्रव्य आणि समुद्राचं पाणी यात काही फरक नाही. चंद्राच्या प्रभावाने जशी भरती ओहोटी येते, तसाच चंद्राचा प्रभाव माणसाच्या मनावरही पडतो म्हणून माणसं पौर्णिमा अमावस्येला जरा चिडचिडी होतात म्हणे. खरंखोटं त्या चंद्राला माहित ! पण माणसांची भरती ओहोटी मात्र नित्य अनुभवाला येते. ओहोटीपेक्षा भरतीचं जास्तं. एवढा मोठा तो समुद्र, तोही कधी आपली मर्यादा सोडत नाही. परंतु माणसाची प्रत्येक भरती ही मर्यादेच्या पलिकडे जाऊन नाती तोडणारीच का ठरावी? याचं काही उत्तर सापडत नाही. ओहोटीच्या वाटेला माणूस फारसा जात नसावा असं वाटतं कारण त्यात स्वतःला जास्तीत जास्त आत ओढून घेणं आहे. आत्मपरीक्षण आहे तरीही व्यर्थ दंभाचा फुगवटा येता उपयोगाचा नाही. ज्याला ओहोटी

समजते नां, तोच मग भरतीच्यावेळी मर्यादेच्यापलिकडे कधी जात नाही. भरती-ओहोटी हे परमेश्वराने आपल्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी दिलेलं साधन आहे. किर्तनात टाळकरी अतिउत्साहाने जागा सोडून उडया मारू लागला की, बाबामहाराज सातारकर ओरडतात, "हां हां हां जागेवर, जागेवर.." तसं भरती ओहोटीही समुद्राला आणि आपल्याला ही जागेवर ठेवण्यासाठी केलेली निसर्गरचना आहे असं मला नेहमी वाटत. मर्यादेमधे कल्लोळ करायला काहीच हरकत नाही, पण मर्यादा सोडली की भरतीच्या लाटांबरोबर पोटातला कचराही किनाऱ्यावर येतो आणि आपलं खरं स्वरूप उघडं पडतं ....

असा सगळा विचार करत किनाऱ्यावर हिंडत होतो. अशा कितीतरी वेळांनी मला समुद्रानं समृध्द केलयं. ती एक जागा अशी आहे की,

सांडूनिया मीपण, ध्यावे आपणांसि आपण,<br>
तेथ दूजेपण काही, अनुभवा येत नाही...........

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

05-05-20

## 31. जागतिक महामारीच्या दशा आणि दिशा : भाग 1

पहिलं आणि दुसरं महायुद्ध ही जागतिक राजकारणाच्या दृष्टीने घडलेली अत्यंत महत्वाची घटना. निम्म्यापेक्षाही जास्त जगाला या युद्धांची झळ पोहोचली. कित्येक देशांचे नकाशे बदलले. पण त्याही काळात अलिप्त राष्ट्रे स्वतःच स्वतंत्र अस्तित्व टिकवून होती. त्यांच्या दैनंदिन राजकारणावर अथवा समाजकारणावर या युद्धांचा प्रत्यक्ष परिणाम दिसून आला नाही.

सध्या घोंघावत असलेलं वादळ मात्र सगळे जग आपल्या कवेत घेऊन बसलयं. याआधीही नैसर्गिक आपत्ती आल्या, युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्या, पण त्या एकेका देशापुरत्या, फार तर खंडापुरत्या मर्यादित होत्या. सारं जग त्यांनी व्यापले नव्हतं. या अर्थाने सध्याचं संकट हे वैश्विक संकट म्हणायला हवं (Universal phenomenon). दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हे संकट निसर्गनिर्मित नाही तर मानवनिर्मित आहे. पूर्वी राजकीय साम्राज्यवादाच्या लालसेपोटी युध्दे होत असत. आता आर्थिक साम्राज्यवादाच्या स्वार्थी हेतूने ही संकट आणली जाताहेत.

कुठेतरी झालेला भूकंप, प्रज्वलित झालेला ज्वालामुखी, आलेली त्सुनामी या संकटांपेक्षा हे संकट वेगळे, सर्वव्यापी आणि जीवघेणे आहे. यात हानी तर होणारच पण शेवटी माणसालाच त्यावर उपाय शोधून काढावा लागणार. किती दिवस असं जग स्वतःला घरात कोंडून घेणार? उपाय सापडणार किंवा हुडकला जाणार एवढं नक्की कारण मारणारापेक्षा वाचवणारा नेहमीच श्रेष्ठ आणि मोठा असतो. जगाच्या एखाद्या भागावर येणारं संकट हे सगळ्या जगाच्या आचार विचारावर, राहणीमानावर, जीवनपद्धतीवर कधी सार्वकालिक परिणाम घडवून आणू शकत नाही, पण असं एखादं संकट मात्र संपूर्ण जगाच्या दिशाच बदलण्याला कारणीभूत ठरू शकतं.

प्रत्येक माणसाच्या वैयक्तिक आयुष्यात संकटे नेहमी येतच असतात त्यातून तो मार्गही शोधत असतो. तो, त्याचं कुटुंब या सर्वांना त्याची झळ बसतेच पण जगभरातल्या सगळ्या माणसांच्या आयुष्यात एकच संकट आलयं, त्याने सगळ्या जगातल्या सगळ्या माणसांना झळ पोचलीय आणि सारे जग एका अर्थाने हतबल झालयं असं पहिल्यांदाच घडतय. हे संकटच जागतिक स्वरूपाचे असल्याने त्याचे होणारे

परिणाम ही जागतिक स्वरूपाचेच असतील अर्थातच चांगले आणि वाईटही. मला वाटतं आजच्यापुरतं एवढं बास, उद्या आणखीन थोडया गप्पा मारुयात ...

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



(Image Curtacy - Google Images)

06-05-20

## 32. जागतिक महामारी : दशा आणि दिशा : - भाग 2

आमच्या शेजारच्या सोसायटीचा वॉचमन गावाबाहेर रहातो. सोसायटीच्या सदस्यांची छोटी मोठी कामे तो आवडीने करुन देतो. संचारबंदीत भाजी मिळत नव्हती तर सगळे त्याला तिकडून शेतकऱ्यांकडून भाजी आणायला सांगत होते आणि परवाच्या दिवशी त्याच्या येण्याजाण्याच्या वाटेवरच्या वस्तीतला एक जण पॉझिटिव्ह निघाला की सोसायटीने त्याला घरी रहायला सांगीतले.

वैयक्तिक पातळीवर घडून आलेल्या आणि पुढील काळात घडून येणाऱ्या बदलांचे हे संकेत आहेत. माणसामाणसांमध्ये संशय, अविश्वास आणि एखाद्या वेळी नात्यांना तडा देणारे प्रसंगसुद्धा घडून येतील. आजपर्यंतच्या आयुष्यात घरातली माणसेसुध्दा, चोवीस तास कधी एकमेकांच्या संपर्कात नव्हती. घरावेगळे प्रत्येकांचे स्वतंत्र विश्व होतं, स्पेस होती. गेल्या दीड महिन्यात ती स्वतंत्र स्पेस डिस्टर्ब झाली आहे. सतत एकत्र राहिल्याने एकमेकांतले गुणदोष ठळकपणाने अनुभवायला येत आहेत. चिडचिड होतीये क्वचित खटके उडताहेत.

एक नूर आदमी, दस नूर कपडा असे म्हणतात. पण गेला दीड महिना बनियन / टी शर्ट आणि बर्म्यूडावरच काढल्याने आपलचं ओंगळ रुप आरशात बघायचा कंटाळा आला आहे. काही व्यक्तिंना ठराविक दिवशी ठराविक वेळी, ठराविक हॉटेलमध्ये जाऊन नाश्ता करण्याची सवय असते, एखाद्या विशिष्ठ पानपट्टीवर उभा राहून एक सिगारेट ओढून मग कामाला जायची सवय असते. या सगळ्या सवयी, व्यसनं सध्या बंद झाल्यानं माणसं कावल्यासारखी झाली आहेत. जी नोकरदार मंडळी आहेत त्यांच्या नोकऱ्या तरी पक्क्या आहेत, व्यावसायिक, कारखानदार यांचे प्रश्न वेगळेच आहेत. ज्या दिवशी लॉक डाऊन उठेल, त्या दिवशी काही हे संकट पूर्णपणे संपलेले असणार नाही. त्यामुळे घराबाहेर पडताच पाळावी लागणारी स्वच्छता, ठेवावे लागणारे अंतर, सार्वजनिक ठिकाणचा वावर या सगळ्या गोष्टींचा वैयक्तिक जीवनावर परिणाम होणार आहे नव्हे तर घडवून आणावा लागणार आहे. आत्तापर्यंत सर्वात दुर्लक्षित असलेली किंवा ठेवलेली गोष्ट म्हणजे काटकसर ! ती आता प्राधान्यक्रमाने पहिल्या क्रमांकावर येऊन बसेल, नव्हे बसवावी लागेल. खर्चिक, दिखाऊ, भपकेबाज जीवनशैलीच्या ठिकाणी

गरजेपुरती, आवश्यक पण समाधानी जीवनशैली अवलंबावी लागेल. शरीराइतकेच मानसिक आरोग्य किती महत्वाचे आहे हे एव्हाना सगळ्यांच्या लक्षात आलं आहे आणि त्याची कुठलीही जिम अथवा पॅकेज नसते, त्यामुळे त्यासाठी स्वतंत्र वेगळे प्रयत्न करावे लागणार. घरातल्या लहान आणि वयस्कर लोकांची स्वतंत्र वेगळी काळजी घ्यावी लागणार. ही एवढी मोठी यादी बघून घाबरून जायचं कारण नाही, यातलं बहुतांशी सगळं आपण या दीड महिन्यात केलं आहे पण ते आपद्धर्म म्हणून ! परंतु इथून पुढे ते आता जीवनाचा एक अपरिहार्य भाग म्हणून नित्यनेमाने करावे लागेल.

आज आपण वैयक्तिक आयुष्यात या महामारीमुळे झालेल्या आणि होणाऱ्या बदलांची दखल घेतली, उद्या आपण देशपातळीवर काय काय होईल यावर गप्पा मारूया. तोपर्यंत काळजी घ्या.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

07-05-20

## 33. जागतिक महामारी.: दशा आणि दिशा. भाग 3

दि. 2० मार्च 2020 रोजी मा. पंतप्रधानांनी संपूर्ण देशभरासाठी जनता कर्फ्यूचे आवाहन केले आणि एकशेतीस कोटी जनतेच्या या देशाने त्या आवाहनाला दिलेला प्रतिसाद बघून सगळं जग थक्क झालं. या देशाच्या एकराष्ट्रीयत्वाची, एकसंधपणाची, आपल्या नेतृत्वावर देशवासीयांच्या असलेल्या विश्वासाची ती झलक होती. नंतरच्या काळात तो संचारबंदीचा कालावधी वाढत गेला तरी अपवाद वगळता ती भावना मात्र कायम आहे.

या संकटाने अनेक गोष्टींचे साक्षात्कार सगळ्या देशाला घडले. पोटाची खळगी भरण्यासाठी लाखो लोक कसे हजारो किलोमीटरचे अंतर पार करून वेगवेगळ्या राज्यात स्थिरावले होते, या अडचणीच्या काळात कोण कोण त्यांच्या पाठीशी उभे राहिले ? किती जणांना आपल्या आपल्या प्रदेशात निघून जावेसे वाटले.

एखाद्या प्रदेशाचं औद्योगिक जीवन कसे तिसऱ्याच प्रदेशाच्या श्रमशक्तीवर अवलंबून होतं. कृषिप्रधान म्हणवून घेणाऱ्या या

देशात कशी शेतीलाच मजूरांची गरज पडत होती. एक ना अनेक. जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगामध्ये सारे भारतीय कसे मिळून मिसळून जगत होते आणि या संकटाने या सगळ्या स्नेहबंधनांचा कसा विस्कोट केला हे सारं आपण गेले महिनाभर पहात आहोत. शिक्षण, रोजगार, आर्थिक सुबत्ता अशा अनेक सबबींखाली तालुका पातळीवरची माणसं कशी आणि किती संख्येने शहरांकडे धावली होती, जागा मिळेल तिथे राहिली होती आणि एकूणच शहराचे स्वास्थं, सौंदर्य आणि पर्यावरण त्यामुळे कसे विस्कळीत झालं होतं हे आता शहरं रिकामी झाल्यावर अनुभवायला मिळतय.

आज जीवावर बेतल्यावर माणसं हजार हजार किलोमीटर चालून आपल्या गावी पोहोचण्याची धडपड करताहेत. समाधानाने राहण्यासाठी आवश्यक असलेली स्वतःची हक्काची झोपडी, दोन अडीच एकर जमीन, चार दोन जनावर, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि मोकळी हवा हेच खरे सुख आहे याचा साक्षात्कार त्यांनाही होतोय. त्यांनी खेडयातच रहायचं ठरवलं तर पुढच्या काळात शेतीची अवकळा निघून जाईल. या परत आलेल्या श्रमशक्तीचा

आदर आणि उपयोग करणारं स्थानिक नेतृत्व मात्र त्या त्या भागात असायला हवं किंवा उदयाला यायला हवं.

औषध निर्मितीच्या कच्च्या मालासाठी चीनवर अवलंबून असलेला आपला देश, आता स्वयंपूर्ण होण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतोय, आत्ता या घडीला शंभरपेक्षा जास्त देशांना औषधे पुरवतोय, या महामारीवर लस हुडकून काढण्याच्या प्रयत्नात असलेले जग, आपल्या देशाकडे मोठया आशेने बघतयं ही कशाची शुभलक्षणं आहेत? ही ओळखायला हवीत.

स्थलांतरीत झालेला कामगारवर्ग आपापल्या गावी निघून गेल्यावर, मूळ कारखानदारीच्या क्षेत्रातील बेरोजगारांना नवीन संधी उपलब्ध होणार आहेत, त्याचा त्यांनी सकारात्मक विचार करायला हवा. बास झाली आता नेतागिरी आणि पुढारीगिरी. या महामारीच्या काळात कुठले अण्णा, तात्या, मालक, प्रेरणास्थान, आदर्श, त्यांचे घर चालवायला आणि वाचवायला पुढे आले ?

चला, आता अंग झाडून कामाला लागूया. हे सारे सकारात्मक बदल जसे प्रत्ययाला आले तसा मानवी प्रवृत्तीचा एक घृणास्पद चेहराही या काळात जनतेसमोर

उघड झाला, सर्वसामान्यांच्या प्रत्ययाला आला. याही परिस्थितीत राजकारण करणारे नेते, शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यत न पोहोचू देणारे सरकारी कर्मचारी, रेशनच्या मोफत दिलेल्या धान्याची विक्री करणारे महाभाग, दुष्काळ आणि अशा आपत्ती हेच ज्यांचे सुगीचे दिवस असतात असे वेगवेगळे कंत्राटदार या सगळ्यांनीपण आपापल्या विकृतीला जागत, आपापल्या तुंबडया भरून घेतल्या. त्यांचा हिशोब परमेश्वर करीलच.

सार्वजनिक आचार विचारातली अनौपचारीक दाखवली जाणारी पण औपचारिक नाटकं आता बंद होतील. पर्यटनाचं क्षेत्र पुन्हा सुरू व्हायला वेळ लागेल. हॉटेल इंडस्ट्रीला स्वच्छता आणि शिस्त याकडे नव्याने लक्ष द्यावे लागेल. कितीही नाकारलं अथवा अमान्य करायचं ठरवलं तरी एक विशिष्ट प्रकारचे अंतर आता पाळावं लागेल. सार्वजनिक आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत जागरूक रहावे लागेल, काही आग्रह धरावे लागतील. बहुधा काही जणांना हे अप्रासंगिक वाटण्याची शक्यता आहे, पण सगळे जग जर या दिशेने बदलणार असेल तर आपल्याला मान्य असो वा नसो आपल्याला बदलावे लागेलच. जाता जाता थोडी गंमत,

विवाहेच्छु मुलांना इथून पूढे,  तुझं घर कुठल्या झोनमधे आहे? रेड, ऑरेंज का ग्रीन झोनमधे असाही प्रश्न येऊ शकतो बरं का ?

©ॲड. आनंद रा. देशपांडे.




(Image Curtacy - Google Images)

08-05-20

## 34. जागतिक महामारीच्या दशा आणि दिशा : भाग 4

नव्वदीच्या दशकात जागतिकीकरणाचे आणि मुक्त अर्थव्यवस्थेचे वादळ घोंघावू लागले. जे जे देश या परिस्थितीचा फायदा घ्यायच्या तयारीत होते, त्यांनी त्यांनी आपापल्या उत्पादनांनी जगाच्या बाजारपेठा भरून टाकल्या. सगळं आयत मिळायला लागल्यावर, इतर देशांनीपण कशाला फालतू गोष्टींचे कारखाने काढायचे, म्हणून आपली अर्थव्यवस्था परावलंबी करून टाकली. पैसे फेकले की सगळं काही विकत मिळत, हा माज त्याच्या मुळाशी होता. यातूनच मग आर्थिक साम्राज्यवादाच्या लालसेची मूळं फोफावत गेली.

त्या त्या देशांची वैशिष्ठयपूर्ण उत्पादने हळू हळू लयाला गेली आणि सगळीकडे एकच नाव दिसून येऊ लागले. केवळ आपलीच अर्थव्यवस्था भक्कम राहिली पाहिजे, इतर देशांनी आपल्या दयेवर किंवा भिकेवर जगलं पाहिजे असा एक राक्षसी व्यवहारवाद जगभर फोफाऊ लागला. त्याला विरोध करणारी किंवा करु शकणारी, आपल्यासारखी जी राष्ट्रे

आहेत त्यांना दहशतवादाच्या फेऱ्यात अडकवून, त्यांचे लक्ष गुंतवून ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. या प्रकाराला अमाप यश प्राप्त होत आहे असा विश्वास निर्माण झाल्यावर आत्ताचा हा नवीन प्रयोग करून बघितला गेला, जैविक युध्द !! मुळातच या प्रकारच्या युध्दाला तोंड देण्याची जगाची तयारी किती केविलवाणी होती, हे सध्याच्या परिस्थितीवरून लक्षात येतच आहे. त्यातच औषध क्षेत्रासारख्या महत्वाच्या क्षेत्रात असलेलं प्रायव्हेट कंपन्यांचं प्राबल्य, मौलिक संशोधन आणि संशोधकांकडे झालेले दुर्लक्ष या सगळ्यांचा परिणाम म्हणून, या रोगावर जगामध्ये औषध नाही, घरातच रहा आणि स्वतःला वाचवा असं कोडगेपणाने सांगण्याची पाळी जगावर आली.

ज्या देशानं हे संकट निर्माण केलं त्याच्याच तोंडाकडं औषधासाठी बघण्याची वेळ आली. जगातली सगळ्यात शक्तिशाली राष्ट्र म्हणवणाऱ्यांना, साध्या साध्या औषधासाठी एकमेकांकडे पदर पसरायची पाळी आली. संरक्षणासाठी आवश्यक असलेली शस्त्रनिर्मिती आणि औषध निर्मिती या दोन क्षेत्रात तरी यापुढे प्रत्येक राष्ट्राला स्वावलंबी व्हावे लागेल.

दूसरा मुद्दा शिष्टाचार आणि आचार विचारांचा, याबाबतीत पौर्वात्य ( पूर्वेकडील ) देशांची जीवनपद्धती आणि पाश्चिमात्य देशांतील सार्वजनिक स्वच्छता आणि शिस्त या दोन्हींचा संगम जगाला पुढील काळात घालावा लागेल. मांसाहार आणि व्यसने यांना मिळालेली अवास्तव प्रतिष्ठा कमी झाली तरच जग सुखरूप आणि पर्यावरणपूरक जगण्याच्या दिशेने मार्गक्रमण करू शकेल. राजकीय साम्राज्यवादाच्या फुटकळ लालसा सोडून समविचारी राष्ट्रे एकत्र आली तरच पुढील काळात मानवजातीला भविष्य असेल ! अति सुबत्ता, अति सुख, अति विलासी जीवन, सुखोपभोगांच्या गोष्टीतील निरर्थक स्पर्धा या सगळ्याच गोष्टींचा पुनर्विचार करावा लागेल.

शेवटी सगळ्यात महत्वाचे म्हणजे या परिस्थितीला जो कोणी देश जबाबदार असेल त्याच्याविरुद्ध सगळ्या राष्ट्रांनी एकत्र येऊन त्याला हे दाखवून दिले पाहिजे की आम्ही सारे एकत्र आलो तर  तुलाही भिकेला लावू शकतो, अन्यथा आत्ता मिळालेलं यश त्यांच्या डोक्यात जाईल आणि मग इथून पुढे तो देश किंवा त्याचे बगलबच्चे, जेव्हा केव्हा परत अडचणीत येतील, तेव्हा पुन्हा अशाच प्रकारची नवीन

जैविक अस्त्रे वापरायला कमी करणार नाहीत. ज्यांना जी भाषा समजते, त्यांना त्याच भाषेत उत्तरे दिली गेली पाहिजेत. एकमार्गी चांगुलपणाने राक्षसी वृत्ती नष्ट होत नाहीत हाच खरे तर भगवतगीतेचा संदेश नाही काय?

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



(Image Curtacy - Google Images)

09-05-20

## 35. जागतिक महामारीच्या दशा आणि दिशा : भाग 5 उपसंहार.

परवा आपल्या देशाच्या सैन्याने हॉस्पिटलवर पुष्पवृष्टी करून आपल्या आरोग्य सेवकांचे आभार मानले. खरोखर ही माणसे मृत्यूशी झुंज देत आपले प्राण वाचवताहेत, यांची तुलनाच करायची झाली तर पावनखिंड लढवणाऱ्या बाजीप्रभूंशीच करावी लागेल. सारे जग त्यांच्याविषयी कृतज्ञ राहील.

घरात राहून आपल्याला आत्ता कल्पना येत नसली, तरी लॉकडाऊन संपल्यानंतर घराबाहेर पडणारे आपले पाऊल एका संपूर्णपणे नव्या विश्वात पडणारे पाऊल असेल याची आपल्याला जाणीव ठेवूनच पुढील वर्षभर आपल्याला वावरावे लागेल.

घरभर चपला घालून हिंडणे, बाहेरून आल्या आल्या हातपाय न धुता थेट स्वयंपाकघरात जाणे, गादीवर, कोचावर लोळणे, यासारख्या लाडक्या सवयींचा निश्चयपूर्वक त्याग करावा लागेल. मित्र मैत्रिणीमध्ये आपल्या भावनिक एकात्मतेचे फाजील प्रकटीकरण करण्यासाठी, एकच सिगरेट

दहा जणांनी ओढणे, एकाच डीशमधे खाणे, उगाचच एकमेकांच्या गळ्यात पडणे, टाळ्या देणे या सगळ्या गोष्टी ऐकायला कितीही कटू वाटल्या तरी टाळाव्या लागतील. गेली सहा वर्षे आपले मा. पंतप्रधान सार्वजनिक स्वच्छतेचा आग्रह धरीत आहेत, त्याची यथेच्छ टिंगल सगळ्यांकडून करून झाली. आता त्याने आपले मन भरले असेल तर त्याचा अवलंब करायला हरकत नाही.

खरे म्हणजे या महामारीच्या विरोधात युध्द लढताहेत शासकीय रुग्णालयातील इतर वेळी कोणाच्या खिजगणतीतही नसलेले डॉक्टर आणि वैद्यकिय कर्मचारी. त्यांच्या अवस्थेचे वर्णन काय करावे? सगळी गंजकी शस्त्रे, सडलेल्या तलवारी आणि भोकं पडलेल्या ढाली देऊन सरकार म्हणतय लढा ! तेही बिचारे आहे त्या शस्त्रांनिशी आणि तुटपूंज्या साधनांनिशी हे युध्द लढताहेत. इथून पुढच्या काळात अशी युध्दे वारंवार होणार, तेव्हा त्यांना शस्त्रसज्ज करण्याची नितांत आवश्यकता आहे. याचा सरकार आता तरी गांभीर्याने विचार करील अशी आशा करूया.

काही असलं तरी सैन्य, मग ते कुठलं का असेना? सीमेवरचं असो, दवाखान्यातलं असो किंवा रस्त्यावरचं असो, ते पोटावरच चालतं. या सगळ्यांचे पोट चालवण्याचं मोठ्ठ काम जीवाची जोखीम पत्करून खरे तर शेतकऱ्यांनी केलं आहे. त्यांच्या नशिबीचा वनवास कधी संपणार आहे, देवच जाणे ? सरकार कुठलही असू दे, शेतकऱ्याच्या वाट्याला उपेक्षाच येते . आत्तापर्यंत एकही मायेचा पूत शेतकरी आणि जनता यांच्यामधला दलालांचा अडथळा दूर करु शकला नाही. म्हणताना शेतीप्रधान देश म्हणायचे आणि शेतकऱ्याच्या पोटात काटे भरायचे हे किती दिवस चालणार आहे कुणास ठाऊक? या सगळ्या कठीण काळात अव्याहत, अखंडित सुरू असलेली गोष्ट म्हणजे बाबूलोकांची खाबूगिरी.

या माणसांना आपणही माणसे आहोत, राक्षस नाही हा साक्षात्कार कधी होणार आहे, परमेश्वर जाणे ? या सगळ्या प्रकारात, सगळी बिले वेळेवर भरणारा, सगळे टॅक्स न चुकता भरणारा, कसलीही सवलत न मागणारा आणि तरीही तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करणारा वर्ग म्हणजे मध्यम वर्ग. या वर्गाइतके आपल्या देशात कुणालाही गृहित धरलं जात नाही. आणि  तरीही आत्ता छातीवर हात ठेऊन

सांगतो, आत्ता या आपत्तीच्या काळात रस्त्यावर उतरून वेगवेगळ्या संघटना आणि वैयक्तिक स्वरूपात मदत करणाराही मध्यमवर्गच आहे. त्याची अवस्था मात्र सगळ्यांनीच, आई जेऊ घालीना आणि बाप भीक मागू देईना अशी करून ठेवली आहे .

शैक्षणिक क्षेत्रातले गोंधळ तर वर्णावे तेवढे कमीच आहेत. रोज नवीन जी आर, रोज नवीन नियम. परीक्षा होणार, नाही होणार, याची पूर्वपरीक्षा, त्याची उत्तर परीक्षा, चलन प्रत्यक्ष घेऊन जा, फी ऑनलाईन भरा. एकूणात शिकवणे सोडून, बाकी सर्व गोष्टी तपशिलवार चालतात आणि त्या एकाच तत्वावर चालतात ते म्हणजे, एनसीसीच्या मास्तरने गणित शिकवणे, गणिताच्या मास्तरने मराठी शिकवणे, मराठीच्या मास्तरने भूगोल शिकवणे इत्यादि, इत्यादि. जाणकारांच्या सर्व लक्षात आले असेलच.

इथून पुढे बाकी काही शिकवा न शिकवा राष्ट्रीय आपत्तीमध्ये कसे वागायचे एवढे मात्र नक्की शिकवा, ही कळकळीची विनंती. खरे तर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन हा विषय इथून पुढे प्रत्येक वर्षाला शिकवला जायला हवा.

सगळ्यात शेवटी एवढं म्हणेन की संकट कुठलेही असो जागतिक किंवा देशांतर्गत, आपल्याला तारून नेते ते आपले राष्ट्रीय चारित्र्य. त्याचा अभाव मात्र सध्या पदोपदी जाणवतोय. तो अभाव दूर करण्याची संधी आपल्याला या संकटाने दिली आहे, त्याचा आपण किती उपयोग करून घेतो यावर आपले व अख्ख्या मानवजातीचे भविष्य अवलंबून असणार आहे.

सध्याची जागतिक परिस्थिती लक्षात घेता ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातलं,

जो जे वांछिल तो ते लाहो

प्राणिजात .. हे मागणं मागायचं धाडस मी करणार नाही पण त्यातलं,

जे खळांची व्यंकटी सांडो,

तया सत्कर्मी रती वाढो .... हे मागणं मात्र अवश्य मागेन.

©अॅड. आनंद रा. देशपांडे.

09-05-20

## 36. श्री रायगड : काही स्मरणें

चैत्र शुद्ध चतुर्दशी, शिवपुण्यतिथीचा आदला दिवस. वसंताकडे जेवणं उरकून शिबंदीच्या घरट्यासमोरच्या खडकावर मी आणि राजू(राजेंद्रटिपरे) गप्पा मारत बसलो होतो. जगदीश्वराच्या देवळात, शिवसमाधीपाशी वर्दळ जाणवत होती.

थोडया वेळाने मंदिराच्या प्रांगणात इचलकरंजीकरबुवांचं किर्तन सुरु झालं. टाळ मृदूंगाचे आवाज वातावरणात भरून राहिले. तसेच किर्तन ऐकत वसंताच्या झोपडीबाहेरच्या अंगणात झोपून गेलो. पहाटे परत किर्तनाच्याच आवाजाने जाग आली. मारूतीजन्माचं किर्तन झालं. शिवपुण्यतिथीचा कार्यक्रम, सभा, मिरवणूक आटोपून आलेली तीन-चार हजार माणसं गड उतरून निघूनसुध्दा गेली. आमचा एक शिरस्ता ठरलेला होता. पुण्यतिथीच्या पौर्णिमेला गडावरून उतरायचं नाही. दुपारपर्यंत गड रिकामा झालेला असे. गडावर आमच्याव्यतिरिक्त कुणी नसायचं.

लख्ख पौर्णिमा, असा चांदीच्या ताटाएवढा चंद्र उगवायचा. त्या चंद्राच्या प्रकाशात मग रात्रभर भटकायचं. कधी होळीच्या माळावर, कधी नगारखान्यात, कधी बाजारपेठेत, कधी टकमकवर असे गप्पांचे फड रंगत असत. त्यादिवशी असेच संध्याकाळच्या सुमाराला हिरकणीवर सूर्यास्त बघून येताना बाबूरावकडे एमटीडीसीच्या कँटीनला थांबलो.

बाहेर व्हरांडयात बसून चहा घेतला. अंधार पडायला लागला तसे जगदीश्वराकडे निघालो. मुक्काम देवळात करायचा होता. गप्पा मारत मारत राजवाडा, राजसभा ओलांडून नगारखान्यासमोर आलो, पूर्वेला एक निराळीच आभा जाणवत होती. लवकरच चंद्रोदय होणार असे संकेत होते. राजूच्या डोक्यात तो उगवता चंद्र जगदीश्वराच्या शिखराआडून फोटोत कैद करायचा विचार आला नी आम्ही जरा वेग वाढवला. होळीच्या माळावर शुकशुकाट होता. वाऱ्याचाच काय तो आवाज.

काल रात्री या ठिकाणी दोनेक हजार माणसं होती हे कुणाला सांगूनही खरं वाटलं नसतं. झपझप पावलं उचलीत बाजारपेठ गाठली. तोपर्यंत पूर्वेला चाहूल लागायला लागली. बाजारपेठ ओलांडून आम्ही ब्राम्हणवाड्याशेजारच्या घळीत

शिरणार तोच राजूला फ्रेम सापडली, त्याने हातानेच मला थांबायची खूण केली. स्टँडवर कॅमेरा ॲडजस्ट करून आम्ही पापणीसुद्धा न लववता जगदीश्वराच्या कळसाकडे पाहू लागलो. कळसामागून उजाळ वाढू लागला. कळस, कडेचे स्तंभ, देवळाची मागची भिंत, अलीकडच बोरीच झाडं असं सगळं ओळीत काजळाने आखलेल्या रेघेसारखं दिसायला लागलं. अन् ....

अन् एका क्षणी गपकन तो पांढरा शुभ्र, शीतल तेजाचा गोळा त्या कळसामागून वर आला. आकार उगवतीच्या सूर्याएवढाच मोठा होता. मला चटकन माऊलींची ओवी आठवली,


मार्तंड जे तापहीन ...

तो असा दिसतच होता, पण होता तापहीन, शीतळ.

राजूच्या कॅमेराचा क्षणा क्षणाला आवाज येत होता. एका अलौकिक क्षणाचे आम्ही दोघेचं साक्षीदार होतो. पंचवीसेक पौर्णिमा तरी मी रायगडावर काढल्या आहेत. पण त्या रात्री तो जसा तेजःपुंज दिसला, तसा तो मला परत कधीही दिसला नाही. लख्खं चांदिणं गडभर पसरलं होतं. वसंताकडे जाऊन जेवणं केली आणि निवांत समाधीसमोर

नगारखान्याच्या पायऱ्यांवर बसून यथेच्छं गप्पा मारत बसलो. समोरचा भवानी टोकापर्यंतचा परिसर पंचामृतात न्हाल्यासारखां पांढरटं दिसत होता. पहाटे पहाटे कधीतरी देवळात जाऊन झोपलो.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



(Image Curtacy - Google Images)

16-05-20

## 37. समर्पण ....

काही काही वेळा सामाजिक क्षेत्रासारखा, पारमार्थिक क्षेत्रातला त्यागही आपल्याला थक्क करून सोडतो. सहा वर्षांपूर्वी एक दिवस संध्याकाळी सांगोल्याहून सुनील बिडकरचा फोन आला."उद्या सकाळी सातेरीला निघायचं आहे, मुक्कामाला ये". काही मित्र असे आहेत की त्यांनी सांगितल्यावर किंवा बोलावल्यावर निमूटपणे ऐकायचे एवढेच माझ्या हातात असते. का, कुठे, केव्हा, कशासाठी असले प्रश्न विचारायचे नसतात.

सकाळी गाडीत मी, सुनील, विठ्ठल आणि पराग घळसासी. सांगोला सोडलं ते संध्याकाळी थेट पावस गाठलं. धर्मशाळेत उतरून स्नान आटोपून दर्शन, प्रसाद घेतला. दुसरे दिवशी सकाळी गाडीत बसताना मी विचारलं, "आज कुठं?"

उत्तर आलं, "गोवा,सातेरी !" वाटेत कुठूनतरी सुनिलने फोन केला, "अण्णू काका, आम्ही चौघेजण येतोय,जेवायच्या वेळेपर्यंत पोहोचतो". मी शेवटी विचारलेच म्हटलं, " काय आहे हे सातेरी?" सुनिल हसला,म्हणाला,"सांगतो ऐक.

अण्णूकाका नवाथे नावाचे गोंदवलेकर महाराजांचे एक अनुगृहीत आहेत. त्यांची इथ सातेरीला पंचवीस एकर जमीन आहे. काही वर्षांपूर्वी या भागातल्या महाराजांच्या भक्तांसाठी, त्यांनी दर शनिवारी उपासना सुरु केली. पंचवीस तीस माणसे शनिवारी सकाळी येत, दिवसभर उपासना करून संध्याकाळी परत जात. त्यांचा जेवणखाण, चहा वगैरे सर्व काका काकू पहात.

हळूहळू संख्या वाढायला लागली. मग काकांनी उपासना मंदीर बांधायला घेतलं. स्वतःची पंचवीस एकर नारळी पोफळीची बाग मंदीराच्या नावानं करून टाकली. तुला एकदा हे सगळं दाखवायचं होतं."

एव्हाना आम्ही पोचलो होतो. गच्च नारळी पोफळीच बन, एका छोटया ओढ्यावरचा साकव ( पूल ) ओलांडून एका छान प्रशस्त कौलारू घरात प्रवेश केला.सत्तरी ओलांडलेले, थोडे कमरेत वाकलेले अण्णूकाका स्वागताला हजर.

"पटकन हातपाय धुवून दर्शन घेऊन या, स्वयंपाक तयार आहे". कडेलाच टिपीकल गोवा स्टाईलच महाराजांच मंदीर, प्रसन्न, शांत मूर्ती, सकाळच्या पूजेची फूलं अजून ताजी होती, मनोमन नमस्कार करुन बाहेर आलो. सभामंडपाच

बांधकाम सुरू होतं. जेवायला बसलो तर सगळं साग्रसंगीत जेवण तयार ! पण काकू कुठे दिसेनात म्हणून सूनीलने विचारलं तर काका म्हणाले, "अरे ती गेली आहे गावाला. म्हणून मग पटकन सकाळची पूजा झाली की स्वयंपाकाला लागलो. कसं झालयं सांगा?"

मला आश्चर्याचे धक्क्यावर धक्के बसत होते. सुनील म्हणाला, "काका एकटयाने कशाला एवढं करत बसलात?"

"अरे, तुम्ही महाराजांची लेकरं एवढया लांबून येणार, मग एवढं तरी नको करायला? आता वरं भक्तनिवासचे काम चालू आहे, तिथे हॉलमधे छान झोपा. दुपारी चहा झाला की मी हाक मारतो". एप्रिलचा महिना होता.ऊन मी म्हणत होते, त्यातून गोव्याची हवा. सगळ्या अंगातून घामाच्या धारा लागल्या होत्या. फॅनचं वारंपण गरम येत होतं.

मी सहज खिडकीपाशी जाऊन उभा राहिलो तर खाली सभामंडपाच्या कामापाशी सत्तरी ओलांडलेले अण्णूकाका व्हायब्रेटरने पायाचा खडक फोडत होते. माणूस एखाद्या ईश्वरी तत्वाशी जोडला गेला की तो किती पराकोटीचा समर्पणशील, दातृत्ववान आणि प्रेमळ होऊ शकतो याचं हे दांपत्य म्हणजे आदर्श उदाहरण आहे. गोवा म्हटलं की

अनेकांना अनेक गोष्टी आठवतात. मला मात्र आठवतं ते सातेरी आणि नवाथे दांपत्य !

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



25-05-20

## 38. असा जातोयं दिवस .....

चांगल साडेपाच पावणेसहापासूनच फटफटायला सुरुवात झालेली असते. इतके दिवस गायब झालेल्या साळुंक्या समोरच्या गच्चीवर कोल्हाळ करायला लागतात. गच्चीवर एक पाण्याची टाकी आहे. तिचं झाकणं वाऱ्यानं उडून गेलयं. त्या टाकीत कलकलाट करत त्यांच्या आंघोळी चालतात. अगदी पिंजरा पिक्चरमधल्या देरे कान्हा चोळी लुगडी स्टाईलमधे. तोपर्यंत उजव्या हाताच्या जांभळाच्या झाडावर अचानक नवऱ्याची आठवण आलेल्या बाईसारखी कोकीळा कर्कश्श ओरडू लागते.

मी उठून चहासाठी स्वयंपाकघरात येतो. सगळा जामानिमा गोळा करेपर्यंत, समोरच्या शाळेच्या लिंबाच्या झाडावरुन भारव्दाजाचं ऑउप्प ऑउप्प सुरू होतं. एकाचे कॉल सुरू झाले की, दुसरा मागच्या शाळेच्या नारळाच्या झाडावरुन रिकॉल सुरू करतो. मी गॅसवर चहा तसाच टाकून त्याला बघायला बाहेर गॅलरीत येतो. नशीब चांगल असलं तर महाराज दृष्टीस पडतात किंवा मग या झाडावरुन त्या झाडावर केलेली शानदार फ्लाईट पहायला मिळते.

तोपर्यंत शेजारच्या रिकाम्या फ्लॅटमधली कबुतरं बाहेर पडलेली असतात. त्याचं हं हं हं हं चालू होतं. साडेआठ नऊपासून ऊन चांगलचं तापायला सुरुवात होते. त्याचे वाफारे यायला सुरुवात होते. मग हे सगळे आवाज सावलीच्या आडोशाला जाऊन बसतात. दोन तास ऑफिस आटोपून येताना आकाशाकडं नजर टाकावी तर अशा उन्हातदेखील एखादी घार उंच, संथ उडत असते.

जेवण होईपर्यंत उन्हाची भट्टी चांगली तापलेली असते. दरवाजात, गॅलरीत चांगल्या झळा लागतात. वामकुक्षी घेण्यासाठी खोलीत जावं तर खिडकीच्या,दाराच्या फटीतून आलेल्या उन्हाच्या तिरीपेकडे बघवतपणं नाही. गेले पंधरा दिवस सलग तापमान एक्केचाळीस ते त्रेचाळीस आहे.

पाच वाजायच्या सुमारास पुन्हा समोरच्या पाण्याच्या टाकीवर पक्षी मेळा गोळा होतो. पण सकाळचा उत्साह त्यात नसतो. पाणी पिऊन अंधार पडायच्या आत घर गाठायची घाई असते. सूर्य समोरच्या जैन मंदिराच्या कळसावर आला की संध्याकाळची चाहूल लागते.

चाहूल एवढयासाठीचं म्हटलं की पुण्यासारखं, कोल्हापूरसारखं वारंबिरं सुटत नाही. वातावरणातला उष्मा

कमी व्हायला चांगले रात्रीचे दोन वाजतात. गॅलरीत उभं राहिलं तरी कठडयाचा चटका बसतो, तरीपण संध्याकाळची पश्चिमेची रंगपंचमी पहायचा मोह काही सुटत नाही. आकाशाच्या पार्श्वभूमीवर संध्याप्रकाशात समोरचं शिखर, त्यावरचा धर्म ध्वज, वर आकाशात रेघोट्या मारणाऱ्या बगळ्यांच्या माळा पाहता पाहता अंधार पडतो.

अलिकडे सलग अडीच तीन महिने शाळा बंद असल्याने समोरच्या दोन शाळांच्या वरच्या मजल्यांवरच्या खिडक्यांच्या छतावर पाच सहा घुबडं येऊन बसतात. इकडे एका लिंबावर एक पिंगळा बसतो.

त्या पिंगळ्याचं श्श ... श्श .... सुरु झालं की इकडे घुबडं किचकिचाट करतात. समोरचा रस्ता दुपारी दोनलाच शांत झालेला असतो. मागच्या शाळेच्या गॅलरीत मागच्या महिन्यात एक मधमाशांच पोळं लागलं. बघता बघता ते भलं मोट्ठं झालं. घागरी, दोन घागरी मध निघेल त्याच्यातून. त्या पोळ्याच्या सरळ रेषेत माझी टीव्हीची खोली असल्याने अंधार पडून टीव्ही लागला की, चार पाच माशा येऊन टयूबलाईटभोवती घोंघावू लागतात.

मग जेवणाची तयारी होईपर्यंत त्यांना हाकलण्याचा उद्योग. जेवणं झाली की दिवसभरातलं झोपायच्या आधीचं एकदा मोबाईल पाहणं. सध्या भटक्या कुत्र्यांचं रस्त्यावर अनभिषिक्त साम्राज्य असल्यानं, त्यांचे सीमावाद दहा वाजल्यापासूनचं सुरू होतात. त्यातून आमचं शहरं पुढाऱ्यांचं, गल्लीगणिक कमीत कमी दोन दोन तरी पुढारी, तीच परंपरा यांचीही, त्याच्यामुळं एखादा पुढारी, त्याचा घोळका आणि दुसरा पुढारी आणि त्याचा घोळका अशी काही काळ युध्द रंगतात. नेहमीसारखा शेवट, शेपटी घालण्यानं होतो.

तोपर्यंत झोपेचं एक आवर्तन झालेलं असतं. पाणी प्यायला उठून बसावं तर कुठलं तरी एखाद्या गल्लीतलं कुत्रं एक भेसूर सूर धरतं आणि मग त्याच्या पाठोपाठ या गल्लीतनं, त्या गल्लीतनं त्याची आवर्तनं सुरू होतात. वातावरण आणखीनंच भयाण होतं. घरापासून ते जगापर्यंतचे सगळे नकारात्मक विचार मेंदूत गर्दी करतात. त्यांना हातात काठी घेतलेल्या पोलिसाप्रमाणे हाकलून देता देता मेंदू थकून जातो आणि कधीतरी माझ्या नकळत डोळे मिटतात.

ता.क . उगीच मोठमोठया पुस्तकांची नावं सांगून सध्या हे वाचतोय, ते वाचतोय असलं किंवा रोज एक तास व्यायाम करतो, असल्या थापा मारणार नाही. तो सगळा उत्साह पहिल्या महिन्यातच संपला. फेसबुकवर लाईव्ह येऊन दुसऱ्याला चाटण द्यायला माझ्यापाशी कुठलीही मूळी अथवा मात्रा नाही, उपदेशाचा डोस द्यायची माझी पात्रता नाही. त्यामुळे उद्याची चिंता करीत मी बापडा एक मध्यमवर्गीय झोपेची आराधना करतो.

अगदीच निद्रादेवी अप्रसन्न असेल तर वीस लाख कोटींवर किती शून्ये द्यावी लागतात किंवा परवाच्या घोषणेत मध्यमवर्गीयांसाठी नक्की काय होतं? असे प्रश्न मनाला विचारतो म्हणजे मग मनासह बुद्धि शरणागती पत्करून चटकन झोपेच्या अधीन होते.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

26-05-20

## 39. श्रीरायगड : काही स्मरणें.....

सरता पावसाळा होता. अजून पावसाची झड काही ऊणावली नव्हती. प्रतापगडावरचा ललितापंचमीचा ऊत्सव आटपला आणि गाडी तशीच पुढे रायगडला दामटली. पाच वाजायचा सुमार होता, पाचाडला पोहोचलो.

तेव्हा देशमुखांचे हॉटेलचे नूतनीकरण अजून झाले नव्हते, झोपडीवजा हॉटेल होते. मी, राजेंद्र टिपरे आणि सोलापूरची काही मित्रमंडळी होती. आभाळ भरून आलं होतं. गरमगरम कांदाभजी, चहा असा बेत सुरु होता आणि पावसाला सुरुवात झाली. हा असा बोराएवढा थेंब कोसळू लागला. बघता बघता हॉटेलच्या शेजारच्या ओढयाच पाणी वाढलं. हॉटेलमधे घोटाभर पाणी आलं. वरुन पाण्यातनं वहात आलेले विरुळे, नानेट्या टेबलाखाली घोटाळू लागल्या. आम्ही सगळे पाय वर घेऊन मांडया घालून बसलो.

तासभर पावसाचा धिंगाणा चालू होता. हा हॉटेलशेजारून वाहणारा ओढा कोंझरच्या पुढे एका कडयावरून खाली कोसळतो, तिथे एक छान धबधबा तयार होतो, ते ठिकाण माहिती असल्याने सगळी मंडळी गाडीत घातली आणि

धबधबा दाखवून आणला. पुन्हा एक चहाचं आवर्तन झालं, पाऊस ऊणावला होता. सॅक पाठीला लावल्या आणि हॉटेल सोडून रस्त्याला लागलो. समोर जे काही दिसलं त्यानं वाचाच बसली.

शंभर एक म्हशींचा कळप शेण टाकत गेल्यावर रस्त्यावर जसे शेणाचे असंख्य ढीग पडलेले दिसतील तसे बिळात पाणी शिरल्यानं रस्त्यावर सापांची वेटोळी पडली होती. एवढे असंख्य साप पहिल्यांदा पाहिले. सर्वानुमते मुक्काम पाचाडलाच करायचा ठराव तातडीने मंजूर झाला. रघुवीरच्या ओळखीने सार्वजनिक बांधकामखात्याच्या गेस्टहाऊसमधे रात्र काढली. सकाळी लवकर उठून चितदरवाजा गाठला. कालचा पाऊस जोरातच झाला होता. गडाचे तीनही धबधबे अजून छान सुरु होते.

खूबलढा बुरुजापाशी आलो आणि काय आश्चर्य, ठराविक वर्षांनंतर (बहुधा सात) फुलणारी कारवी, यावर्षी फुलली होती. वाटेच्या कडेने कारवीचा, तेरडयाचा आणि सोनकीचा जणू बांध घातला होता. महादरवाज्यापाशी आल्यावर तर तटावरून कोसळणारे धबधबे, खालचं पिंपळाच झाडं आणि दरवाजा ते टकमक पसरलेलं गवत, त्यावरची तेरडा

सोनकीची नक्षी असं काही अद्भूत दिसतं होतं, आमचे सोलापूरकर पार खूळाऊन गेले. गडावर गेल्यावर सॅक धर्मशाळेत टाकल्या आणि खुळ्यासारखे होळीच्या माळावर धावलो. अख्खा गड हळद लागल्यासारखा पिवळाधमक दिसत होता. चांगला दोन दिवस मुक्काम ठोकला. परतताना पुन्हा सगळं ते दृश्य डोळयात साठवून घेतलं. एक गोष्ट मनाशी नक्की केली. इतर कोणत्याही वेळेला रायगडला जाणं झालं तरी पावसाळ्यात एक चक्कर नक्की मारायची.

दोन वर्षापूर्वी बत्तिसशिराळ्याच्या घाटातून मलकापूरला चाललो होतो. कोकरूड फाटयापासूनच पाऊस सुरु होता. घाट सुरू झाला आणि पुन्हा रस्त्यावर तशीच सापांची वेटोळी पडलेली दिसली. न राहवून पुन्हा एकदा रायगड आठवला. म्हणलं वेळ आहे हाताशी तर तुम्हालाही सांगावी आठवण. गेला नसाल कधी तर एकदा जाऊन या पावसाळ्यात रायगडला.

©अॅड. आनंद रा. देशपांडे.

07-05-20

## 40. एक बुडालेली आठवण:- हिर्डोशि.

पूर्वीच्या पुणे रायगड रस्त्यावर, भोरनंतर वरंधपर्यंत चांगला तीस-पस्तीस किलोमीटरचा घाट होता, वरंध्याचा घाट!
भोर सोडून ऐन घाटात शिरायच्या आधी एक टुमदार खेडं लागायचं हिर्डोशि ! उजव्या हाताला अन् डाव्या हाताला पसरत गेलेल्या सहयाद्रिच्या पर्वतरांगा, याच रांगेत कुठतरी नीरा नदीचा उगम. आसपासच्या डोंगरातून या नीरेला खळाळत येऊन मिळणारे ओढे. डोंगर उतारावर बांबूची बनं, भाताची खाचरं अस सगळ निसर्गसौंदर्य घेऊन हे गाव येत्या जात्या वाटेवरचा एक थांबा होतं.
दुपारी दीडच्या रायगड गाडीचे ड्रायव्हर कंडक्टर इथे जेवायला थांबत. रस्त्याच्या कडेला दोन तीन मोठी पत्र्याची हॉटेल, समोर टोपल्यातून करवंद, तोरणं, ताडगोळे, जाम असा कोकणचा मेवा घेऊन बसलेल्या कातकरी स्त्रिया, जंगलातून लाकूड फाट्याच्या मोळ्या डोक्यावर आणून विकायला बसलेले मोळीविके. एका शेडचं एसटी स्टँड, शेजारीच जिल्हा परिषदेची शाळा.

बऱ्याच वेळा ड्रायव्हर, कंडक्टरचं जेवण होईपर्यंत आमची पोटपूजा चालायची. भजी, मिसळ, बटाटेवडा, एकदा पोटोबा थंड झाला की मग घाटात छान झोप लागायची.

एकोणनव्वद सालचा जून महिना, मी आणि डॉ. लोहोकरे मोटरसायकलवरून रायगडला चाललो होतो. पाऊस सुरु होऊन पंधरा दिवस झाले होते. नीरेला बऱ्यापैकी पाणी होते. भाताच्या खाचरांतून तांदळाच बी पिस्कारून चिखलात उगवलेली हिरवीगार रोपं वाऱ्यावर डोलत होती.

गावाच्या अलिकडे एका छोटया वळणावर एक छोटा पूल होता, त्याच्या उजव्या बाजूस एका ओढयावर तयार झालेला छोटा धबधबा. स्टँडवर चहा झाला. भिजतच घाटात शिरलो. रवीला म्हटलं, भाताची खाचरं काय छान दिसत होती नाही? भात तयार झाल्यावर काय दरवळ सूटत असेल? तो म्हणला, त्यात काय पुन्हा ऑक्टोबरमधे परत येऊ आणि खरचं त्याचं वर्षी परत ऑक्टोंबरमधे आम्ही दोघेचमोटरसायकलवरून रायगडाला गेलो होतो. भोरपासूनच तयार भाताचा दरवळ आसमंतात पसरला होता. नदीच्या काठी बसूनच बरोबरची थालीपीठं खाल्ली आणि थेट हरिहरेश्वर गाठलं.

असा तो रायगडवारीतला महत्वाचा थांबा! पुढं पाच दहा वर्षात नीरा देवधर प्रकल्पाच काम सुरू झालं. तुंबणार पाणी पार मागं डोंगरापर्यंत जाणार होतं, निम्म्यापेक्षा जास्त रस्ताही पाण्याखाली जाणार होता म्हणून मग गाव उठवलं, रस्ताही उचलून वर डोंगरावर नेला.

एक हसतंखेळतं खेडं, त्यातल्या आठवणीसह पाण्यात बुडून गेलं. तो स्टँड, ती शाळा, सगळं सगळं!

शिल्लक उरले फक्त पाण्यातून वर आलेल्या झाडांचे शेंडे .

मागच्या वर्षी मार्चमधे, रायगडवर फत्ते शिकस्तच्या संहितेचं पूजन करून परतत होतो. उन्हाळा असल्यानं पाणी पार पुढंपर्यंत गेलं होतं. मागचा सगळा भाग उघडा पडला होता.

एका वळणावर गाडी वळली आणि शाळेच्या ढासळलेल्या दगडी भिंती पाण्यात अर्धवट दिसल्या. क्षणभर गाडी थांबवली. ती शाळा, त्याशेजारचा एसटी स्टँड, डाव्या हाताचा पूल, समोरच्या पाण्यात विरून गेलेल्या कूडाच्या झोपड्या. आठवणींची किलकिली झालेली दार घट्ट लावून घेतली. डोळे मिटले. नकळत हात जोडले गेले. ड्रायव्हर माझ्याकडं बघतच राहिला.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

28-05-20

## 41. आत्ता लक्षात येतयं .......

दोन महिने पूर्ण आप्तस्वकीयांच्या गराडयात असूनही, सगळ्या प्रकारचे जिभेचे चोचले पूरवले जात असूनही, सगळ्या सुखसोयी आजूबाजूला असतानासुध्दा मन रमत नाहीएं, सारखं उचलून टाकल्यासारखं होतय. म्हणून आत्ता समजतयं तात्या, की अंदमानात तुम्ही अकरा वर्षे कशी काढली असतील ?

ती वरच्या मजल्यावरची अरुंद, अंधारी कोठडी, एकटेपणाशिवाय, दुसरं कोणीही सोबतीला नाही, दरवाज्यात गजांना धरून उभं रहावं तर समोर दिसणारा फाशीचा वधस्तंभ, आभूषणं म्हणून हातापायातले साखळदंडांचे अलंकार, त्या रबरासारख्या रोटया आणि पालींचे, सापांचे तुकडे असलेल्या भाज्या ! कुणासाठी सहन केलतं हे सगळं ? रक्ती आव झालेली असतानासुद्धा तो फिरवलेला कोलू, ती काथ्याकूट कुणासाठी केलतं हे सगळं ? या भारतभूमीला स्वातंत्र्य मिळावं म्हणून ? पण मग तिला स्वातंत्र्य मिळाल्यावर एकमताने तुम्हाला या देशाचे पहिले राष्ट्रपती

म्हणून मानाने नेमलं जायला हवं होतं, तिथं खुनाच्या गुन्ह्यातला आरोपी म्हणून लाल किल्ल्यात बसवलं गेलं. आत्ता लक्षात येतयं तात्या, तुम्हाला त्यावेळेस काय वेदना झाल्या असतील ? अंदमानापेक्षा जास्त त्या वेळेला तुम्ही व्यथित झाला असाल !

रत्नागिरीत तुम्ही पतितोध्दाराचं केवढं काम केलतं ? ती सहभोजनं, ते पतितपावनमंदीर ! त्यांनीही तुम्हाला आजपर्यंत कधीही मनापासून स्विकारलं नाही. कुणासाठी करत होतात हे सगळं ? ज्यांनी तुमचं नाव घेण्याआधी दहावेळा प्रायश्चित्त घ्यायला पाहिजे होतं, तीच मंडळी आजही तुम्हाला माफीवीर म्हणून हिणकस शेरे मारताहेत. त्यांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी एवढं दिव्य करायची काय गरज होती ? कमरेचं धोतर बदलण्याइतक्या सहज रितीने ज्यांनी आपल्या भूमिका बदलल्या, डोक्यावरची टोपी बदलण्याइतके सहजपणे ज्यांनी आपलं हिंदुत्व बदलले त्यांच्यासाठी इतक्या खस्ता खायची काय गरज होती ?

तात्या तुमच्या जन्मवेळेचा कायं गुण होता कुणास ठाऊक, पण जिवंतपणी आणि मेल्यानंतरही तुमच्याइतकी वंचना कुणाच्याच वाट्याला आली नाही !!

आत्ता लक्षात येतयं तात्या, तुम्ही या लोकातले मानव नव्हताच. तुमचं अवतारकार्य आम्हा पामरांना कधीच कळलं नाही. वावटळीत भरकटणारांनी वादळाला आमंत्रण दयायचं नसतं, होळीच्या हुडव्यातला नारळ काढणाऱ्यांनी ज्वालामूखीच्या वाटेला जायचं नसतं.

तात्या, तुमच्या अंतःकरणातून बाहेर पडणारा देशभक्तिचा रसरसता लाव्हा पेलण्याची सोडाच,पहाण्याचीपण आमची ताकत नाही. जात-पात, धर्म, स्वार्थ, राजकारणं, अहंकार, अप्पलपोटेपणा यांच्या चिखलात लिडबिडलेली, वळवळणारी गांडुळं आम्ही, आम्हाला शेषाचं रुप काय सहन होणार?

आत्ता लक्षात येतयं, शरीरात ताकद असेतोपर्यंत तुम्ही आमच्यासाठी झटलात. पण शेवटी शेवटी तुमच्याही लक्षात आमची पात्रता आली असेल. सभोवताली चाललेलं व्यक्तिपूजक राजकारण पाहून तुम्हालाही वाटलं असेल, हेचि फळ काय मम तपाला? म्हणून मग तुम्ही इच्छामरणी पितामह भीष्मांसारखं इच्छामरण स्विकारलतं, प्रायोपवेशन करुन !!

दाराशी आमंत्रण देऊन बोलावलेल्या मृत्यूच्या खांद्यावर हात टाकून स्वर्गी निघून गेलात.

तुमचे कष्ट, तुमचा त्याग, तुमची विजिगीषु वृत्ती,तुमचं साहित्य, तुमचं काव्यं, तुमची प्रखर देशभक्ति, तुमचं द्रष्टेपण, तुमची दूरदृष्टी, तुमच्यातला अखंड सावध असणारा राजकारणी यातलं काही काही आम्हाला समजलं नाही, काही काही लक्षात राहिलं नाही, लक्षात राहिली फक्त तुमची जात ! कारण हल्ली आपल्या देशात तेव्हढ्या एकाच गोष्टीची चलती आहे. त्यावरूनच तुमचं कर्तृत्व स्वीकारायचं की नाकारायचं हे ठरवलं जातं. तात्या, माफ करा आम्हाला !!

आत्ता लक्षात येतयं की तुम्हाला अनुयायी का मिळाले नाहीत, कारण तुम्ही एक लखलखती, धगधगती अग्निशिखा होतात, तुमच्याबरोबर चालून कोण कशाला स्वतःला जाळून घेईल ? ©ॲड. आनंद रा. देशपांडे. .

(Image Curtacy - Google Images)



31-05-20

## 42. खापराचा खेळ .......

आपल्यासारख्या (तथाकथित) लोकशाही असलेल्या देशात कुठलीही समस्या हाताबाहेर गेली की ती समस्या निर्माण करणारे, ती समस्या वाढण्यासाठी हातभार लावणारे, त्या समस्येचा फायदा उठवणारे, त्या समस्येकडे दुर्लक्ष करणारे, त्या समस्येवर उपाय सुचवणारे, त्या समस्येशी संबंधित असलेले, संबंधित नसलेले सगळे मिळून एक आवडीचा खेळ सुरू करतात.

तो म्हणजे खापराचा खेळ आणि एकदा का खेळ सुरु झाला की त्या समस्येचा पुरता खेळखंडोबा होतो. आणि त्या समस्येमधे होरपळून निघालेल्या सर्वसामान्य जनतेला तो खेळ बघत रहाण्याशिवाय दूसरं काही करता येत नाही.

काय असतो हा खेळ ? एका मोठया गोलामध्ये ( आताच्या संदर्भात संपूर्ण देशभरामध्ये ) ही लोकांनी, लोकांसाठी निर्माण केलेली जी लोकशाही आहे त्यामधले जबाबदार लोक, मग ते कुणीही असतात, राजकारणी, समाजकारणी, पत्रकार, साहित्यिक, शासनातील अधिकारी, कर्मचारी, व्यावसायिक आणि बेजबाबदार नागरिक आपापल्या

जबाबदारीचे खापर घेऊन त्या रिंगणात येतात आणि एकदा का ती समस्या हाताबाहेर गेली की मग अत्यंत चतुरपणे आपल्या हातातील जबाबदारीचे खापर दूसऱ्याच्या डोक्यावर फोडायचा प्रयत्न सुरू करतात. मात्र हे करताना दूसरा कुणी त्याचे खापर आपल्या डोक्यावर फोडणार नाही याची काळजी घ्यायची असते.

एकदा का, हा खेळ सुरू झाला की सर्वसामान्य होरपळलेली जनता हताशपणे हा खेळ पाहात बसते, क्वचित प्रसंगी टाळ्या वाजवते, क्वचित प्रसंगी तल्लीन होते, कधी बेभान होते पण मूळ मुद्दा म्हणजे ती मूळ समस्या विसरून जाते अशी या खेळाची ताकद आहे .

सध्या आपल्याकडे हाच खेळ रंगात आला आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, शासकीय अधिकारी, प्रशासन, राजकारणी, त्यांचे पाठीराखे, त्यांचे विरोधक, बेजबाबदार नागरिक सगळे जण या महामारीच्या समस्येच्या कारणावरून हा खेळ खेळत आहेत. तीन महिने घरात बसून असलेले, उपचाराची वाट पहात शासकीय रुग्णालयात पडून असलेले, उपचारासाठी आपला नंबर कधी लागतो याची वाट पहात असलेले, रस्त्यावर, घरात मरुन पडणारे,

जात्यातले , सुपातले सगळे जण हा रंगलेला खापराचा खेळ आता टीव्हीवर, फेसबुकवर, ट्वीटरवर, वर्तमानपत्रात लाईव्ह पहातील, मरेपर्यंत आपली करमणूक करून घेतील. जगून वाचून शिल्लक राहिलेले, पुन्हा याच लोकांच्या पालख्या वाहतील आणि पुन्हा पुढच्या समस्येची आणि त्यानंतरच्या खापराच्या खेळाची वाट पाहतील. लोकशाहीचा विजय असो !!

©अ‍ॅड. आनंद रा. देशपांडे.

14-06-20

## 43. म्हणे नरसैयो तेनो .....

पहाटेचं गार वार सुटलं, तसं पांघरूण गुंडाळून मुरकुटून झोपलो. उन्हाळ्याचे दिवस होते, त्यामुळे मुक्काम सांगोल्यात होता. दिवसभर शेतात, मित्राच्या पोल्ट्रीवर, कुठं कुठं भटकून झालं तरी रात्री बऱ्याच वेळा मित्राच्या, सुनीलच्या गच्चीवर झोपायला असायचो.

सुनीलच घर थोडं एका बाजूला, भोवती बाभळीचं रान, काही जुन्या बाभळीच्या फांद्या गच्चीवर पसरलेल्या असायच्या. सिमेंटची गच्ची दिवसभर तापलेली असायची. मग झोपण्यापूर्वी बादलीभर पाणी मारून गप्पा मारत बसायचं. त्या रात्री अंथरूणावर पडून बराच वेळ संत साहित्य, त्यावरची गायकी असं गप्पाष्टक सुरु होतं. पहाटेच्या गारठयात झोप लागली. काही झालं तरी सुनीलला पहाटे उठायची सवय होती. माझं सगळचं निवांत. माझ्याबरोबर त्याचा दुसरा चहा व्हायचा. त्या पहाटे त्याने उठल्या उठल्या रामरतन धन पायोची कॅसेट लावली.

मी अर्धवट जागा, अर्धवट झोपेत. पण लताबाईंचे स्वर, नरसी मेहता, तुलसीदास, मीरा यांची भजनं, पहाटेची शांत

वेळ काही वेगळाच माहौल जमून गेला. एक एक भजन असं आत आत मनाच्या गाभाऱ्यात उतरत होतं. वैष्णवजन तो तेणे कहिए रे.. याचा कॉपीराईट गांधीजींचा. त्यामुळे ते कधी एवढं मनापासून, निवांत ऐकलं न्हवतं. पण त्या पहाटे, त्या वातावरणात, लताबाईंनी माझी शिकवणीच घेतली. नरसी मेहतांच्या भजनाचा एकेक पदर उलगडून दाखवला. माहौलच असा होता की एक एक ओळ मनाच्या तळापर्यंत उतरत गेली.

पंढरपूरच्या विठोबाच्या देवळाच्या सभामंडपात कधीतरी नरसी मेहतांचे चित्र पाहिलेलं, पण त्या वेळी जो अर्थ मनात उतरत होता त्यावरुन, पुण्य ते परोपकार, पाप ते परपीडा, म्हणणारे पराविया नारी, माऊली समान म्हणणारे, तुकोबाच दिसत होते. कुणीतरी म्हटलयं, संत दिसती वेगळाले, परी अंतरी मिळाले. हे किती खरं आहे. काल मुलगी आवडीने वैष्णवजन ऐकत होती, तिला म्हणालो,"अर्थ कळतोय का?" ती म्हणाली, "तुम्ही सांगा की !" आज तिला अर्थ सांगताना, मला तो कसा आणि केव्हा कळला हेही सांगेन. सहज वाटलं तुम्हालाही सांगावं.

©अॅड. आनंद रा. देशपांडे.

15-06-20


## 44. या वाटेने ......

या वाटेने ......
या वाटेने जावे वाटे,
जिकडे वाट फुटे ॥
हिरवा पाऊस, ओला वारा
सजल घनातून, बरसत धारा
चिंब दाटल्या, गच्च धुक्यातुन
अवचित कुणी भेटे ..
या वाटेने, जावे वाटे
जिकडे वाट फुटे ॥१॥

तृणांकुरांचे उभवुनी पाते
रोप सानुले, सुचवुनी जाते
कधीकाळच्या तृषार्त बीजा
जीवनरस भेटे .....
या वाटेने जावे वाटे,
जिकडे वाट फुटे ॥ २॥

पानांवरती ओली थरथर
वेळूमधुनी घुमे सुस्वर
दवबिंदूंचे होऊन ओझे
एखादे पान तुटे ....
या वाटेने जावे वाटे
जिकडे वाट फुटे ॥ ३ ॥

भोगीत जावे, हे वनवैभव
उमटू न द्यावे, कुठे पायरव
अनाघ्रात या सौंदर्याने
नयनांचे ऋण ही फिटे
या वाटेने जावे वाटे,
जिकडे वाट फुटे ॥४॥ ©ॲड. आनंद रा. देशपांडे.



18-06-20

## 45. क्षेत्रसंन्यास

विजयदुर्गातलं एक देखणं, चौसोपी, कौलारू घर, ओसरीपुढे देखणी, काळजीपूर्वक जपलेली फुलबाग, एक प्रसन्न तुळशी वृंदावन, बाग संपे, तिथून समुद्राची पुळण सुरू होई. पुढं नारळीच, सुरूचं बन. घराच्या डाव्या उजव्या हाताला स्वच्छ, सारवलेलं अंगण. नारळाच्या, पोफळीच्या वाऱ्याने पडलेल्या झावळ्या नीट एकावर एक रचून ठेवलेल्या. मागच्या बाजूला ओसरी. परसात एक छोटासा आड. पाच पंचवीस नारळाची आणि पोफळीची झाडं. सगळं घर लख्ख. पांढराशुभ्र रंग दिलेला. अगदी घरावरच्या कौलांच्या फटीतसुध्दा कुठही गवत उगवलेलं नाही. दारात सुरेख रांगोळी.

तिन्हीसांज झाली, तशा प्रभावतीताई (म्हणजे माझा मित्र राजीवची आजी ) हातात दिवा घेऊन तुळशी वृंदावनापाशी आल्या. खालच्या कोनाडयात दिवा ठेवून त्यांनी हात जोडले आणि त्या ओसरीवर येऊन खुर्चीत टेकल्या. भरती सुरु झाली होती, पौर्णिमा अमावस्येला कधी कधी पाणी सुरूच्या बनापर्यंत यायच. आज भरतीच पाणी जरा जास्तच

खुंदळत होतं. भरतीची आठवण झाली तशी आजीच्या चेहेऱ्यावर एक हलकीशी स्मितरेषा उमटली.

ऐंशी वर्षांपूर्वी म्हणजे एकोणीसशे चौतीस साली ही दयागौरी रमाकांत प्रभूदेसाई, सोळाव्या वर्षी लग्न होऊन प्रभावती प्रभाकर परुळेकर बनून विजयदुर्गात आली त्या दिवशीपण भरती होती. मोठी भरती ! त्या दिवशी ती अशीच ओसरीच्या खांबाला टेकून लाटांकडे पहात उभी होती.

प्रभाकरपंतांच गावात दुकान होतं. चुलत, आते - मावस, मामे भावंडांचं मिळून तीस चाळीस जणांच कुटुंब. पै पाव्हणा, नोकरचाकर मिळून पन्नास जणांचा स्वयंपाक दुवक्त करावा लागे. भरतीपाठोपाठ ओहोटी येते म्हणतात ती गत झाली. मूलं मोठी झाली तशी शिक्षणाच्या, नोकरीच्या निमित्ताने स्वतंत्र घरं झाली. पूणे, मुंबई, रत्नागिरी, कोल्हापूर आणि मग पाखरांना पंख आले तसे पाखरं उडून दूरदेशी गेली. कुणी अमेरिका, कुणी इंग्लंड, कुणी ऑस्ट्रेलिया.

पन्नास लोकांनी भरलेल्या या घरात आता फक्त दोन माणसं उरली एक आजी आणि एक मुलगा. सगळ्याच गोष्टींना ओहोटी लागलेली. आजीचं वयपण आता चौऱ्याण्णव म्हणजे तीपण एक ओहोटीच !

आजीची नजर दूर दिसणाऱ्या विजयदुर्गाच्या तटावर खिळली होती. सारं जग हा किल्ला पहायला येतं पण आपण गेली ऐंशी वर्ष इथ या किल्ल्यासमोर राहून कधी हा किल्ला पाहिला नाही. एवढच काय, लग्न होऊन आले तशी या ऐंशी वर्षात विजयदुर्गाच्याबाहेर पाऊलसुध्दा टाकलं नाही.

काय म्हणालात? कस शक्य आहे? अहो पण हे माझ्या बाबतीत घडलं ना. क्षेत्रसंन्यास घेतलेल्या एखाद्या तपस्विनी सारखी, मी गेल्या ऐंशी वर्षात या गावाच्या वेशीबाहेर पाऊलही ठेवलं नाही. काय सुरुवातीच्या काळात हळदीकुंकुवाला गावात गेली असेन तेव्हढीच. खर नाही ना वाटत. अहो पहिली पन्नास वर्ष तर या पन्नास जणांच्या कुटुंबाचं हव-नको बघण्यात गेली, पुढची तीस वर्ष माहेरपणं, बाळंतपण करण्यात गेली. आत्ता चौऱ्याण्णव संपेल. आपल्या पायांनी उभी चालत या घरात आले होते, आता चौघांच्या खांद्यावरून आडवीच जाईन.

अशी विचारात हरवले असता मुलगा, कोल्हापूरचा नातू राजीव आणि त्याचे तीन चार मित्र आले. राजूने ओळख करून दिली. पोरं घर पाहून हरखून गेली, तोपर्यंत आत जाऊन त्यांच्यासाठी गुळ पापडीचे लाडू घेऊन आले.

मग पुन्हा थोड्या गप्पा. निघताना राजूचे मित्र म्हणाले, "पुढच्या वेळी इथे रहायलाच येऊ." हसून म्हटलं, "मी आहे तंवर या."

दि .२४ ऑक्टोबर २०१४, प्रभावती आजी गेल्या, गेल्या त्या विजयदुर्गातून थेट स्वर्गातच! काकाही मग मुंबईला आपल्या मूलीकडे निघून गेले, कारण त्यांचीही सत्तरी उलटली होती. घराला आता कुलुप असते. समोरची बागही सुकून गेली आहे. भरतीच्या लाटा अधूनमधून धीर करून ओसरीवर आजी दिसते का? ते बघायला बागेच्या कुंपणापर्यंत येऊन जातात. तेव्हढीच काय ती जाग. बाकी मग सगळं शांत असतं .....

©ॲड. आनंद रा. देशपांडे. (Image Curtacy - Google Images)



19-06-20

## 46. सदा सर्वदा देव सन्निध आहे ....

२०१४ चा नोव्हेंबर महिना. गच्च अंधार, हवेत चांगलाच गारठा होता. रायगडावरच्या हत्ती टाक्याच्या भिंतीवर बसून होतो. सकाळी सहा वाजता सुयश विद्यालयाचे शंभर विद्यार्थी घेऊन सोलापूर सोडलं होतं. संध्याकाळी पार अंधार पडल्यावर पाचाडला पोहोचलो. पोरं सावकाश चढत चढत येत होती. मी पुढ येऊन हत्ती टाक्याच्या भिंतीवर पोरांची वाट पहात बसलो होतो.

अंधारात काही दिसत न्हवतं. आजपर्यंतच्या एकेक रायगडच्या वाऱ्या आठवत होत्या. कधी एकटा, कधी गोतावळा. प्रत्येक वेळी नवीन अनुभव, नवीन कथा. या वेळेस काय अनुभव येणार कोण जाणे, असा विचार करीत असतानाच महादरवाजाच्या घळीतून पोरांच्या घोषणा, बॅटऱ्यांचे प्रकाश दिसू लागले. वाकून पाहिलं तर मशालींची रांगच्या रांग दिसावी तशा बॅटऱ्या दिसत होत्या. पोर जशी वर आली तसा दंगा ऐकू येऊ लागला.

थोडं पुढं जाऊन पाहिलं तर दोन शिक्षक एका पोराला पाठीवर घालून घेऊन येत होते. पोरगं अक्षरशः ठोठो

बोंबलत होतं. विचारलं, "काय झालं?" तर म्हणाले, "वाटेत कुठतरी विंचू चावला". माझी अवस्था काय वर्णावी? कसंबसं त्या पोराला एमटीडीसीपर्यंत आणलं. मग सुरु झाली डॉक्टरांबरोबर फोनाफोनी. तोवर दोन चार पोरं रोपवेकडे पाठवली. डॉक्टर फोनवरून विचारत होते, विंचू कोणत्या रंगाचा होता? माझ्र कप्पाळ ! त्या मिट्ट अंधारात पोरांना काय कळणार होतं? एक डॉक्टर म्हणाले, "त्याच्या प्लेटलेट कमी होतील, ताबडतोब महाडला घेऊन जा". पाचाडला फोन करून जीपची व्यवस्था केली.

पोरगं ओरडतच होतं. मोरे नावाचा एमटीडीसीचा मॅनेजर हा सगळा गोंधळ पहात होता. त्याने कँटीनमधल्या पोराला सांगितलं, "जा रे, बाजारपेठेमागच्या म्हाताऱ्याला घेऊन ये". पंधरा मिनीटांत म्हातारा हजर. त्यानं आधी घोळका केलेली पोरं बाजूला केली. एका शिक्षकाला पोराला धरायला सांगितलं. हाफ पॅंट्च्या खिशातून दोन पूड्या काढल्या, पोरावरून ओवाळून लांब टाकून दिल्या आणि ज्या पायाला विंचू चावला होता त्या पायाच्या वरुन चार बोटं अंतरावरून आपला तळहात मांडीपासून बोटापर्यंत खाली आणला, पोरगं खच्चून आरडायला लागलं, त्यान हात बोटांवरून

खाली घेऊन झटकला आणि पोरगं टुणकन उडी मारून उभं राहिलं. वेदनेचा लवलेशही चेहऱ्यावर नव्हता. माझ्यासकट हजर असलेले पन्नास साठ जण अवाक! नेमकं काय झालं तेच कळेना. सावरेपर्यंत म्हातारा आला तसा अंधारात गडप झाला होता.

केवढया मोठया संकटातून वाचलो होतो. काय काय धावपळ करावी लागली असती. जिथ उभा होतो तिथूनच शिव समाधीकडे बघून हात जोडले. पोरांची जेवणं ऊरकून घेतली आणि दोन शिक्षक बरोबर घेऊन तडातडा रात्रीच समाधी गाठली.

हात जोडून समोर उभा राहिलो. मनात म्हणालो, इतके वेळेला, इतक्या जणांना घेऊन तूमच्या दर्शनाला आलो. कधीच कसलं संकट येऊ दिलं नाहीत. सगळ्यांना सुखरूप घेऊन यायचात आणि सुखरूप पोहोचते करायचात, तुमचाच आधार असायचा आणि असतो ही.

आज परीक्षेची वेळ होती, पण तुम्हीच त्या म्हाताऱ्याच्या रुपात येऊन सोडवलत. काय बोलू ? अशीच कृपेची सावली आयुष्यभर शिरावर राहू दे. चंद्राचा मंद प्रकाश पडला होता. बराच वेळ तसाच बसून होतो.

थंडी वाढली तसे मग एमटीडीसीला परतलो. समर्थ वचनाचा सार्थ अनुभव आला होता,

सदा सर्वदा देव सन्निध आहे |
कृपाळूपणे अल्प धारिष्टय पाहे ||
©ॲड. आनंद रा. देशपांडे.



(Image Curtacy - Google Images)

23-06-20

## 47. मेरे नैना सावन भादों,

मेरे नैना सावन भादों,

फिर भी मेरा मन प्यासा ......

माणसाचं मन मोठं विचित्र आहे. लहान मुलांना जशी घरात नसलेलीच खेळणी हवी असतात तद्वत त्यालाही आपल्या आवाक्यात नसलेल्या, आपल्या कक्षेबाहेरच्या अप्राप्य गोष्टींची ओढ असते, इच्छा असते. मेहबूबामधल्या आनंद बक्षींनी लिहिलेल्या या गाजलेल्या गाण्याच्या ओळी काहीसा तोच अर्थ प्रकट करतात. त्यात एक अजून अंतर्भूत झालेली गोष्ट म्हणजे, कवी म्हणतो, माझे दोन्ही डोळे हे श्रावण आणि भाद्रपदाचे प्रतीक आहेत म्हणजे भरपूर पावसाची खूण आहेत, पाण्याने गच्च भरलेले आहेत तरी पण माझं मन मात्र अजूनही तहानलेलचं आहे.

आयुष्याच्या पंचवीस, पन्नास आणि पंचाहत्तर या तीनही टप्प्यांवर प्रत्येक माणसाला हा अनुभव आल्याशिवाय रहात नाही. आपल्या पात्रतेनुसार, कष्टांना अनुसरून आणि प्रारब्धानुसार परमेश्वराने आपली झोळी भरलेली असते. पण

झोळीत काय पडलं यापेक्षा काय पडलं नाही, किंवा काय पडलं असतं किंवा काय पडायला हवं होतं याचाच माणूस विचार करत रहातो.जे हातातून सुटलेलं असतं तिथं एकतर आपले प्रयत्न कमी पडतात किंवा दुसऱ्याचे प्रयत्न बाजी मारून जातात, नाहीतर ते आपल्या प्रारब्धात तरी नसतं. एखाद्या वाऱ्याच्या झुळूकीसारखं ते आपल्या आयुष्यात डोकाऊन जातं, नेमके आपण त्यावेळी मनाने एकाग्र झालेले असतो. मग ते दृश्य, ती व्यक्ती, ती संधी अदृश्य झाली तरी आपल्या मनाच्या पटलावर कोरले गेलेले ते चित्र शेवटपर्यंत पुसले जात नाही. कितीही प्रयत्न केला तरी !

चित्रपटात ते गाणे थोडे वेगळ्या संदर्भाने म्हणजे पुनर्जन्माच्या संदर्भात येते. पण मी जेव्हा जेव्हा हे गाणं ऐकतो, तेव्हा तेव्हा मला मात्र रोजच्या आयुष्यातले संदर्भच दिसत रहातात, सूचत रहातात. आपल्या हातून सुटून गेलेली, आपल्या प्रारब्धात नसलेली एखाद्या अप्राप्य गोष्टीची, ओढ, जाणीव हे गाणं करुन देतं आणि सिनेमातल्या सारख्या या गोष्टी जेव्हा आपल्या आसपासच असतात, त्यांच्या चाहूली वारंवार मनाला स्पर्श करुन जातात, तेव्हा

मात्र ती जाणीव, ते सूर सगळं अस्वस्थ आणि थोडया वेळापुरतं का होईना सगळं उध्वस्त करून जातात.

खरं ना ? तपासून पाहा.

©अ‍ॅड. आनंद रा. देशपांडे.

18-07-20

## 48. मुंगशी .. मुस्क .... मास्क ...

या महामारीच्या काळात अनेक प्रतिभावंतांची प्रतिभा उफाळून वर आली. कुणी लेख लिहीले, कुणाला कविता झाल्या, कुणी चित्रे काढली, कुणी भाषणं ठोकली, एका व्यंगचित्राने माझे लक्ष वेधून घेतले. पूर्वी कोळपणी करताना पिकं उगवून आलेली असायची, त्यांचे शेंडे बैलांनी खाऊ नयेत म्हणून बैलांना मुंगशा ( मुस्कं ) बांधत असत.

एका चित्रात मुंगशा बांधलेले बैल तर दूसऱ्या चित्रात, अर्थातच सध्याच्या, मास्क घातलेला शेतकरी आणि अर्थातच रिकाम्या तोंडाचे बैल होते. आता विचाराचा मुद्दा हा आहे की हे ( मास्क प्रकरण ) फक्त माणसाच्याच वाटयाला का आलं ? आज अखेरपर्यंत एकही पक्षी, प्राणी, किटक, अगदी माकडा वानरांसारखा सस्तन प्राणीसुद्धा महामारीने दगावल्याची एकही खात्रीशीर बातमी नाही. अशा स्थितीत फक्त माणसेच, या महामारीची शिकार का होत असावीत ? एवढा स्पष्ट संदेश निसर्गाने आजवर कधी दिला नव्हता. मग फक्त माणसांच्याच मुसक्या आवळायची वेळ निसर्गावर का आली ? आणि आपल्यावर आलेली वेळ

माणसाने तरी समजून घेतली आहे का ? गेल्या दीडशे वर्षात झालेल्या औद्योगिक क्रांतीने माणूस बेभान, बेताल आणि बेमुर्वत झाला होता. निसर्गासह सारं जग एवढंच काय अंतराळसुध्दा जिंकल्याच्या वल्गना त्याने सुरु केल्या होत्या. त्याच्या उलाढाली सारं निसर्गचक्र उलटं सुलटं फिरवणाऱ्या होत्या. दैनंदिन आयुष्यात माणसे अहंकाराने, पैशाने, सत्तेने, त्यागाने माजली होती. तोंडाला येईल ती बडबड सुरु होती. हे कुठंतरी संपायला हवं होतं, कुणीतरी याला वेसण घालणं आवश्यक होतं.

अशावेळी एका अदृश्य विषाणूने ही भूमिका पार पाडली. आता तो मानवनिर्मित आहे का निसर्गनिर्मित या चर्चेने त्याच्या परिणामावर काही फरक पडत नाही, उपायांवर पडेल कदाचित ! पण लाखभर माणसांपेक्षा जास्त बळी घेऊनसुद्धा माणसातल्या अहंकाराचा त्याला बळी घेता आला नाही. माणूस असाच बेभान जगत राहिला तर एक दिवस तो स्वतः सह साऱ्या मानवजातीचा आणि या सुंदर विश्वाचाही नाश करेल. या महामारीचा संदेश समजलेले काही देश, काही शास्त्रज्ञ  एकत्र येत आहेत, त्याच्यावर विचार करताहेत, ही एक चांगली गोष्ट आहे, पण निर्विवादपणे

या मोहिमेचे नेतृत्व भारतालाच करावे लागेल कारण साऱ्या विश्वाच्या कल्याणाचे कोणतेच तत्वज्ञान भारताशिवाय अन्य कोणाकडेही नाही आणि त्याच्याच जोरावर साऱ्यांना विश्वासात, कवेत घेऊन आपला देश ही लढाई जिंकेल याची मला खात्री आहे. या लढाईत काही जणांच्या मुसक्या आवळाव्या लागतील किंवा काही बैलांच्या मुसक्या कायम ठेवाव्या लागतील त्याला पर्याय नाही.

©ॲड. आनंद रा. देशपांडे




(Image Curtacy - Google Images)

11-07-20

## 49. साकडं ....

या वर्षी पाऊस जरा लवकरच आला. जेष्ठाच्या शेवटचे शेवटचे वळवाचे एक दोन तडाखे संपताहेत, तोवरच पश्चिमेला मेघांनी फळी धरली. वाऱ्याचं भूत अंगात आल्यासारखं इकडून तिकडून पळू लागलं. त्यानं त्या ढगांच्या फळीतले चार दोन चुकार अतिउत्साही ढग पकडले आणि त्यांना पुढं घालून पळवत आणलं आणि रायगड थोडा शिंपडून घेतला. खरपूस भाजलेल्या मातीचा आणि मुरुमाचा वास सुटला. सोनकी, तेरडा आणि इतर गवतफुलांनी पटापटा आपापल्या जागा धरल्या आणि अजून मृग उजाडतो न उजाडतो तोच काडकन विजेचा चाबूक ओढीत पाऊस येऊन दाखल झाला.

गेला आठवडाभर संततधार सुरू होती. अजिबात खळ नव्हता. एव्हाना सांदी सापटीतले छोटे झरे, मोठे खळाळ, धबधबे सुरू झाले होते. एकाच गोष्टीची कमी होती. कुठल्याच शिवभक्ताचा पायरव येत नव्हता, चाहूल लागत नव्हती. जेष्ठातला राज्याभिषेकाचा उत्सवसुद्धा जेव्हा सुना सुना गेला, पाच पन्नास जणच येऊन अभिषेक करून गेले

तेव्हा मात्र शिवसमाधीच्या मनात शंका आली. काय बरं झालं असेल ? तिनं थोडं वाकून आतल्या जगदीश्वराच्या नंदीला हाक मारली. पण तो ढिम्म काही हलेना. तेव्हा मग नगारखाना हसून तिला म्हणाला, "अगं, त्याचं लक्ष बाहेर असतं कधी ? कायम मान, नजर आणि कान आंत गाभाऱ्याकडे टवकारलेले ! थांब, मीच थोरल्याला विचारतो" म्हणून त्यानं मान जराशी वर केली आणि राजसभेच्या नगारखान्याकडं बघून हात हलवला. थोरलाही त्याच चिंतेत पडला होता. त्यानंही धाकटयाला बघून हात हलवला. तेवढयात एक वाऱ्याची झुळूक खालच्या दरवाज्यातून चालली होती, तिला थांबवीत त्यानं धाकटयाला निरोप दिला "संध्याकाळी दिवस मावळायच्या वेळेला शिवसमाधीला घेऊन होळीच्या माळावर ये. तिथं निवांत भेटू. मी सदरेला, मेघडंबरीला आणि राणीवशाला निरोप देतो".

संध्याकाळी दिवस बुडायला घटकाभर शिल्लक असताना शिवसमाधी अन्  जगदीश्वराचा नगारखाना होळीच्या माळावर आले. चटकन जाऊन त्यांनी शिरकाईला डोकं टेकवलं, वळाले तो, पुतळ्याच्या उजवीकडून राणीवसा,

राजसदर आणि नगारखाना येताना दिसले. मग तिथच पुतळ्यासमोर ऐसपैस बैठक बसली. राजसदर शिवसमाधीला म्हणाली, "आपण एवढया लांबून इथं येऊन बसलो, जरा त्या बाजारपेठेला हाक मार की." शिवसमाधी म्हणाली, "मी बाई तुमच्यात वयानी सगळ्यांत लहान, माझा जन्मच मुळी १९२५चा ! तुम्ही सगळे एका वयाचे, पार थोरल्या राजांपासूनचे, तुम्हीच हाक मारा." त्यात काय एवढं म्हणून राणीवशाने बाजारपेठेला हाक मारली. तो बाजारपेठ उत्तरली, "तुम्हाला काय वाटलं, मला ऐकू आलं नाही ? येतच होते मी, हे बघा" म्हणून तिनं नुस्त इकडं तोंड वळवलं. पुतळ्यातले राजे या गप्पा ऐकून गालातल्या गालात हसले.

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर थोरल्या नगारखान्यानं विषयाला हात घातला, " यावर्षी अजून शिवभक्तांची गर्दी कशी नाही ?" "मी सांगू ? मी सांगू ?" म्हणत शिवसमाधी पुढं सरकली. "सांग बाई, तू सांग, वयानं लहान असलीस तरी तुझा मान मोठा." राजसदर म्हणाली. "अगं, तसं नाही ग, परवा अभिषेकाला आलेली मंडळी जेव्हा माझ्या पायावर

डोकं ठेवीत होती ना, त्यावेळी सगळे मनातल्या मनात प्रार्थना करत होते की हे महामारीचं संकट लवकर नाहीस करा महाराज." "अस्सयं होय, तरीच परवा अभिषेकाच्या वेळेस सगळे तोंडाला शेले गुंडाळून आले होते" मेघडंबरी पुटपुटली. तेव्हढयात, श्रीगोंदयाच्या टोकाकडून आलेला वाऱ्याचा सोसाटा होळीच्या माळावर पोहोचला. ही सगळी बडी मंडळी तिथं एकत्र झालेली पाहून, तो तिथचं त्यांच्याभोवती घोटाळू लागला. त्यांच्या चर्चेवरून उडत उडत विषय त्याच्या कानावर पोहोचला.

त्यालाही आश्चर्य वाटलं. मग त्यानं मनाशी एक निश्चय केला, या सगळ्यांकडे वळून तो म्हणाला, "मंडळी, तुम्ही सगळे एकत्र आलेले पाहिल्यावरच, माझ्या लक्षात आलं होतं का विषय गंभीर आहे. ह्याच्या त्याच्या हातून सुटणारा नाही. ह्या महाराजांच्या पुतळ्याच्या साक्षीनं सांगतो, हा असाच तडक प्रतापगडावर जातो, आई भवानीला साकडं घालतो का या लेकरांवर आलेल्या संकटातून त्यांची सुटका कर, त्यांना पोटाशी घे आणि त्या आदिमायेचा उजवा कौल घेऊन तुम्हाला सांगायला येतो का दिवाळीला तुमची लेकरं तुमच्या दर्शनाला येत्याल. गड पुन्हा नांदता होईल. पुन्हा

चौघडा वाजल, पुन्हा घंटा घणाणतील, पुन्हा झेंडे फडफडतील, थोडी कळ सोसा!" त्या वाऱ्याच्या झोतानं या सगळ्यांच्याभोवती एक गिरकी घेतली आणि पुतळ्याच्या पायांना स्पर्श करून तो पहाता पहाता पोटल्याच्या डोंगरावरून प्रतापगडाकडे निघून गेला .

©ॲड. आनंद रा. देशपांडे.



(Image Curtacy - Google Images)

06-07-20

## 50. तो आहे .....

संध्याकाळ थोडी आळसटल्यासारखीच जाते. हिरकणीवरून परत येताना सारखं वाटत रहात, आज रात्री ठोकणार बहुतेक ! नुसतच गार वार सुटलेल असत. पार तिकडं क्षितीजाच्या टोकावर एक काळी रेघ दिसत असते, आपण त्याच्यावरूनच अंदाज बांधतो, आज रात्री कोसळणार पाऊस! रात्री उशिरापर्यंत सूटच्या पायऱ्यांवर बसून राहिलं की पश्चिमेला विजा चमकताना दिसतात. पाऊस काही येत नाही. मग कंटाळून मी झोपायला जातो. पहाटे केव्हातरी वरच्या सिमेंटच्या पत्र्याचा ताशा वाजायला लागतो. अर्धवट उघडया खिडकीच्या फटीतून वाऱ्याची कर्कश्श शीळ घुमायला लागते.

मी झोपेतनच म्हणतो, "आले वाटतं, साहेब." मग चांगलं तास दोनतास आभाळ गर्जत रहातं. राणीवशापाठीमागून वाहाणाऱ्या ओढयाचा खळाळ कानावर ऐकू येऊ लागतो. तरीही अजून उजाडलेल नसतं म्हणून मग तसाच घुसमटून मी पडून रहातो. थोडयावेळाने ताशाची आवर्तन कमी होतात. पूर्वेचा उजाळ वाढतो, पण गच्च धुकं भरलेलं असतं.

सूटचा दरवाजा उघडला की गार वार आणि धुकं भसकन आत घुसतं. तशीच शाल लपेटून चहासाठी कँटीनकडं निघतो. मधल्या ओढयावरच्या पुलाची लाकडं भिजून चिंब झालेली असतात. ओढ्याचा आवेग कमी झालेला असतो. वळवाच्या पावसानं हिरवट झालेल्या गवताच्या कोंबांनी पावसाचे थेंब तोलून धरलेले असतात. चांगले दोन ग्लास गरम गरम चहा रिचवला की मग बरोबरचा भिडू म्हणतो, "काय फिरून यायचं का ?" मी काय निमित्ताला टेकलेलाच. मग एखादी काठी घेऊन बाहेर पडायचं. तशा गच्च धुक्यातून मेणादरवाजा गाठायचा, पावसाचं पाणी अजून पायऱ्यांवरून वाहात असतं. कोपरे उडालेल्या पायऱ्यांच्या खाचातून, पाण्याच्या बारीक बारीक धारा लागलेल्या असतात. एकदा राजवाडयात शिरलं की स्वर्गात आल्याचा भास होतो. भरून आलेल्या पांढरट धुक्यातून दिसणारे काळे कुळकुळीत चौथरे, धूसर दिसणाऱ्या भिंती, बारीक पावसाचे थेंब अंगावर घेत त्यातून वाट काढत चालावं. वाट पायाखालची असल्यानं काळजी नसते. वळणं वळणं घेत, चौथऱ्यांचे चढउतार करत, आपण राजसभेत येतो. धुक्यानं गच्च भरलेल्या एका मोठ्या चौकोनी खोक्यात आपण उभे आहोत

असा भास होतो. उजव्या हाताचा नगारखाना आणि डाव्या हाताचं सिंहासन नुसतं जाणवत रहातं. डावीकडं वळून नमस्कार करून मी नगारखान्याच्या बाहेर येतो. समोरचं काही दिसत नाही. अदमासानं होळीच्या माळाची वाट पकडून चालत रहातो. डाव्या हाताचा खडक संपला की गार वाऱ्याचा झोत एकदम अंगावर येतो. एक शिरशिरी उठते. पावसानं झालेला सृष्टीतला बदल निरखीत पुतळ्यातले महाराज स्वस्थ बसून असतात.

होळीच्या माळावरचं पावसाचं पाणी, एका बाजूनं गंगासागरात तर दुसऱ्या बाजूनं हत्तीतलावात धावत असतं. तशा धुक्यातसुध्दा, एका रेघेत असलेल्या बाजारपेठेच्या काळसर भिंती दोन्ही बाजूला जाणवत रहातात. चटाचटा पावलं उचलून बाजारपेठं मागं टाकली की ब्राह्मणवाडयाच्या घळीतून एक छोटा ओहोळ वाहात असतो, तो ओलांडून वर खडकावर आलं की पुन्हा एकदा वाऱ्याचा झोत जाणवून जातो. जगदीश्वराची मागची भिंत दिसायला लागते. मी हात वर करून सवयीनुसार गणपतीच्या पायाला हात लावून कपाळाला लावतो. आत आलो की जाणवतं, राजवाडा जर स्वर्ग असेल तर हे अपर कैलास आहे.

इथे तो कधीकाळीचा माझ्या राजांनी पूजलेला, जगदीश्वर ठाण मांडून बसलेला आहे. आतबाहेर गच्च भरलेल्या धुक्यामुळे धन्याची दृष्टिभेट न होऊन, थोडी मान वाकडी करून आत वाकून पाहणारा, पावसाने निथळणारा नंदी बघून आत जावं. छताच्या गळणाऱ्या चिऱ्यातून आत टपकणारे पाण्याचे थेंब खाली साचलेल्या पाण्यात टप, टप, टिपिक, टिपिक वाजत असतात. सर्दावलेला मारूतीराया, थेंबाथेंबाने निथळत असतो.

गाभाऱ्यातल्या ओलसर निसरड्या दगडावर पाऊल पडलं की शिळक अंगात जाते. कोरडी जागाच शिल्लक नसते, त्यामुळे दर्शन घेऊन बाहेर येतो. नगारखान्यापासून ते थेट समोरच्या राजगड, तोरण्यापर्यंतच्या आसमंतात फक्त एका शिवसमाधीचं अस्तित्व जाणवत राहात. कालचा पूजेचा हार, पावसाने भिजून, एका बाजूला सरकलेला असतो. गच्च भिजलेल्या त्या समाधीवरच्या अर्धप्रतिमेकडं पहावं अन् मग इथे शब्द संपतात. इथून पुढे भावनांचा प्रदेश ! बरोबरचा भिडू पार गोंधळून गेलेला असतो. कँटीनमधून बाहेर पडल्यापासून, मी एका चकार शब्दाने त्याच्याशी बोललेलो नसतो. तोही या वातावरणात रमलेला, माझ्याबरोबर

स्वतःला ओढीत रहातो. मनाला वाटेल तितका वेळ, शिवसमाधीसमोर हात जोडून उभा रहात, मी खूप गप्पा मारतो, गाऱ्हाणी सांगतो, तावातावाने मुद्दे मांडतो, त्यांच्याशी मनापासून भांडतो, पण सगळं मनातल्या मनात !! मग शांत होतो. डोळ्यात आलेलं पाणी पुसतो, घशातला आवंढा गिळतो. मनात येतं या विश्वरूपासमोर मी कोण आहे ?

एक कीटकं !

पण काहीही असो, आमच्यात एक नातं आहे, त्याशिवाय का असा मी सारखा भेटीसाठी धावत येतो ? मला मनापासून मोकळं व्हायला याच्याशिवाय दुसरं स्थान नाही, कारण इथे माझ्याकडून कसलीच अपेक्षा नाही. इथे असतं फक्त त्यांचं अस्तित्व आणि असतो एक भरवसा, काळजी करू नको, मी आहे !!

मागं वळून पहातो तो, जगदीश्वर धुक्यात हरवलेला, फक्त नंदी अस्पष्ट दिसत असतो, त्याच्यावरून आपण खात्री बाळगायची की तो आहे आणि खरच तो असतो.

©ॲड. आनंद रा. देशपांडे.

# <u>लेखक परिचय</u>

## ॲड. आनंद रामचंद्र देशपांडे

शिक्षण : बी.कॉम.,एल्एल्.बी.,एम.ए.
(इतिहास)

- **माजी सदस्य :-** गड संवर्धन समिती, महाराष्ट्र शासन.
- **माजी सदस्य :-** महाराष्ट्र राज्य नाट्यपरिनिरीक्षण मंडळ.
- महाराजा शिव-छत्रपति प्रतिष्ठाननिर्मित व श्रीमंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे दिग्दर्शित **"जाणता राजा"** या महानाट्यात १९८८ पासून सहभाग.
- आतापर्यंत २७५ प्रयोगांतून मध्यमवयीन शिवाजीमहाराज, सूत्रधार, शाहीर या भूमिका सादर.
- या प्रयोगाच्यानिमित्ताने १९९७ साली अमेरिका व २०१५ साली इंग्लंडचा दौरा.

- पुण्यातील आंबेगाव येथे महाराजा शिवछत्रपति प्रतिष्ठानच्यावतीने साकारल्या जाणाऱ्या "शिवसृष्टी" या भव्य प्रकल्पाचा सल्लागार म्हणून जबाबदारी.

- दुर्गमहर्षि गोपाल नीलकंण्ठ दांडेकर यांच्या साहित्यावर आधारित **"पुनर्भेट - गोनीदांच्या साहित्यकृतींची"** हे पुस्तक प्रकाशित.

- दुर्गभ्रमंतीतील अनुभवांवर आधारित **"कातळमनीचा ठाव"** हे ललित लेखांचे पुस्तक प्रकाशित.

- गेल्यावर्षी विविध विषयांवरील स्फुट लेखांचा संग्रह असलेला **"काही जनातलं, काही मनातलं "** हा लेखसंग्रह पुस्तक रुपाने प्रकाशित.

- गोनीदा दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या दुर्गसाहित्य संमेलनांचा संस्थापक सदस्य.

- विनय धुमाळे निर्मित व दिग्दर्शित लोकमान्य टिळकांच्या जीवनावर आधारित **“लोकमान्य”** या हिंदी दूरदर्शन मालिकेत आद्य क्रांतिकारक वासूदेव बळवंत फडके यांची भूमिका सादर.

- मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित **“रमा-माधव“** व दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित **“फर्जंद“** आणि **“फत्तेशिकस्त“** या ऐतिहासिक मराठी चित्रपटांतून भूमिका.

- १९९० पासून गेली तीस वर्षे
  ३ राष्ट्रीयकृत बँका,
  ७ सहकारी बँका,
  ३ खासगी वित्तीय कंपन्या व
  इंडियन ऑईल कार्पोरेशन या राष्ट्रीय संस्थांचा कायदेशीर सल्लागार (विधी सल्लागार) म्हणून कार्यरत.

**मित्रहो, पुस्तकं वाचल्यावर कोणी शहाणं होतं का?**

**हो! आम्ही म्हणतो वाचनाने माणूस शहाणं होतं.**

वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. प्रत्यक्ष अनुभवासारखा शिक्षक नाहीच. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे. एक एक पुस्तक म्हणजे व्हिटामिनची एक एक गोळी असते असं समजा. शहाणं करून सोडणारं व्हिटामिन. आणि जसे इतरांचे अनुभव तुम्हाला शहाणं करतात तसे तुमचे अनुभव इतरांना सांगून त्यांना शहाणं करायचं काम तुम्ही करू शकता. तुम्ही तुमचे अनुभव लिहून ई साहित्यकडे पाठवा. बाकी सर्व आम्ही बघू.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.


esahity@gmail.com

www.esahity.com

www.esahity.in

